

# उच्च जीवनाची साधना

स्वामी विवेकानंद

श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर

# उच्च जीवनाची साधना

स्वामी विवेकानंद

(तिसरी आवृत्ति)

श्रीरामकृष्ण आश्रम

नागपूर

प्रकाशक—
स्वामी व्योमरूपानन्द,
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर–४४० ०१२

अनुवादक—
प्रा. वा. के. लेले, एम्. ए.,
वाराणसी.

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ५७ वें

(श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्वाधिकार सुरक्षित)

[ ब ७८ : प्र २३ ]

मूल्य रु. ३.५०

मुद्रक—
श्री. वि. रा. घोडखांदे
लोक मुद्रणालय,
महाल, नागपूर-२

# दोन शब्द

"उच्च जीवनाची साधना" नामक पुस्तकाची ही तिसरी आवृत्ति वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. स्वामी विवेकानंदांनी निरनिराळ्या ठिकाणीं जीं व्याख्यानें दिलीं होतीं त्यांच्या टिपणांचा संग्रह प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. स्वामी विवेकानंदांच्या दिव्य प्रतिभेचा विलास त्यांच्या विविध विषयांवरील व्याख्यानांत दिसून येतो. त्यांनी आपल्या व्याख्यानांत आध्यात्मिक विषयांबरोबरच उच्च जीवनाला उपकारक असे अनेक विषय हाताळले आहेत. मानवाने आत्मपरीक्षण करून व सन्मार्गाने जाऊन जीवनाचा सर्वांगीण विकास करावा आणि मोक्षाचें वा पूर्णत्वप्राप्तीचें ध्येय प्राप्त करून घ्यावें असें स्वामी विवेकानंदांना प्राणोप्राण वाटत असे. प्रस्तुत पुस्तकांत संग्रहित केलेल्या विभिन्न व्याख्यानांच्या टिपणांत त्यांची ही तळमळ दिसून येते. जीवन उन्नत बनविण्यासाठी कोणत्या उपायांचें अवलंबन केलें पाहिजे यासंबंधीचें ज्ञान स्वामी विवेकानंदांचें मौलिक व स्फूर्तिदायी विचार वाचले म्हणजे आपोआपच प्राप्त होतें. हे विचार आत्मसात् करून ते कृतींत आणल्याने वैयक्तिक व सामूहिक दोन्ही दृष्टींनी मानवाचें कल्याण झाल्यावांचून राहणार नाही.

प्रा. वा. के. लेले, एम्. ए., वाराणसी, यांनी मूळ इंग्रजी टिपणांचा अनुवाद केला आहे. त्यांच्या या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

नागपूर, २-१०-१९७८ —प्रकाशक

# अनुक्रमणिका


१. कर्मयोग .... १
२. स्वमतान्धता .... ७
३. कर्म हीच उपासना होय ....१२
४. निष्काम कर्म ....१५
५. उच्च जीवनाची साधना ....१९
६. विश्व आणि आत्मा ....२८
७. खरा गुरु कोणाला म्हणावयाचें ? ....३२
८. कला ....३४
९. संन्यासी ....३६
१०. संन्यासी आणि गृहस्थाश्रमी ....३८
११. अधिकारवादांतील दोष ....४१
१२. भक्तियोग ....४५
१३. ईश्वर आणि ब्रह्म ....५२
१४. ज्ञानयोग ....५३
१५. मायेचें कारण काय ? ....६२
१६. क्रमविकास ....६४
१७. बौद्ध धर्म आणि वेदान्त ....६८
१७. वेदान्त तत्त्वज्ञान ....७२
१९. नियम आणि मुक्ति ....८१
२०. आत्मसाक्षात्काराचें ध्येय व तें गाठण्याच्या पद्धति ....८९
२१. राजयोगाचें अंतिम लक्ष्य ....९२



स्वामी विवेकानंद

# उच्च जीवनाची साधना

## १

### कर्मयोग

मानसिक आणि भौतिक अशा सर्व विषयांपासून आत्म्याला पृथक् करणें हें आपलें ध्येय आहे. तें ध्येय गाठलें जातांच आत्म्याला असें कळून येतें की आपण सदासर्वदा एकटेच आहोंत व आपल्याला सुखी करण्यास दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची आवश्यकता नाही. जोंपर्यंत आपल्याला सुखी करण्यास दुसऱ्या कशाचीहि जरूरी भासते तोंपर्यंत आपण गुलाम असतों. आपण मुक्त आहोंत, आपल्या पूर्णत्वासाठी आणखी कशाचीहि आवश्यकता नाही व ही सारी प्रकृति अगदी अनावश्यक आहे अशी पुरुषाला जेव्हा जाणीव होते तेव्हा त्याला कैवल्यप्राप्ति होते.

मनुष्य पैशामागे धावत असतो व तो मिळविण्यासाठी तो बिनदिक्कतपणें आपल्या बांधवांनाहि फसवितो. परंतु मनुष्याने आत्मसंयम केल्यास कांही वर्षांत त्याला असें चारित्र्याचें बळ प्राप्त होईल की त्याने मनांत आणल्यास त्याला लक्षावधि रुपये मिळवितां येतील. मग त्याची इच्छाशक्ति सर्व विश्वावर हुकमत गाजवूं लागेल. परंतु, आपण किती मूढ आहोंत !

आपल्या चुका जगाला सांगत बसण्यांत काय अर्थ आहे ? असें केल्याने त्या चुकांचें परिमार्जन थोडेंच होणार आहे ? आपल्या कृत्यांबद्दलची शिक्षा ही आपल्याला भोगावीच लागेल. यापुढे आपण चांगलीं कर्में करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जे बलशाली

व सामर्थ्यवान असतात त्यांच्याबद्दलच जगाला सहानुभूति वाटते हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

जें कर्म मानवजातीसाठी आणि जगासाठी व स्वेच्छेने समर्पण-बुद्धीने केलें जातें तेंच कर्म बंधनांत पाडणाऱ्या आसक्तीला कारणी-भूत होत नाही.

कोणत्याहि कर्तव्याला कमी लेखणें योग्य नव्हे. जो मनुष्य एखादें हलकें काम करतो तो तेवढ्याच कारणास्तव उच्च प्रतीचें काम करणाऱ्याहून हलका ठरत नाही; एखादा मनुष्य कोणत्या प्रकारचीं कर्तव्यें करतो यावरून त्याची श्रेष्ठता ठरवू नये तर तो तीं कर्तव्यें कशा रीतीने करतो ह्यावरून त्यांची श्रेष्ठता जोखावी. कर्तव्यें करण्याची रीत व शक्ति ह्यांवरूनच माणसाची परीक्षा होत असते. एखाद्या चांभाराने अल्पावधींत जर अतिशय टिकाऊ व सुंदर अशी पादत्राणांची जोडी बनविली तर तो त्याच्या पेशाच्या व कामाच्या दृष्टीने विचार करतां, वर्गांत जाऊन दररोज अर्थशून्य बडबड करणाऱ्या एखाद्या प्राध्यापकापेक्षा अधिक चांगला मनुष्य ठरतो.

खरें म्हणजे प्रत्येक कर्तव्य पवित्र आहे आणि कर्तव्याविषयीची निष्ठा म्हणजे ईश्वरपूजेचा सर्वश्रेष्ठ प्रकार होय; भ्रमांत आणि अज्ञानांत पडलेल्या बद्ध जीवांना ज्ञानसंपन्न व मुक्त करण्यासाठी कर्तव्यनिष्ठा हें निश्चितच एक मोठें साहाय्यक साधन होय.

जें कर्तव्य आपल्या अगदी जवळचें आहे, जें कर्तव्य आपल्या हातीं आहे तें उत्तम प्रकारें पार पाडल्याने आपलें बळ वाढतें; आणि अशा प्रकारें हळूहळू बलसंपन्न होऊन आपल्याला अशी अवस्था प्राप्त होईल की ज्या अवस्थेंत जीवनाच्या व समाजाच्या दृष्टीने अतिशय स्पृहणीय व आदरणीय अशीं कर्तव्यें करण्याचें भाग्य आपल्याला लाभेल.

प्रकृतीचा न्याय हा सर्वत्र सारखाच कडक व निर्दय असतो.

अत्यंत व्यवहारी मनुष्य जीवनाला कधीच चांगलें अथवा वाईट म्हणणार नाही.

जीवनांत यशस्वी होणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या ठायीं चारित्र्याची प्रचंड शक्ति आणि अत्यंत निष्कपटता हे गुण असतातच, आणि ह्या गुणांमुळेच त्याला जीवनांत अपूर्व यश प्राप्त होत असतें. तो पूर्णपणें निःस्वार्थ कदाचित् नसेलहि, पण तो निःस्वार्थ होणाच्या मार्गाला निश्चितच लागलेला असतो. जर तो संपूर्णपणें निःस्वार्थ असता तर त्याला लाभलेलें यश हें बुद्धदेवांना वा येशू ख्रिस्तांना मिळालेल्या यशाइतकेंच महान् ठरलें असतें. तुम्ही किती निःस्वार्थ आहांत ह्यावरून तुम्हीं किती प्रमाणांत यशस्वी होणार हें ठरत असतें.

व्यासपीठावरून केवळ व्याख्यानें देणाऱ्या माणसाच्या कार्यक्षेत्रापेक्षा मानवजातीच्या महान् पुढाऱ्यांचें कार्यक्षेत्र अधिक उच्च प्रकारचें असतें.

आपण कितीहि जंगजंग पछाडले तरी असें एकहि कार्य आपल्याला दाखवून देतां येणार नाही की जें पूर्णपणें शुद्ध आहे अगर पूर्णपणें अशुद्ध आहे. अर्थात्, येथे शुद्धता व अशुद्धता ह्या शब्दांचे अहिंसा व हिंसा हे अर्थ गृहीत धरलेले आहेत. दुसऱ्यांना दुखविल्यावांचून आपल्याला श्वासोच्छ्वास घेतां येत नाही किंवा जगतांहि येत नाही; आपण घेतों तो अन्नाचा प्रत्येक घास हा दुसऱ्याच्या तोंडांतून काढलेला असतो; आपल्या केवळ जगण्यानेच इतर कांही जीव नष्ट होत असतात. हे जीव माणसें असोत वा प्राणी असोत वा वनस्पति असोत, यांपैकी कुणाला ना कुणाला आपल्या जगण्यामुळे नष्ट व्हावेंच लागतें. असें असल्यामुळे हें अगदी ओघानेच येतें की पूर्णत्व हें कर्माच्या द्वारें केव्हाच प्राप्त होणें शक्य

नाही. आपण अनंतकाळ कर्म केलें तरी कर्माच्या चक्रव्यूहांतून आपल्याला बाहेर पडतां येणार नाही. आपण कर्मामागून कर्म करीत गेलों तरी कर्माचा कुठेंहि अंत होणार नाही.

जो मनुष्य स्वाधीन राहून प्रेमाच्या भावनेने कर्म करीत असतो तो कर्मफलाकडे लक्ष देत नाही. परंतु गुलाम फटक्यांशिवाय काम करीत नाही; आणि चाकर पगाराशिवाय काम करीत नाही. हा न्याय जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत लागू आहे; उदाहरणार्थ सामाजिक जीवनाचा विचार करा. जमावापुढे जाहीरपणें व्याख्यान देणाऱ्या वक्त्याला लोकांनी आपली प्रशंसा करून टाळ्या वाजवाव्यात, अथवा हुशहुश करून आपली नापसंती दर्शवावी अथवा हुर्यो करावी असेंच कांहीतरी वाटत असतें. असें कांहीहि घडूं न देतां तुम्हीं जर त्याच्याकडे लक्ष दिलें नाही तर तो मृतप्राय होऊन जाईल, कारण या गोष्टींची त्याला गरज असते. यालाच गुलामाप्रमाणे काम करणें असें म्हणतात. अशा परिस्थितींत मोबदला म्हणून कांहीतरी अपेक्षिणें हा जणु स्वभावच बनून जातो. ह्यानंतर विचार करावयाचा तो एखाद्या चाकराच्या कामाचा. त्याला कांही पगार हवा असतो. 'मी तुम्हांला इतकें इतकें काम देईन, तुम्ही मला इतकें इतकें वेतन द्या' अशी त्याची वृत्ति असते. 'मी कामासाठी काम करतों' असें म्हणणें अगदी सोपें आहे. परंतु प्रत्यक्षांत तसें वागणें मात्र अत्यंत कठीण आहे. एखादा मनुष्य निव्वळ कामासाठी काम करीत आहे असें जर मला कळलें तर त्या महाभागाच्या दर्शनासाठी मी हातागुडघ्याने सरपटत सरपटत कोसन् कोस जाईन. कामामधे कुठे न कुठे तरी स्वार्थी हेतु दडलेला असतोच. तो हेतु द्रव्यप्राप्तीचा नसेल तर सत्तासंपादनाचा असेल. तो सत्तासंपादनाचा नसल्यास, कांही फायदा करून घेण्याचा असेल.

कुठे ना कुठे, कोणता ना कोणता हेतु हा असतोच. तुम्ही माझे स्नेही आहांत व तुमच्यासाठी व तुमच्याबरोबर मला काम करण्याची इच्छा आहे असें मीं तुम्हांला सांगणें हें ठीक आहे. इतकेंच नव्हे, तर मी माझ्या प्रामाणिक हेतूचें प्रदर्शनहि क्षणोक्षणीं करीन. पण सांभाळा बरें का, तुम्ही माझ्याशीं सहमत झालेंच पाहिजे ! तुम्ही माझ्याशीं सहमत झालां नाही तर मी तुमची पर्वा करणार नाहीं अगर तुमच्यासाठी शरीरहि झिजविणार नाहीं. स्वार्थी हेतूसाठी केलेलें अशा प्रकारचें काम मनुष्याला दुःखी बनवितें आपण आपल्या मनाचे धनी होऊन जें काम करतों तेंच काम आपल्या ठायीं अनासक्ति निर्माण करून आपल्याला आनंद देऊं शकतें.

शिकण्यासारखा महत्त्वाचा धडा हा की, सबंध जगाचें मोजमाप घेण्याचा कांही मी मानदंड नव्हे. प्रत्येक माणसाची पारख त्याच्या त्याच्या कल्पनांनुसारच व्हावयास हवी. प्रत्येक जातीची परीक्षा तिच्या आदर्शानुसार व तिच्याच मानदंडानुसार व्हावयास हवी. प्रत्येक देशांतील प्रत्येक चालीरीतीचें मूल्यमापन त्या देशांतील परिस्थिति व त्या देशांतील विचार यांच्या आधारानेच केलें पाहिजे. अमेरिकन लोकांच्या चालीरीती ह्या अमेरिकन लोक ज्या वातावरणांत राहतात त्याचा परिणाम आहेत; आणि भारतीय रीतीभाती ह्या भारतांतील लोक ज्या वातावरणांत राहतात त्याचा परिणाम आहेत. हाच न्याय चीन, जपान, इंग्लंड, आणि इतर सारीं राष्ट्रें ह्यांच्या चालीरीतींना लागू आहे.

आपल्यासाठी जें योग्य स्थान असतें त्या स्थानींच आपण असतों. जसा एखादा चेंडू त्याला योग्य असलेल्या छिद्रांत जाऊन पडतो तसेंच हें आहे. आणि एखाद्याची योग्यता इतरांपेक्षा अधिक असल्यास जगाला ती कळून येतेच, कारण या विश्वांत जुळणी,

व्यवस्था ही सारखी चालूंच असते. म्हणून कुरकुर करण्यांत कांही अर्थ नाही. एखादा श्रीमंत मनुष्य दुष्ट असेल, परंतु ज्यांच्या योगाने तो इतका श्रीमंत झाला असे कांही गुण त्याच्या अंगीं जरूर असले पाहिजेत; आणि दुसऱ्या एखाद्याच्या ठिकाणीं तेच गुण असतील तर तोहि धनाढ्य होईल. भांडणें, मारामाऱ्या करण्यांत, तक्रारी करण्यांत काय अर्थ आहे ? तक्रार केल्याने परिस्थिति थोडीच सुधारणार आहे? जो आपल्या वांट्याला आलेल्या सामान्य कामाविषयी कुरकुर करतो तो सर्वच कामांविषयी कुरकुर करील. नेहमी कुरकुर करणारा मनुष्य जीवनांत नेहमी दुःख भोगतो. तो कोणतेंहि काम हातीं घेवो, त्यांत त्याला यश म्हणून येत नाही. पण जो मनुष्य अंग मोडून आपलें कर्तव्य चोखपणें बजावतो तो यशस्वी होतो आणि त्याला अधिकाधिक उच्च कार्य करण्याची संधि मिळते.

# २

## स्वमतान्धता

स्वमतान्धतेचे अनेक प्रकार संभवतात. कांही लोक मदिरेच्या बाबतींत तर कांही लोक चिरुटांच्या बाबतींत स्वमतान्ध असतात. कांहींची अशी बालंबाल खात्री असते की लोकांनी जर चिरूट पिणें सोडून दिलें तर जगांत सत्ययुग अवतीर्ण होईल. अशा प्रकारच्या स्वमतान्ध व्यक्तींत विशेषेंकरून स्त्रियांचा भरणा असतो. येथें माझ्या वर्गांत एक स्त्री आली होती. अनेक स्त्रियांनी एकत्र येऊन शिकागो येथे एक घर बांधलें आहे व त्या घरांत कामगारांना घेऊन येऊन त्या स्त्रिया त्यांना संगीत ऐकवितात, कसरती शिकवितात. अशा स्त्रियांपैकी ती एक स्त्री होती. जगांतील वाईट गोष्टींविषयी बोलतांना एकदा ओघाओघांत ती म्हणून गेली की " मला वाइटावरचा तोडगा चांगल्या प्रकारें ठाऊक आहे ". त्यावर मीं विचारलें—"तुम्हांला तो कसा काय ठाऊक झाला? " ती उत्तरली, "तुम्हीं 'हल हाउस' बघितलें आहे काय? " तिच्या मतें तें 'हल हाउस' म्हणजे सर्व वाईट गोष्टी नष्ट करण्याचा एकमेव उपाय होय. तिची ही समजूत आता वाढतच जाईल. मला त्या स्त्रीची दया येते. भारतांत एका प्रकारचे कांही स्वमतान्ध लोक आहेत; त्यांना असें खात्रीपूर्वक वाटतें की स्त्रियांनी पतिनिधनानंतर पुर्नविवाह केला तर सगळ्या वाईट गोष्टी नाहीशा होतील. ह्यालाच स्वमतान्धता म्हणतात.

मी जेव्हा लहान होतों तेव्हा मला असें नेहमी वाटायचें की स्वमतान्धता ही एक प्रचंड कार्यप्रेरक शक्ति आहे, परंतु तसें कांहीएक नाही असें आता मोठें झाल्यावर मला वाटूं लागलें आहे.

दुसऱ्या एखाद्याची पिशवी चोरून काखोटीला मारून पळून जाण्यांत एखाद्या स्त्रीला गैर असें कांही वाटणार नाही, परंतु अशी

स्त्री कदाचित् धूम्रपान करीत नसेल. त्यामुळे धूम्रपानाच्या बाबतींत ती स्वमतान्ध बनते. अशा स्त्रीला एखादा पुरुष धूम्रपान करतांना आढळला तर तो पुरुष चिरूट पितो एवढ्याच कारणाखातर ती त्या पुरुषाबद्दल आपली तीव्र नापसंती व्यक्त करते. एखादा मनुष्य लोकांना सतत फसवीत असेल, त्याच्यावर मुळीच विश्वास ठेवतां येत नसेल, सर्व स्त्रियांना त्याच्यापासून धोका असेल, परंतु हा दुष्ट माणूस कदाचित् मद्यपान करीत नसेल. त्यामुळे त्याला जो मनुष्य मद्यपान करतो त्याच्या ठायीं लवमात्र चांगुलपणा आढळत नाही. पण तो स्वतः जीं दुष्कृत्यें करतो त्यांचें त्याला कांहीच वाटत नाही. हाच मनुष्याचा स्वाभाविक स्वार्थीपणा व एकांगीपणा होय.

आपण हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे की जगाचा शासनकर्ता असा एक ईश्वर आहे आणि त्याने हें जग मानवांच्या औदार्यावर सोडून दिलें नाही. ईश्वरच या जगाचा शासनकर्ता व पालनकर्ता आहे. आणि मदिरा, धूम्रपान, विवाह इत्यादि बाबतींत स्वमतान्ध असलेले कितीहि लोक होऊन गेले तरी हें जग असेंच चालू राहील. हे सगळे स्वमतान्ध लोक जरी नष्ट झाले तरीहि जगाचें कांही बिघडणार नाही.

'मे-फ्लॉवर' नामक जहाजांत बसून लोक येथें आले, स्थायिक झाले व स्वतःला 'प्युरिटन' (शुद्ध) म्हणवून घेऊं लागले. हा सगळा इतिहास तुम्हांला ठाऊक नाही काय ? सुरवातीस ते शुद्ध व चांगले होते यांत शंका नाही, पण नंतर ते दुसऱ्या लोकांवर अत्याचार करूं लागले. मानवी इतिहासांत सर्वत्र हाच प्रकार घडत आला आहे. जे स्वतः आपली जाचांतून सुटका करून घेऊन पळून जातात ते देखील संधि मिळतांच इतरांना छळूं लागतात.

अशा शंभर स्वमतान्ध व्यक्तींपैकी नव्वद व्यक्ति कोणत्या ना

कोणत्या तरी रोगाने पछाडलेल्या असतात; त्यांचें यकृत तरी बरोबर नसतें किंवा त्यांना अग्निमांद्याचा किंवा दुसरा कोणतातरी विकार जडलेला असतो. स्वमतान्धता हा एक प्रकारचा रोग आहे हें कांही दिवसांनी वैद्यांनाहि कळून येईल. ह्या रोगाचा प्रभाव मीं खूपच बघितला आहे. ह्या रोगापासून ईश्वर माझें रक्षण करो !

सर्व प्रकारच्या एकांगी, अतिरेकी सुधारणा वर्ज्य करणें हें जास्त शहाणपणाचें आहे असें माझें अनुभवान्तीं मत बनलें आहे. हें जग अगदी धिमेपणाने चाललें आहे; त्याला तसेंच चालूं द्या, तुम्हांला घाई कसली झाली आहे ? चांगली झोप घ्या, आणि आपले स्नायु चांगल्या स्थितींत ठेवा. चांगलें सकस, पौष्टिक अन्न खा व जगाबद्दल सहानुभूति बाळगा. स्वमतान्ध माणसें नुसता तिरस्कार करीत असतात. मद्यपानाचा निषेध करणारे स्वमतान्ध लोक बिचाऱ्या मद्यप्यावर प्रेम करतात असें तुम्हांला वाटतें काय ? बदला म्हणून आपल्याला कांहीतरी मिळावें अशी स्वमतान्ध मनुष्याची अपेक्षा असते आणि म्हणूनच तो स्वमतान्ध बनलेला असतो. हाणामारी संपतांच लुटालूट करण्यासाठी तो धावूं लागतो. जेव्हा तुम्ही स्वमतान्ध लोकांची संगत सोडाल तेव्हाच खरें प्रेम कसें करावें, इतरांबद्दल सहानुभूति कशी बाळगावी हें तुम्हांला कळूं लागेल. जसजसें तुमचें प्रेम व सहानुभूति हीं वाढतील तसतसें ह्या बिचाऱ्यांचा धिक्कार करणें तुम्हांला शक्य होणार नाही. उलट त्यांच्या दोषांबद्दलहि तुम्हांला सहानुभूति वाटूं लागेल. त्यानंतर मद्यपी हाहि तुमच्यासारखाच मनुष्य आहे असें तुम्हांला जाणवूं लागेल व मग त्याच्याबद्दल सहानुभूति बाळगणें तुम्हांला शक्य होईल. भोवतालच्या ज्या परिस्थितीमुळे त्याला तें व्यसन जडलें ती परिस्थिति तुम्हांला हळूहळू कळून येऊं लागेल आणि तुम्हांला असें वाटूं लागेल की,

आपण जर त्याच्या जागीं असतों तर आपण कदाचित् आत्महत्याहि केली असती. मला आठवते की, एक बाई मजकडे येऊन आपल्या पतीविरुद्ध तक्रार करूं लागली. तिचा पति भयंकर मद्यपी होता. मीं तिला उत्तर दिलें, "बाई, तुमच्यासारख्या जर दोन कोटी बायका असतील तर सगळेच पति मद्यपी होतील." माझी अशी अगदी खात्री झाली आहे की, बरेचसे पति जे मद्यपी होतात त्याला त्यांच्या बायकाच कारणीभूत होत असतात. मला येथे सत्य तेंच सांगावयाचें आहे. मला कुणाचीहि खोटी स्तुति करावयाची नाही. ह्या उच्छृंखल स्त्रियांना सोसणें, सहन करणें हें मुळी माहीतच नसतें. स्वातंत्र्याच्या खोट्या कल्पनांमुळे त्यांना असें नेहमीच वाटत असतें की पुरुषांनी नेहमी आपल्या ताटाखालचें मांजर बनून राहावें; पुरुष जर त्यांना न रुचणाऱ्या गोष्टी सांगूं लागले तर ह्या स्त्रिया कातावूं लागतात; अशा स्त्रिया म्हणजे जगाला मिळालेला एक शापच होय. त्यांच्यामुळे जगांतील अर्धेअधिक पुरुष आत्महत्या करीत नाहींत याचेंच मोठें नवल वाटतें! असले प्रकार चालू राहतां कामा नये. त्या स्त्रियांना वाटतें तितकें जीवन साधेंसुधें व सरळ नाही, तें अधिक गंभीर स्वरूपाचें आहे.

मनुष्य नुसताच श्रद्धाशील असूं नये, तर त्याची श्रद्धा ही बुद्धिनिष्ठ असावी. प्रत्येक गोष्ट जशीच्या तशीच स्वीकारायला व तिच्यावर विश्वास ठेवायला जर तुम्ही मनुष्याला भाग पाडाल तर लवकरच तो पागल होऊन जाईल. एकदा कोणींतरी एक पुस्तक माझ्याकडे धाडलें. मला असें बजावण्यांत आलें होतें की त्या पुस्तकांत जें जं छापलेलें आहे त्यावर मीं विश्वास ठेवलाच पाहिजे. त्या पुस्तकांत असें प्रतिपादण्यांत आलें होतें की, आत्मा नांवाची कांही वस्तु नसून स्वर्गांत देव व देवता राहतात आणि आपल्यापैकी

प्रत्येकाच्या मस्तकांतून निघालेली प्रकाशशलाका स्वर्गापर्यंत जाऊन पोहोचते. मला अशी शंका स्वाभाविकपणें आली की ह्या साऱ्या गोष्टी पुस्तकाच्या लेखिकेला कशा समजल्या ? तिला तें सारें स्फुरलें होतें म्हणे व मीं त्यावर विश्वास ठेवावा अशी तिची इच्छा होती. विश्वास ठेवायला मीं नकार देतांच ती मला म्हणाली--"तुम्ही अगदी दुष्ट असलां पाहिजे. तुमची सुधारणा होण्याची आशाच बाळगायला नको" ह्यालाच स्वमतान्धता म्हणतात.

# कर्म हीच उपासना होय

जीवन्मुक्त कर्म करूं शकत नाही, कारण जगाशीं बांधणारें असें कोणतेंच बंधन त्याच्या ठायीं उरलेलें नसतें; त्याच्या ठायीं आसक्ति नसते किंवा अज्ञानहि नसतें. असें सांगतात की एकदा लोहचुंबकाच्या एका पहाडाजवळून एक जहाज गेलें. त्या पहाडाने त्याचे सगळे लोखंडी खिळे, गज, पट्ट्या आकर्षून घेतल्या आणि जहाजाचे तुकडे तुकडे झाले. आपण अज्ञानी असेनोंपर्यंतच संघर्ष चालू असतो कारण खरें पाहतां आपण सर्वजण नास्तिक असतों. खरे आस्तिक कर्म करूंच शकत नाहीत. आपण कमीअधिक प्रमाणांत नास्तिक आहोंत. आपल्याला ईश्वराचें दर्शन होत नाही व ईश्वरावर आपला विश्वासहि नसतो. आपल्यापक्षीं ईश्वर म्हणजे ई, श्व, र अशीं केवळ तीन अक्षरेंच असतात. त्याहून अधिक कांही नाही. कांही विशिष्ट क्षणीं आपल्याला असें वाटूं लागतें की ईश्वर आपल्या समीप आहे, पण लगेच आपलें पतन होतें. ज्या वेळीं तुम्हांला ईश्वराचें दर्शन होतें, त्या वेळीं कोण कुणासाठी संघर्ष करणार ? ईश्वराला मदत करायची ! आमच्या भाषेंत अशी एक म्हण आहे की 'ह्या विश्वाच्या शिल्पकाराला आपण शिल्पविद्या शिकवूं शकूं काय ?' म्हणून सर्वोच्च कोटीचे महापुरुष कर्म करीत नाहीत. तुम्ही पुनः जगाबद्दलच्या ह्या खुळ्या कल्पना जेव्हा ऐकाल, आपण सर्वांनी ईश्वराला साहाय्य केलें पाहिजे, त्याच्यासाठी अमुक केलें पाहिजे, तमुक केलें पाहिजे हें सारें जेव्हा तुम्ही ऐकाल तेव्हा वरील गोष्ट लक्षांत ठेवा. असले विचार तुम्ही मनांत आणूं नका, कारण ते अत्यंत स्वार्थी होत. जें कांही तुम्ही करतां त्याचा संबंध तुमच्याशींच असतो; स्वतःच्या लाभासाठीच तुम्ही तें करीत असतां. ईश्वर

कांही खड्ड्यांत पडला नाही की त्याला तुमच्या आमच्या मदतीची गरज लागेल. एखादें रुग्णालय बांधून किंवा तसल्याच प्रकारचें एखादें काम करून आपण त्याला मदत करूं शकत नाहीं. ईश्वरच आपल्याला कर्म करण्याची संधि देतो. या जगद्रूपी प्रचंड व्यायामशाळेंत तुम्हीं आपले स्नायु बळकट करावे यासाठी तो तुम्हांला संधि देतो; ही जी संधि तुम्हांला मिळते ती तुम्हीं स्वतःला मदत करावी ह्या हेतूने मिळते--तुम्हीं ईश्वराला मदत करावी या हेतूने नव्हे. तुम्हीं मदत केली नाही तरी मुंगीचेंसुद्धा अडून राहणार नाही; तुमच्या मदतीवांचून ती मरेल असें का तुम्हांला वाटतें ? अशी कल्पना करणें म्हणजे भयंकर ईश्वरनिंदा होय. जगाला तुमची मुळीसुद्धा गरज नाही; जगाचे व्यवहार अखंडितपणें चालूंच आहेत, तुम्ही ह्या अपार सिंधूंतील बिंदूसारखे आहांत. ईश्वराच्या इच्छेशिवाय झाडाचें पान हलूं शकणार नाही, की वारा वाहूं शकणार नाही. ईश्वराला मदत करण्याची नव्हे, तर ईश्वरासाठी काम करण्याची आपल्याला संधि मिळाली आहे याबद्दल आपण धन्यता मानायला हवी. 'मदत' हा शब्द तुम्ही आपल्या मनांतून अगदी काढून टाका. तुम्ही ईश्वराला मदत करूं शकत नाही. 'मी ईश्वराला मदत करतों' असें म्हणणें ही ईश्वरनिंदा आहे. खरें म्हणजे तुम्ही येथे जें आहांत तें त्याच्याच इच्छेनें. तुम्हांला असें का वाटतें की तुम्ही त्याला मदत करतां ? नाही, तुम्ही त्याची पूजा करतां. तुम्ही जेव्हा अन्नाचा एखादा घास एखाद्या कुत्र्याला देतां तेव्हा तुम्ही कुत्र्याच्या रूपांत ईश्वराची पूजा करीत असतां. ईश्वर त्या कुत्र्यांत आहे. ईश्वर हाच कुत्रा झाला आहे. तोच सर्वकांही झाला आहे; तोच सर्वांत वसत आहे. त्याची पूजा करण्याची आपल्याला संधि मिळाली आहे ह्या आदरपूर्ण भावनेने समग्र विश्वाकडे

पाहा. असें केल्याने तुमच्या ठायीं संपूर्ण अनासक्ति बाणेल. असें वागणें हेंच तुम्हीं आपलें कर्तव्य मानलें पाहिजे; हाच कर्मविषयक यथार्थ दृष्टिकोन होय; कर्मयोगाने शिकविलेलें रहस्यहि हेंच होय.

## ४

# निष्काम कर्म

दिनांक २० मार्च १८९८ रोजीं ५७, रामकान्त बोस मार्ग, बागबाजार, कलकत्ता ह्या ठिकाणीं झालेल्या रामकृष्ण मिशनच्या बेचाळिसाव्या सभेच्या प्रसंगीं स्वामी विवेकानंदांनी 'निष्काम कर्म' ह्या विषयावर पुढील आशयाचें व्याख्यान दिलें :--

गीतेचा जेव्हा अगदी पहिल्याप्रथमच उपदेश केला गेला तेव्हा दोन संप्रदायांत मोठा वादविवाद चाललेला होता. वैदिक यज्ञयाग, पशुवध व अशाच प्रकारचीं कर्में ह्यांतच सगळा धर्म सामावलेला आहे असें एका पक्षास वाटे, तर दुसऱ्या पक्षाचें म्हणणें होतें की, अगणित अश्व व पशु यांचा वध करणें म्हणजे धर्म नव्हे. या दुसऱ्या पक्षांत संन्यासी व ज्ञानयोगाचे अनुयायी यांचाच प्रामुख्याने भरणा होता. सर्व प्रकारचा कर्मसंन्यास व आत्मज्ञानप्राप्ति हाच मोक्षाचा एकमेव मार्ग होय अशी त्यांची श्रद्धा होती. भगवंतांनी आपल्या गीतोपदेशाच्या द्वारें निष्काम कर्माची शिकवण देऊन परस्परांविरुद्ध लढणाऱ्या ह्या दोन्ही पक्षांतील मतभेद मिटविले.

पुष्कळांचें असें मत आहे की,जेव्हा महाभारत रचलें गेलें तेव्हा कांही गीता रचली गेली नाही, तर ती मागाहून महाभारतांतच समाविष्ट केली गेली आहे. परंतु, हें मत बरोबर नाही. गीतेची वैशिष्टयपूर्ण शिकवण महाभारताच्या इतर सगळ्या भागांतूनहि आपल्याला आढळते. त्यामुळे गीता ही मागाहून रचलेली आहे हें मत मान्य करावयाचें असेल तर महाभारतांत गीतोक्त उपदेश इतरत्र ज्या ज्या भागांत आढळतात ते ते सारे भाग प्रक्षिप्त मानावे लागतील.

आता, निष्काम कर्म म्हणजे काय ? आजकाल लोक असा अर्थ

करूं लागले आहेत की, निष्काम कर्म करणें म्हणजे एखाद्याने असें कर्माचरण करीत राहणें की ज्यायोगें कर्त्याच्या मनाला सुख वा दुःख ह्यांपैकी कशाचाच स्पर्श होणार नाही. आता, हा जर खराखुरा अर्थ असेल तर पशु निष्काम कर्म करतात असें म्हणावयाची पाळी येईल. कांही प्राणी आपलीं स्वतःचींच कच्चींबच्चीं खातात व तसें करतांना त्यांना तिळमात्र दुःख होत नाही. लुटारू, दरोडेखोर इतरांची मालमत्ता लुटतात, पण तसें करतांना जर त्यांच्या ठायीं सुखदुःखाची संवेदना उत्पन्न होत नसेल तर तेहि निष्काम कर्म करतात असें म्हणावें लागेल. निष्काम कर्माचा जर असा अर्थ असेल तर ज्यांचें अंतःकरण दगडाचें आहे असा अत्यंत अट्टल गुन्हेगार निष्काम कर्म करीत असतो असें मानावें लागेल. भितींना सुखःदुखादि भावना नसतात; दगडालाहि नसतात. पण म्हणून भित वा दगड निष्काम कर्म आचरीत असतात असें कांही म्हणतां येत नाही. वरील अर्थ ग्राह्य मानल्यास निष्काम कर्माचा हा सिद्धान्त म्हणजे दुष्टांच्या हातीं पडलेलें अमोघ शस्त्रच होय असें म्हणावें लागेल हे दुष्ट लोक दुष्कृत्यें करीत जातील व आपण निष्काम कर्म करीत असल्याचें जगभर सांगत सुटतील. निष्काम कर्माच्या सिद्धान्ताचा जर असा अर्थ असेल तर मग गीतेने एक भयानक सिद्धान्त प्रतिपादिलेला आहे असेंच म्हणावें लागेल. ह्या सिद्धान्ताचा खचितच असा अर्थ नाही. शिवाय असें की, गीतोपदेशाशीं निगडित असलेल्या व्यक्तींचें जीवन जर आपण अवलोकिलें तर आपल्याला असें आढळेल की त्या व्यक्ति अगदी वेगळेंच जीवन जगत होत्या. युद्धामध्ये अर्जुनाने भीष्मद्रोणांना मारलें हें खरें, परंतु त्याने स्वार्थ, स्वतःच्या साऱ्या आकांक्षा व स्वतःचें क्षुद्र व्यक्तित्व यांचा लक्षावधि वेळां त्याग केलेला होता.

गीता ही कर्मयोगाचा उपदेश करते. आपण आपलीं कर्में योगाच्या साह्याने म्हणजे एकाग्र चित्ताने करावयास हवींत.अशाप्रकारें एकाग्रचित्त होऊन केलेल्या कर्मामधे म्हणजेच कर्मयोगामधे क्षुद्र अहंभावाची जाणीवच उरत नाही. जेव्हा एखादा मनुष्य योगबुद्धीने कर्म करीत असतो तेव्हा त्याच्या ठायीं 'मी हें कर्म करीत आहें, मी तें कर्म करीत आहें' ही जाणीवच नसते. पाश्चिमात्य लोकांना याचें आकलन होत नाही. ते असें विचारतात की, ही अहंतेची जाणीवच जर गळून पडली, ही अहंताच जर नष्ट झाली तर मनुष्य कर्म कसें करूं शकेल ? परंतु, जेव्हा एखादा मनुष्य एकाग्र चित्ताने कर्म करतो, तो जेव्हा स्वतःविषयीची सर्व जाणीव विसरून कर्म करतो तेव्हा त्याच्या हातून घडणारें कर्म अनंतपटींनी चांगलें असतें. आणि हा अनुभव प्रत्येकाला आपल्या जीवनांत आलाच असेल. अन्नपचनादि कर्में आपण अजाणतां करीत असतों, कांही कर्में आपण जाणीवपूर्वक करीत असतों, आणि कांही कर्में जणु समाधिमग्न होऊन करीत असतों. त्या वेळीं आपल्या ठायीं क्षुद्र अहंभावाची जाणीव नसते. एखादा चित्रकार जर चित्र काढण्यांत संपूर्णपणें निमग्न झाला व त्याला जर आपल्या अहंतेचा संपूर्ण विसर पडला तर तो उत्तमोत्तम चित्रें काढूं शकेल. उत्तम स्वयंपाकी आपलें सगळें लक्ष हातांतील अन्नपदार्थांच्या सामग्रीवर केंद्रित करतो; कांही काळपावेतों त्याला इतर कशाचीहि जाणीव राहत नाही. परंतु ह्या सर्वांना आपापलीं विशिष्ट कर्मेंच अत्यंत चांगल्या प्रकारें करतां येतात, कारण तीं कर्में करण्याची त्यांना सवय झालेली असते. तथापि, गीतेचें सांगणें असें आहे की, सगळींच कर्में अशाच एकाग्र चित्ताने करावींत. जो योगाच्या द्वारें ईश्वराशीं एकरूप झालेला असतो तो आपलीं सर्व कर्में अशाच एकाग्र चित्ताने करतो. तो कधीहि स्वार्थ धुंडाळीत नाही.

अशा प्रकारें केलेल्या कर्मांमुळे जगाचें नेहमी कल्याणच होतें. अशा कर्मांमुळे अकल्याण कधीहि घडून येणार नाही. जे ह्या रीतीने कर्म करतात ते स्वतःसाठी कधीहि कांहीहि करीत नाहीत.

प्रत्येक कर्माचें फल हें चांगल्यावाइटाचें मिश्रण असतें. असें एकहि चांगलें कर्म नाही की ज्यांत वाइटाचा कांही ना कांही अंश नाही. अग्नीभोवती जसा धूर असतो तसेंच प्रत्येक कर्मांत कांही ना कांही वाईट असतेंच. ज्या कर्मांतून अधिकाधिक चांगलें निपजेल व कर्मीत कमी वाईट निपजेल अशींच कर्मे आपण केलीं पाहिजेत. अर्जुनाने भीष्म-द्रोणांना मारलें हें खरें; परंतु त्याने हें केलें नसतें तर दुर्योधनाचा पराजय करतां आला नसता आणि आसुरी शक्तीने दैवी शक्तीवर मात केली असती व अशा प्रकारें देशावर फार मोठी आपत्ति कोसळली असती. देशाची सारी सत्ता मूठभर गर्विष्ठ व धर्मभ्रष्ट राजे बळकावून बसले असते व परिणामीं जनतेच्या दुर्भाग्याला पारावार उरला नसता. तसेच श्रीकृष्णानेहि कंस, जरासंध व त्याच्यासारख्या इतर जुलमी राजांना यमसदनीं धाडलें हें खरें; परंतु त्याचें एकहि कृत्य स्वार्थी हेतूने झालेलें नव्हतें. त्याने जें जें केलें तें तें सारें परहितासाठी केलें. आपण मेणबत्तीच्या प्रकाशांत गीतेचें वाचन करतों, परंतु त्याच मेणबत्तीमुळे असंख्य बारीक बारीक कीटक मृत्युमुखीं पडत असतात. यावरून असें दिसतें की, प्रत्येक कर्माला कांही ना कांही वाईट चिकटलेलें असतेंच आपल्या क्षुद्र अहंभावाची जाणीव न बाळगतां जे लोक कर्मे करतात त्यांच्यावर वाइटाचा परिणाम होत नाही; कारण जगाचें कल्याण व्हावें ह्या हेतूनेच ते कर्म करीत असतात. निष्काम कर्म केल्याने, अनासक्तीने कर्म केल्याने कर्त्याला परमानंदाची व मुक्तीची प्राप्ति होते. कर्मयोगाचें हें रहस्य भगवान् श्रीकृष्णांनी भगवद्गीतेंत शिकविलें आहे.

---

## उच्च जीवनाची साधना

पूर्वावस्थेकडे गेल्यास (atavismमुळे) आपली अवनति होते; क्रमविकास झाल्यास आपली प्रगति होते. म्हणून पूर्वावस्थेकडे जातां कामा नये. येथे खुद्द माझें शरीर हाच अभ्यसनीय असा आद्य विषय आहे. आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनी सुधारावें ह्या अपेक्षेंतच आपण अतिशय गुंग झालेले असतों, आणि हीच तर खरी अडचण आहे. आपण आपल्या स्वतःच्या शरीरापासूनच प्रारंभ केला पाहिजे. हृदय, यकृत हीं स्वभावतः पूर्वावस्थेकडे जात असतात; त्यांना पुनश्च जाणिवेच्या क्षेत्रांत आणा, त्यांचें नियमन करा म्हणजे तीं तुमच्या आज्ञा पाळतील व तुमच्या इच्छेनुसार वागतील. असा एक काळ होता की जेव्हा आपल्या यकृतावर आपलें नियंत्रण चालत असे; एखादी गाय ज्याप्रमाणे आपलें सबंध कातडें हलवूं शकते त्याप्रमाणे आपण आपलें सारें कातडें हलवूं शकत होतों. अत्यंत दृढ अभ्यासाच्या साहाय्याने ज्यांनी आपल्या कातड्यावरील गेलेला ताबा पुनः परत मिळविलेला आहे असे कितीतरी लोक मीं पाहिलेले आहेत एकदा एखाद्या संस्काराचा ठसा उमटला की तो कायम टिकतो. नेणिवेंत दडलेल्या आपल्या सर्व पूर्वकर्मांना जाणिवेच्या क्षेत्रांत आणा, हाच आपल्या महत्त्वपूर्ण अभ्यासाचा पहिला धडा आहे. आणि तो आपल्या सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. उलटपक्षीं, केवळ जाणिवेचाच सतत अभ्यास करणें इष्ट नव्हे.

त्यानंतर आपल्या अभ्यासाचा आणखी असा एक भाग आहे की जो सामाजिक जीवनाच्या दृष्टीने तितकासा आवश्यक नाही, पण तो आपल्याला मुक्तीकडे घेऊन जातो. आत्म्याला मुक्त करणें, काळोखांत प्रकाश फाकवणें, कसेंहि करून खाली जमलेला गाळ

काढून टाकणें आणि अंधकाराला भेदून आपल्याला पुढे नेणें हें त्याचें प्रत्यक्ष कार्य असतें. अतींद्रिय ज्ञानाची अवस्था प्राप्त करून घेणें हेंच आपलें अंतिम ध्येय होय. जेव्हा ती अवस्था प्राप्त होते तेव्हा पृथ्वीतलावरील हाच मानव दिव्य बनतो, मुक्त होऊन जातो आणि मग सर्वातीत होण्याचें वळण मिळालेल्या मनापुढे हें विश्व हळूहळू आपलीं सारीं रहस्यें उघडीं करून दाखवितें. प्रकृतीच्या ग्रंथाचीं सारीं प्रकरणें आपण एकामागून एक वाचूं लागतों आणि शेवटीं आपल्याला तें अंतिम ध्येय प्राप्त होतें. मग जन्म-मृत्यूच्या फेऱ्यांतून बाहेर पडून, जेथें जन्म व मृत्यु ह्यांपैकी कांहीच उरलेलें नसतें अशा त्या एकमेवाद्वितीय सत्तेप्रत आपण जाऊन पोहोचतों व आपल्याला त्या सद्वस्तूचें ज्ञान होतें आणि आपण तिच्याशी एकरूप होऊन जातों.

ह्या साधनेसाठी पहिली आवश्यक गोष्ट जर कोणती असेल तर ती म्हणजे शांतता व शांतिमय जीवन ही होय. पोटाची खळगी भरून काढण्यासाठी जर मला दिवसभर चोहोकडे वणवण फिरावें लागणार असेल तर ह्या जीवनांत कोणतेंहि उच्च ध्येय गाठणें मला शक्य होणार नाहीं. पुढील जन्मांत मला कदाचित् अधिक अनुकूल परिस्थिति लाभेल. परंतु मीं जर अंतःकरणपूर्वक साधना केली तर याच जीवनांत परिस्थिति बदलून जाईल. तुम्हांला खरोखर अगदी अगत्याने एखादी वस्तु हवी होती व ती तुम्हांला मिळाली नाही असें कधी झालें आहे काय ? असें होणें कधीच शक्य नाही. कारण इच्छेनेच शरीर निर्माण होत असतें. खरें म्हणजे प्रकाशानेच तुमच्या डोक्यांत जणु दोन भोकें पाडलीं आहेत व त्यांनाच आपण 'डोळे' म्हणतों. जर प्रकाश अस्तित्वांत नसता तर तुम्हांला डोळेच लाभले नसते. तुमचे कानदेखील ध्वनीने निर्मिलेले आहेत, इंद्रियांचे

विषय प्रथम जन्माला आले व त्यानंतर तुमचीं इंद्रियें जन्माला आलीं. कांही लाख वर्षांच्या अवधींत विद्युच्छक्ति व इतर गोष्टी अनुभवण्यासाठी आपल्याला कदाचित् आणखी कांही इंद्रियें प्राप्त होतील. प्रशान्त मनःस्थितीच्या प्राप्तीची इच्छाच कोठे आढळत नाही. परंतु अशा इच्छेच्या परिपूर्तीची परिस्थिति जोंपर्यंत बाहेरच्या जगांत निर्माण होत नाही तोंपर्यंत अशी इच्छाच होत नाही. बाह्य वातावरणांतील वस्तु शरीरांत जणु छिद्रें निर्माण करते व त्यांच्या द्वारें ती मनांत शिरूं पाहते. म्हणून जेव्हा शांततामय जीवनाची ओढ मनांत उदित होईल तेव्हा मनोविकासासाठी अनुकूल असें सारें निश्चित घडून येईल. हें मी आपणांस स्वतःच्या अनुभवावरून सांगत आहें. अशी परिस्थिति कदाचित् हजारो जन्मांनंतर निर्माण होईल, परंतु निर्माण होईल हें मात्र निश्चित. ह्या इच्छेला चिकटून राह्य. तुमच्या इच्छेची पूर्ति करणारी वस्तु वा विषय हा आधीपासूनच बाहेरील वातावणांत नसेल तर तुम्हांला प्रवळ इच्छा होणारच नाही. अर्थात्, इच्छेइच्छेंतहि फरक असतो हें तुम्हीं ओळखलें पाहिजे. गुरुजी म्हणाले, "मुला, ईश्वर-प्राप्तीची इच्छा बाळगलीस तर ईश्वर येऊन तुला निश्चित भेटेल". परंतु शिष्याला गुरुजींचें बोलणें पूर्णपणें आकळलें नाही. एके दिवशीं दोघेहि एका नदीवर स्नानासाठी गेले. तेथे गुरुजी शिष्याला म्हणाले, "पाण्यांत बुडी मार". मुलाने बुडी मारली. एका क्षणांत गुरुजी-नीहि पाण्यांत उडी टाकली व त्यांनी मुलाला पाण्याच्या पृष्ठभागा-खाली दाबून धरलें. मुलाला ते वर येऊं देईनात. जेव्हा मुलगा वर येण्याचा प्रयत्न करून करून थकला तेव्हा गुरुजींनी त्याला सोडलें व विचारलें, "मुला पाण्याखाली असतांना तुला कसें काय वाटलें ?" मुलगा उत्तरला, "अरे बापरे, गुदमरल्यामुळे मी व्याकुळ झालों

होतों. श्वासोच्छ्वास घेतां यावा इतकीच इच्छा होती !" गुरुजींनी विचारलें,"मग ईश्वरदर्शनाची तुला तशी उत्कट इच्छा आहे काय ?" मुलगा उत्तरला, "नाही, महाराज". गुरुजींनी उपदेश केला, "तशी उत्कट इच्छा बाळग म्हणजे मग तुला ईश्वरप्राप्ति अवश्य होईल". ज्याच्यावांचून आपण जगूंच शकत नाही तें आपल्याला निश्चितच प्राप्त होईल. तें प्राप्त न झाल्यास जगणेंच अशक्य होऊन बसेल.

तुम्हांला जर योगी व्हावयाचें असेल तर तुम्ही स्वतंत्र असलें पाहिजे आणि जेथे तुम्ही एकटेच आहांत व जेथे तुम्ही सर्व प्रकारच्या काळज्यांपासून मुक्त आहांत अशा स्थानीं राहिलें पाहिजे. जो मजेंत व चैनींत राहूं इच्छितो व त्याबरोबरच जो आत्मज्ञानहि प्राप्त करूं इच्छितो असा मनुष्य म्हणजे नदीपार होण्याच्या इच्छेने लाकडाचा ओंडका समजून मगरीलाच धरणाऱ्या मूर्खाप्रमाणे होय. "ईश्वराच्या राज्याच्या आणि धर्माच्या प्राप्तीचा प्रथम प्रयत्न करा, मग या साऱ्या गोष्टी तुम्हांला आपोआप प्राप्त होतील." जो कशाची पर्वा करीत नाही त्याला सारेंकांही प्राप्त होतें. भाग्य हें एखाद्या उनाड स्त्रीसारखें असतें; जो मनुष्य भाग्याच्या मागे लागतो त्याला तें मिळत नाही, परंतु जो भाग्याची तमा बाळगत नाही त्याच्या मात्र तें पायाशीं लोळण घेतें. पैशाचेंसुद्धा असेंच आहे. जो त्याची पर्वा करीत नाही त्याला तो मिळतो व तोहि विपुल प्रमाणांत. प्रसिद्धीचेंहि असेंच आहे. जो तिची पर्वा करीत नाही त्याला ती अगदी नकोशी होईपर्यंत लाभते. परंतु, पैसा काय किंवा प्रसिद्धि काय ही नेहमी स्वतंत्र अशा धन्यालाच प्राप्त होतात; गुलामाला तीं कधीच प्राप्त होत नाहीत. ह्या गोष्टी असल्या वा नसल्या तरीहि जो जगू शकतो, ज्याचें जीवन जगांतल्या क्षुल्लक वा सामान्य गोष्टींवर कधीच अवलंबून नसतें त्यालाच धनी

म्हणावयाचें. एखाद्या ध्येयासाठी जगा---केवळ त्याच ध्येयाच्या प्राप्तीसाठी जगा. तें ध्येय इतकें मोठें, इतकें बलिष्ठ असूं द्या की मनांत तद्व्यतिरिक्त इतर कांहीच उरूं देऊं नका; दुसऱ्या कशालाहि अवसर देऊं नका, दुसऱ्या कशासाठीहि आपला वेळ दवडूं नका.

आपल्याला खूप पैसा मिळावा व आपण श्रीमंत व्हावें ह्या बुद्धीने आपल्या साऱ्या शक्ति, आपला सारा वेळ, आपली सारी बुद्धि, आपलें शरीर, आपलें सर्वस्व वेचतांना कांही लोक दिसतात ! त्यांना न्याहारी करायलाहि फुरसत नसते ! अगदी भल्या पहाटे ते घराबाहेर पडतात व तेव्हापासून त्यांच्या उद्योगाला सुरुवात होते ! त्यांच्यापैकी किमान नव्वद टक्के लोक तर धडपड करतां करतांच मरून जातात. उरलेल्यांपाशी पैसा जमा होतो पण त्याचा त्यांना उपभोग घेतां येत नाही. ही कशी गंमत आहे ! श्रीमंत होण्यासाठी प्रयत्न करणें वाईट आहे असें मी म्हणत नाहीं. तें छान आहे. तें उत्तम आहे. कां बरे ? त्यावरून काय दिसून येतें ? त्यावरून असें दिसून येतें की पैशाच्या प्राप्तीसाठी माणूस जितकी शक्ति खर्च करूं शकतो, जितकी धडपड करूं शकतो तितकीच तो मुक्तीसाठीहि करूं शकतो. आपल्यापाशी असलेला पैसाअडका, आपली सारी मालमत्ता हें सगळें आपल्याला मरणसमयीं येथेंच टाकून जावें लागतें हें आपल्याला कळत असतें आणि तरीदेखील ह्या साऱ्या गोष्टी गोळा करण्यासाठी आपण किती धडपड करीत असतों तें पाहा ! पण त्याच आपण मानवप्राण्यांनी, जें कधीच नष्ट होत नाही, जें आपल्यापाशी कायमचें राहतें तें प्राप्त करून घेण्यासाठी हजारोपट अधिक शक्ति खर्चूं नये काय ? आपलीं स्वतःचीं सत्कर्में, आपली स्वतःची आध्यात्मिक गुणसंपदा हा एकच मित्र मृत्यूनंतरहि परलोकांत आपली साथ करतो. बाकी सारें शरीरासह

इहलोकांतच राहतें.

ध्येयप्राप्तीसाठी खरीखुरी तळमळ बाळगणें ही पहिली महत्त्वाची पायरी होय. त्यानंतर साऱ्या गोष्टी सहजपणें घडून येतात. हें सत्य भारतीय मनाने शोधून काढलें, भारतांत सत्य-शोधनासाठी माणसें हवे तितके परिश्रम घेतील, जीवाचें रान करतील. परंतु इकडे पाश्चात्य देशांत मुख्य अडचण अशी आहे की, सगळेंच कांही अतिशय सोपें करून टाकलेलें आहे. येथें सत्यप्राप्ति हें ध्येय नाही, तर सुधारणा घडवून आणणें, विकास साधणें हें ध्येय आहे. सतत संघर्ष करणें हा एक मोठा धडा आहे. संघर्ष जीवनांतला फार मोठा लाभ होय हें लक्षांत असू द्या. त्यांतूनच आपल्याला आपला मार्ग काढायचा असतो. स्वर्गाला जाण्याचा जर एखादा रस्ता असेल तर तो नरकांतूनच आहे. नरकांतून स्वर्ग हाच नेहमीचा मार्ग असतो. जेव्हा जीव परिस्थितीशीं संघर्ष करतां करतां मृत्युमुखीं पडतो, ध्येयाच्या मार्गावर याप्रमाणे हजारो वेळां मृत्यु प्राप्त झाला तरी जेव्हा तो निर्भयपणें संघर्ष करीत करीत पुढे जातो व पुढे पुढेच जात राहतो तेव्हा तो महान् शक्तिशाली बनतो. आणि मग ज्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी तो संघर्ष करीत होता त्या ध्येयाचें त्याला हसू येतें, कारण त्याला कळून येतें की त्या ध्येयाहून तो स्वतः कितीतरी श्रेष्ठ आहे. मी--माझा आत्माच--माझें अंतिम ध्येय आहे, दुसरें कांहीहि नाही, कारण माझ्या आत्म्याशीं तुलना करतां येईल असें दुसरें काय आहे ? पिशवीभर सोनें आपल्याला मिळावें हें माझ्या आत्म्याचें कधीतरी ध्येय होऊं शकेल काय ? खात्रीने नाही ! माझा आत्मा हेंच माझें सर्वोच्च ध्येय आहे. माझ्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेणें हेंच माझ्या जीवनाचें एकमेव लक्ष्य होय.

जगांत सर्वस्वी वाईट असें कांहीएक नाही. येथे देवाप्रमाणेच सैतानालाहि स्थान आहे. नाही तर तो येथे राहिलाच नसता. आपण नरकांतून स्वर्गाप्रत जातों हें तर मी आपल्याला आताच सांगितलें आहे. आपल्या चुकांचाहि येथे उपयोग होतो. पुढे चला ! आपण कांहीतरी चुकीचें काम केलें आहे असें जरी तुम्हांला घटकाभर वाटलें तरी मागे वळून बघूं नका. जर त्या चुका तुमच्या हातून पूर्वी घडल्या नसत्या तर आज तुम्ही जसे आहांत तसे झालां असतां असें तुम्हांला वाटतें काय ? म्हणूनच चुकांचे आभार माना. नकळत त्या तुमच्या बाबतींत जणु देवदूत बनल्या आहेत. दुःखांनाहि धन्यवाद द्या ! सुखालाहि धन्यवाद द्या. तुमच्या नशिबीं कांहीहि आलें तरी त्याची पर्वा करूं नका. ध्येयाला चिकटून राहा. पुढे चला ! क्षुल्लक बाबींकडे आणि चुकांकडे पाहत बसूं नका. आपल्या ह्या युद्धभूमीवर चुकांचा धुरळा उडेलच. ही धूळहि सहन करूं न शकण्याइतके जे नाजूक असतील त्यांनी ह्या युद्धांतून सरळ काढता पाय घ्यावा.

म्हणून एखाद्या ऐहिक वस्तूच्या प्राप्तीसाठी तुम्ही जेवढा दृढ निश्चय दर्शवितां त्याच्या शतपटींनी अधिक दृढ निश्चय हा पूर्वतयारीचा पहिला टप्पा होय.

आणि मग त्याच्या जोडीला ध्यानाची आवश्यकता असते. ध्यान हीच अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. ध्यान करा ! ध्यान हीच सर्वश्रेष्ठ गोष्ट होय. ध्यानावस्था ही आध्यात्मिक जीवनाच्या सगळ्यांत जवळची अवस्था होय. आपल्या दैनंदिन जीवनांत ध्यानाचा क्षण हा असा एकच क्षण असतो की ज्या वेळीं आपण ऐहिकतेपासून पूर्णपणें अलिप्त असतों. या क्षणीं सर्व जड पदार्थांपासून अलिप्त राहून आत्मा स्वतःचेंच चिंतन करीत असतो. या क्षणीं आपल्याला आत्म्याचा अद्भुत संस्पर्श होत असतो.

शरीर हें आपला शत्रुहि आहे आणि मित्रहि आहे. दुःखदैन्याचें दृश्य तुमच्यापैकी कोण सहन करूं शकतो ? आणि तेंच दुःखदैन्य चित्रांत दिसल्यावर कोण सहन करूं शकत नाही ? तें दुःखदैन्य खोटें असतें म्हणूनच आपण त्याच्याशीं एकरूप होत नाही. तें केवळ एक चित्र आहे हें आपल्याला ठाऊक असतें; तें आपलें चांगलें किंवा वाईट करूं शकत नाही हें आपल्याला चांगल्या रीतीने माहीत असतें. पडद्यावर रेखाटलेल्या घोर दुःखाच्या चित्राने आपल्याला कदाचित् आनंदहि होऊं शकेल. चित्रकाराच्या कौशल्याची आपण स्तुति करूं; त्याच्या अद्भुत प्रतिभेचें आपल्याला आश्चर्य वाटेल. तें चित्र कितीहि भीषण असलें तरीहि हें रसग्रहण आपण करूं. ही अनासक्ति हेंच खरें रहस्य आहे. साक्षी व्हा !

जोंपर्यंत 'मी साक्षी आहें' ह्या अनुभवाप्रत तुम्ही पोहोचत नाही तोंपर्यंत प्राणायाम, योगाच्या शारीरिक क्रिया इत्यादि कशाचाच उपयोग नाही. एखाद्या अत्याचारी माणसाने तुमची मानगुटी घट्ट पकडून ठेवली तरीहि म्हणा, 'मी साक्षी आहें !' पुनःपुनः म्हणा, 'मी आत्मा आहें, मी चैतन्य आहें, बाह्य जगतांतील कोणतीहि वस्तु मला स्पर्श करूं शकत नाही.' जेव्हा मनांत वाईट विचार पिंगा घालूं लागतील तेव्हा त्यांच्या कपाळावर पुढील मंत्राचा घणाघात पुनःपुनः करा--"मी आत्मा आहें ! मी सदा आनंदमय साक्षी आहें ! कांही कर्म करण्याचें मला प्रयोजनच नाही, किंवा भोग भोगण्याचेंहि कारण नाही. माझ्या कर्माचा अंत झाला आहे. मी साक्षी आहें. मी जणु माझ्या स्वतःच्या चित्रशाळेंत आहें. हें विश्व म्हणजे माझा अजबखाना आहे. ह्या एकापुढे एक मांडलेल्या चित्रांकडे मी पाहत आहें. तीं चांगलीं-वाईट कशींहि असोत, तीं सगळीं चित्रें सुंदर आहेत. मला तें अद्भुत कौशल्य दिसतें,

जाणवतें. पण हें सर्व एकच आहे. त्या महान् विश्वचित्रकाराने रेखाटलेल्या ह्या अनंत शलाका आहेत !" खरें पाहतां कशाचेंच अस्तित्व नाही---संकल्पाचेंहि नाही आणि विकल्पाचेंहि नाही. तोच सर्वकांही आहे. तो ईश्वर---ती जगन्माता खेळत असून आपण सर्वजण म्हणजे तिला खेळांत मदत करणाऱ्या बाहुल्या आहोंत. ती ह्या क्षणीं एखाद्याला भिकारी बनवील, पुढच्या क्षणीं त्याला राजा बनवील. त्या चैतन्यमयी जगन्मातेला तिच्या खेळांत मदत करण्यासाठी आपण जणु वेगवेगळे वेष धारण करीत आहोंत.

एखादी लहान मुलगी खेळत असली की तिला आईने शंभर वेळां जरी बोलाविलें तरी ती येणार नाही, पण खेळ संपतांच ती आईकडे धावत जाईल आणि मग ती खेळणार नाही. अशाच प्रकारें आपल्या जीवनांतहि असे कांही क्षण येतात की जेव्हा आपल्याला असें वाटूं लागतें की आता आपला खेळ संपलेला आहे व म्हणून जगन्मातेकडे धावत जाण्याची आपल्याला इच्छा होते. त्या वेळीं, या जगांत आपण जी धडपड केलेली असते तिचें कांहीच मूल्य उरत नाही; पुरुप, स्त्रिया, मुलें, संपत्ति, नांवलौकिक, जीवनांतील वैभव व सुखें, जीवनांतील यश व दंड यांचेंहि त्या वेळीं मुळीच अस्तित्व उरत नाही आणि मग हें सगळें जीवन एखाद्या भासमान दृश्यासारखें वाटूं लागतें. ती अनंत लयबद्ध गति चालूं असल्याचें आपल्याला दिसतें, तिला कांही मर्यादा नाही, तिला कांही हेतु नाही. ती कुठे जाणार आहे तेंहि आपल्याला ठाऊक नसतें. आपण फक्त इतकेंच म्हणतों की आमचा खेळ समाप्त झाला आहे.

# विश्व आणि आत्मा

प्रकृतींतील सगळ्या वस्तु सूक्ष्म बीजरूपांतून निर्माण होतात, हळूहळू त्या अधिकाधिक स्थूल होतात, कांही काळ अस्तित्वांत राहतात व मग पुनः त्या मूळच्या सूक्ष्म रूपांत विलीन होतात. उदाहरणार्थ, आपली पृथ्वी ही मूळांत एखाद्या तेजोमेघासारखी (nebulaसारखी) होती. पुढे हळूहळू ती थंड झाली व त्यानंतर तिला आजचें घनीभूत असें हें ग्रहाचें रूप प्राप्त झालें आणि आपण तिच्यावर राहूं लागलों. भविष्यकाळांत ह्या पृथ्वीचे पुनः तुकडे-तुकडे होतील व पुनः तिला मूळचें तेजोमेघासारखें रूप प्राप्त होईल. ह्या गोष्टी विश्वांत अद्यापि घडत आहेत आणि त्या आनदि-काळापासून घडत आलेल्या आहेत. हाच मनुष्याचा सारा इतिहास आहे, हाच प्रकृतीचा सारा इतिहास आहे व हाच जीवनाचाहि सारा इतिहास आहे.

प्रत्येक क्रमविकासाच्या पूर्वी क्रमसंकोच घडून येत असतो. अवघा वृक्ष त्याच्या कारणभूत बीजांत विद्यमान असतो. संपूर्ण मानवप्राणी त्या मूळच्या जीवाणुकोषांत (protoplasm मधें) विद्य-मान असतो. हें सारें विश्व मूळच्या सूक्ष्म विश्वांत विद्यमान असतें. प्रत्येक वस्तु तिच्या कारणांत सूक्ष्मरूपानें विद्यमान असते. हा क्रम-विकास, अर्थात् मूळच्या सूक्ष्म रूपाला हळूहळू अधिकाधिक स्थूल रूप प्राप्त होण्याची ही प्रक्रिया खरी आहे; परंतु ह्या प्रत्येक प्रक्रियेपूर्वी क्रमसंकोच घडून आलेला असतो. हें सारें विश्व अस्तित्वांत येण्यापूर्वी क्रमसंकुचित अवस्थेंत असलें पाहिजे, त्यानंतर तें ह्या विभिन्न रूपांत प्रकट झालें, आणि पुनः ह्या विश्वाचा क्रम-संकोच होईल. उदाहरणार्थ, एखाद्या छोटयाशा रोपटयाच्या

जीवनाचा विचार करा. रोपट्याची वाढ व त्याचा विकास आणि त्याचा क्षय व नाश ह्या दोन गोष्टींमुळे त्या रोपट्याचें एकत्व आपल्याला जाणवतें. ह्या दोन गोष्टी मिळून एक सलग गोष्ट बनते आणि ती म्हणजे त्या रोपट्याचें जीवन. म्हणून रोपट्याचें जीवन हा जीवनसाखळीतील एक दुवा आहे असें जर आपण मानलें तर सूक्ष्म जीवाणुकोषापासून सुरू होऊन परिपूर्ण मानवी प्राण्यांत पर्यवसित होणारी ही साखळी म्हणजे एक संपूर्ण जीवन आहे असें मानतां येईल. या साखळीचा मनुष्य हा एक दुवा असून इतर निरनिराळे पशु, निकृष्ट प्राणी आणि वनस्पति हे सारे इतर दुवे आहेत. आता ह्या सर्वांच्या जीवनाला ज्या सूक्ष्मातिसूक्ष्म कणापासून प्रारंभ झाला त्या मूळ उगमस्थानाकडे मागे जा व सबंध साखळी म्हणजे जणु एकच जीवन आहे अशी कल्पना करा, म्हणजे तुम्हांला आढळून येईल की या परंपरेंतील प्रत्येक क्रमविकास हा पूर्वी अस्तित्वांत असलेल्या कशाचा तरी क्रमविकास आहे.

तो जेथून सुरू होतो तेथेच त्याचा अंत होतो. ह्या विश्वाची परिसमाप्ति कुठे होते?—चैतन्यांत, नव्हे काय? क्रमविकास-वाद्यांच्या मतानुसार सृष्टिप्रक्रियेंत अगदी सरतेशेवटीं जर कांही निर्माण होत असेल तर तें म्हणजे चैतन्य होय. हें जर खरें असेल तर चैतन्य हेंच सृष्टीचें कारण असलें पाहिजे, चैतन्यापासून सृष्टीचा प्रारंभ झाला असला पाहिजे. प्रारंभीं हें चैतन्य क्रम-संकुचित अवस्थेंत असतें व शेवटीं तेंच क्रमविकसित होतें. म्हणून विश्वांत दिसून येणारी सगळ्या चैतन्याची गोळाबेरीज ही स्वतःच विकसित होणारें तें क्रमसंकुचित अवस्थेंतील विश्वचैतन्यच असलें पाहिजे. या विश्वचैतन्यालाच आपण 'ईश्वर' हें नांव देतों. शास्त्रें सांगतात की आपण ईश्वरापासून निघतों आणि ईश्वरांतच शेवटीं

लीन होतो. तुम्ही त्याला दुसरें कोणतेंहि नांव द्या, तथापि प्रारंभीं तेंच अनंत विश्वचैतन्य असतें हें सत्य तुम्ही नाकारूं शकत नाही.

एखादी मिश्रवस्तु कशी तयार होते? जेव्हा कारणें एकत्र येऊन एकमेकांत मिसळतात व कार्यरूप वा परिणामरूप बनतात तेव्हा मिश्र वस्तु तयार होते. म्हणूनच ह्या सर्व मिश्र वस्तु कार्य-कारणभावाच्या नियमाच्या क्षेत्रांत असतात. जिथवर कार्य-कारणभावाचे नियम लागू पडतात तिथवरच आपल्याला मिश्र वस्तु आढळूं शकतात. परंतु, त्याच्या पलीकडे कोणताहि नियम लागू पडत नसल्यामुळे मिश्र वस्तु आढळणें अशक्य असतें. जें विश्व आपण पाहतों, अनुभवतों, ऐकतों, कल्पितों, ज्याचें आपण स्वप्न पाहतों त्या विश्वांतच नियम लागू पडतात. त्याच्या पलीकडे आपल्याला कोणत्याहि नियमाची कल्पनाच करतां येत नाही. ज्याची आपल्याला इंद्रियांच्या द्वारें संवेदना होऊं शकते वा ज्याची आपण कल्पना करूं शकतों तेंच आपलें विश्व असतें, आणि जें आपल्या प्रत्यक्ष अनुभवाच्या कक्षेंत येतें त्याचीच फक्त आपल्या इंद्रियांना संवेदना होऊं शकते. जें आपल्या मनांत असतें त्याचीच आपण कल्पना करूं शकतों, जें शरीरातीत असतें तें इंद्रियातीत असतें आणि जें मनाच्या अतीत असतें तें कल्पनातीत असतें. म्हणून तें आपल्या विश्वाच्या पलीकडे असतें, आणि म्हणूनच तें कार्यकारण-भावाच्या नियमाच्याहि पलीकडे असतें. मनुष्याचा आत्मा हा कार्यकारणभावातीत असल्यामुळे तो मिश्रणरूप असत नाही, तो कोणत्याहि कारणाचा परिणाम असूं शकत नाही व त्यामुळे तो नित्यमुक्त असून नियमांच्या कक्षेंत येणाऱ्या साऱ्या वस्तूंवर त्याची सत्ता चालते. तो मिश्रणरूप नसल्यामुळे तो कधीहि मरणार नाही. कारण मृत्यु म्हणजे घटकावयवांत परिवर्तित होणें होय आणि नाश

म्हणजे कारणाप्रत परत जाणें होय. आत्मा मरूं शकत नसल्यामुळे तो जगू शकत नाही; कारण जीवन आणि मृत्यु म्हणजे एकाच वस्तूचे दोन विभिन्न आविष्कार होत. म्हणून आत्मा हा जन्ममरणातीत आहे. तुम्ही कधीहि जन्मलां नव्हतां, तसेंच तुम्ही कधीहि मरणार नाही. जन्म व मृत्यु यांचा संबंध फक्त शरीराशींच असतो.

अद्वैतमत असें सांगतें की, जें जें कांही अस्तित्वांत आहे तें तें ह्या विश्वांतच आहे; स्थूल असो वा सूक्ष्म असो, जें कांही आहे तें येथेंच आहे; कारण व कार्य हीं दोन्हीं येथेच आहेत, त्यांचें स्पष्टीकरणहि येथेच आहे. जिला आपण 'व्यष्टि' म्हणतों ती 'समष्टी'चीच लहान रूपांतील आवृत्ति होय. आपल्या स्वतःचा अभ्यास केल्याने आपल्याला विश्वाची कल्पना येते; आणि आपल्या अंतर्जगताच्या बाबतींत जें खरें आहे तेंच बाह्य विश्वाच्या बाबतींतहि खरें आहे. स्वर्गादि लोकांविषयीच्या कल्पना खऱ्या आहेत असें गृहीत धरलें तरीहि त्या ह्या विश्वांतच आहेत. हें सर्व मिळून एक पूर्ण वस्तु (unit) तयार होते. म्हणून मूलभूत कल्पना ही समष्टीची वा सबंध वस्तूची असते. ही पूर्ण वस्तु अनेक लहान लहान अंशांची बनलेली असते, आणि आपल्यापैकी प्रत्येकजण म्हणजे जणु त्या पूर्ण वस्तूचा एक एक अंश आहे. व्यक्त रूपांत आपण सर्वजण एकमेकांपासून भिन्न भासतों हें खरें, तथापि वस्तुतः आपण सर्व एकच आहोंत. ह्या समष्टीपासून आपण वेगळे आहोंत असें जों जों आपल्याला वाटेल तों तों आपण अधिकाधिक दुःखी होऊं. म्हणून, अद्वैत हेंच नीतिशास्त्राचें अधिष्ठान होय.

---

७

## खरा गुरु कोणाला म्हणावयाचें ?

जो आध्यात्मिक शक्तीच्या भांडाराच्या रूपांत पुन:पुन: जन्म घेतो आणि जो ही आध्यात्मिक शक्ति गुरुशिष्यांच्या अनेक परंपरांच्या द्वारें भावी पिढ्यांच्या ठायीं संक्रामित करतो त्याला खरा गुरु म्हणावयाचें. ज्याप्रमाणे पाण्याचा एखादा प्रचंड प्रवाह आपला जुना मार्ग कायमचा सोडून नवीन मार्गाने वाहूं लागतो त्याप्रमाणेच आध्यात्मिक शक्तीचा हा प्रवाह वेळोवेळीं आपला मार्ग बदलतो. यावरून असें दिसतें की जुने धर्मपंथ कालान्तराने निष्प्राण होतात व नवीन पंथ उदयास येतात आणि त्यांच्यामध्ये नवजीवनाचें तेज भरलेलें असतें. जे खरे शहाणे पुरुष असतात ते ज्यांतून जीवनप्रवाह वाहत असतो अशा धर्मपंथाचा आश्रय घेतात. पदार्थसंग्रहालयांत ज्याप्रमाणे एकेकाळच्या प्रचंड प्राण्यांचे सापळे जतन करून ठेवलेले असतात त्याप्रमाणे हे जुने धर्मपंथ असतात. त्यांच्याविषयी योग्य तो आदर बाळगला पाहिजे. एखादा मेलेला आम्रवृक्ष ज्याप्रमाणे मनुष्याची रसाळ आंबे खाण्याची इच्छा तृप्त करूं शकत नाही त्याचप्रमाणे आत्म्याला लागलेली परमात्म-मीलनाची आस जुने धर्मपंथ पुरवूं शकत नाहीत.

आपल्याठायीं आध्यात्मिक ज्ञान आहे असा जो आपल्याला गर्व वाटत असतो तो प्रथमत: पूर्णपणें टाकून दिला पाहिजे आणि आपण मार्गदर्शनासाठी गुरूला पूर्णपणें शरण गेलें पाहिजे.आपल्याला कोणत्या मार्गाने पूर्णत्व लाभेल हें फक्त एकट्या गुरूलाच कळत असतें. तें जाणण्याची दृष्टिच आपल्याठायीं नसतें. आपल्याला कांहीच समजत नसतें. ह्या नम्रतेमुळे आपल्या हृदयाची कवाडें आध्यात्मिक सत्याच्या अनुभवासाठी उघडलीं जातील. जोपर्यंत

आपल्याठायीं लेशमात्र अहंकार आहे तोंपर्यंत सत्य आपल्या हृदयांत कधीच प्रवेश करणार नाही. ह्या अहंकाराच्या सैतानाला आपल्या हृदयांतून हाकलून देण्यासाठी तुम्हीं सर्वांनी झगडलें पाहिजे. संपूर्ण शरणागति हाच आध्यात्मिक ज्ञानप्राप्तीचा एकमेव मार्ग होय.

---

## ८

# कला

निसर्गाचें तपशीलवार आणि अगदी तंतोतंत अनुकरण करणें हें ग्रीकांच्या कलेचें रहस्य होय, तर याउलट, आदर्श अभिव्यक्त करणें हें भारतीय कलेचें रहस्य होय. ग्रीक चित्रकाराची सारी शक्ति मांसाच्या एखाद्या तुकड्याचें हुबेहुब चित्र काढण्यांत खर्च होते, आणि त्या चित्रकाराला इतकें यश लाभतें की, चित्रान्तर्गत तो मांसाचा तुकडा एखाद्या कुत्र्याला अगदी खरा वाटतो व तो त्याचा चावा घेण्यासाठी पुढे सरसावतो. आता, निसर्गाचें केवळ अनुकरण करण्यांत कोणता मोठेपणा आहे ? निसर्गानुकरण करण्याऐवजी एखादा खराखुराच मांसाचा तुकडा कुत्र्यापुढे कां ठेवीत नाही ?

उलटपक्षीं आदर्शाला, इंद्रियातीत गोष्टींना अभिव्यक्त करण्याची भारतीय कलेची जी प्रवृत्ति आहे ती अवनत होऊन भारतीय कला ओबडधोबड, वेड्याविद्र्या आकृत्या चितारूं लागली आहे. भुईकमळाचें फूल जमिनींतून वर येतें. तें आपला जीवनरस जमिनींतूनच शोषून घेतें, जमिनीशींच त्याचा संबंध असतो व असें असूनहि जमिनीपासून तें बरेंच वर असतें. खरी कला ह्या भुई-कमळाच्या फुलासारखी असते. कलेचा निसर्गाशीं संबंध अवश्य असावयास हवा, कारण हा संबंध तुटला की कलेची अधोगति होते; परंतु त्याचबरोबर कला ही निसर्गाच्या अतीतहि असली पाहिजे.

कला म्हणजे सौंदर्याची अभिव्यक्ति होय. प्रत्येक गोष्टींत कला असली पाहिजे.

शिल्पकृति आणि एखादी इमारत ह्यांच्यांतील फरक असा की, शिल्पकृति ही एखादी कल्पना प्रकट करते, तर इमारत म्हणजे केवळ अर्थशास्त्रीय तत्त्वांच्या आधारें केलेली रचना होय. एखाद्या

जड पदार्थाचें मूल्य हें तो कितपत एखादा भाव व्यक्त करूं शकतो ह्यावरच सर्वस्वी अवलंबून असतें.

आपल्या भगवान श्रीरामकृष्णांच्या ठिकाणीं ही कलादृष्टि फार मोठ्या प्रमाणांत विकसित झाली होती. आणि ते नेहमी असें म्हणत असत की, ह्या कलादृष्टीच्या अभावीं कोणालाहि खरीखुरी आध्यात्मिकता प्राप्त होणार नाही.

# ९

## संन्यासी

बोस्टन येथील एका भाषणांत 'संन्यासी' शब्दाची फोड करतांना स्वामीजी म्हणाले :—

ज्या एका विशिष्ट अवस्थेंत मनुष्य जन्माला आलेला असतो त्या अवस्थेसंबंधीचीं त्याचीं कर्तव्यें व त्याच्या जबाबदाऱ्या जेव्हा त्याने पार पाडलेल्या असतात, जेव्हा त्याच्या मनांत आध्यात्मिक जीवनासंबंधीची ओढ निर्माण होते, मालमत्ता जमवावी, कीर्ति मिळवावी, सत्ता हस्तगत करावी अशा प्रकारच्या ऐहिक धडपडी जेव्हा त्याने पूर्णपणें टाकून दिलेल्या असतात, जगाच्या स्वरूपाचें अंतर्भेदी दृष्टीने अधिकाधिक निरीक्षण केल्यावर जेव्हा त्याला जगाचा अशाश्वतपणा, त्यांतील संघर्ष, त्यांतील दुःख, त्यांतील यशांचा यःकश्चित्पणा इत्यादि सारें जाणवल्यामुळे तो त्यांपासून परावृत्त होतो तेव्हा तो तें शाश्वत सत्य, तें चिरंतन प्रेम व तें एकमेव अश्रयस्थान शोधूं लागतो. तो सर्व भौतिक पदांचा, मालमत्तेचा, नांवलौकिकाचा संपूर्णपणें 'संन्यास' (त्याग) करतो व आत्मत्यागाचें जीवन जगण्यासाठी तो जगांत इतस्तत: भ्रमण करतो. आध्यात्मिक ज्ञान संपादन करण्यासाठी, प्रेम व करुणा हे गुण जास्तींत जास्त प्रमाणांत अंगीं बाणविण्यासाठी आणि शाश्वत दिव्यदृष्टि प्राप्त करून घेण्यासाठी तो सदैव प्रयत्न करीत असतो. वर्षानुवर्षें ध्यान, तप आणि शोध केल्यानंतर जेव्हा हीं ज्ञानमौक्तिकें त्याला हस्तगत होतात तेव्हा तो गुरुपदावर आरूढ होतो आणि त्याच्याकडे येणाऱ्या सामान्य जनांमधे व शिष्यांमधे तो आपलें ज्ञान व साधुत्व संक्रमित करण्याचा शक्य तितका प्रयत्न करतो.

संन्यासी हा कोणत्याहि विशिष्ट धर्माचा नसतो, कारण

स्वतंत्रपणें विचार करणें व असे विचार सगळ्याच धर्मांतून स्वीकारणें हेंच त्याचें जीवन असतें. त्याचें जीवन हें प्रत्यक्ष अनुभूतीचें जीवन असतें, तें केवळ तात्त्विक सिद्धान्तांचें किंवा कांही समजुतींचें जीवन नसतें--सांचेबंद मतांचें तर नसतेंच नसतें.

---

## संन्यासी आणि गृहस्थाश्रमी

संसारी लोकांना संन्याशाच्या कार्यासंबंधी बोलण्याचा कांही अधिकार नाही. संन्याशाचा श्रीमंतांशीं संबंध नसावा. त्याचें कर्तव्य गरिबांसंबंधी असतें. त्याने गरिबांशीं अत्यंत प्रेमाने वागून त्यांची काळजी घ्यावयास हवी आणि आपल्या साऱ्या सामर्थ्यानिशी त्यांची मोठ्या आनंदाने सेवा करावयास हवी. श्रीमंतांची खुशामत करून त्यांच्यावर आश्रयार्थ विसंबून राहणें हा आपल्या देशांतील सगळ्या संन्यासी संप्रदायांचा एक मोठा दोष आहे. खऱ्या संन्याशाने ही गोष्ट साक्षेपाने टाळली पाहिजे. असें वागणें हें सर्वसंगपरित्याग केलेल्या संन्याशाला शोभत नाही; असलें वर्तन एखाद्या वारयोषितेच्या वर्तनासारखें असतें. कामकांचनाचा संपूर्ण त्याग हा ज्यांच्या जीवनाचा आदर्श आहे त्यांचा भक्त काम-काचनांत बुडालेला माणूस कसा होऊं शकतो ? श्रीरामकृष्ण अश्रु ढाळीत जगन्मातेची प्रार्थना करीत की, "हे जगदंबे ! माझ्याशीं बोलण्याकरिता अशी एखादी व्यक्ति पाठवून दे की जिच्या ठायीं काम-कांचनाचा लेशमात्रहि आढळणार नाही, कारण संसारांत गुरफटलेल्या लोकांशीं बोलण्याने माझे ओठ जणु पोळून निघतात." 'विषयी व अपवित्र अशा माणसांचा मला स्पर्शहि सहन होत नाही' असेंहि ते म्हणत असत. संन्यासीसम्राट श्रीरामकृष्णांचा प्रचार संसारी माणसें कधीच करूं शकणार नाहीत. असलीं माणसें पूर्णपणें निष्कपट कधीच असूं शकत नाहीत; कारण त्यांच्या मनांत कांही ना कांही स्वार्थी हेतु जरूर असतात. ईश्वराने जरी संसारी माणसाचा अवतार घेतला तरीहि त्याच्या निष्कपटतेवर माझा विश्वास बसणार नाही. जेव्हा एखादा संसारी माणूस एखाद्या धर्मसंप्रदायाच्या

प्रमुखाची भूमिका स्वीकारतो तेव्हा तो तत्त्वांच्या नांवाखाली स्वतःचे हितसंबंध जपूं पाहतो, तत्त्वांच्या आवरणाखाली स्वार्थ लपवूं पाहतो, आणि याचा परिणाम असा होतो की तो विशिष्ट संप्रदाय मुळापासून सडतो. ज्या ज्या चळवळीचे नेते गृहस्थाश्रमी होते त्या त्या धार्मिक चळवळींच्या नशिबीं हेंच आलें आहे. त्यागावांचून धर्म उभाच राहूं शकत नाही.

येथे स्वामीजींना कोणींतरी विचारलें—" 'कांचनाचा त्याग' ह्या शब्दप्रयोगापासून आम्हीं संन्याशांनी काय बोध घ्यावयाचा?" त्यावर स्वामीजींनी खालील उत्तर दिलें :—

आपल्याला जर कांही विशिष्ट उद्दिष्टें गाठावयाचीं असतील तर कांही विशिष्ट साधनांचा अवलंब करावा लागतो. स्थल, काल, पात्र इत्यादींनुसार साधनें बदलतात हें खरें, परंतु साध्यामधे कांहीच बदल घडून येत नाही. आत्म्याची मुक्ति साधणें व जगाचें कल्याण करणें हें संन्याशाचें ध्येय असतें—"आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च." हें ध्येय गाठण्याचीं जीं साधनें आहेत त्यांपैकी कामकांचनत्याग हें साधन सर्वांत महत्त्वाचें आहे. सर्व स्वार्थी हेतूंचा संपूर्ण अभाव म्हणजे त्याग होय हें लक्षांत असूं द्या. केवळ बाह्यतः संपर्क न ठेवणें म्हणजे त्याग नव्हे. उदाहरणार्थ, दुसऱ्यापाशी ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेला स्पर्श करावयाचा नाही, परंतु तिच्यापासून मिळणारे सगळे फायदे मात्र उपभोगावयाचे याला कांही त्याग म्हणतां येणार नाही. तो काय त्याग झाला ? मनु आदि शास्त्रकारांनी घालून दिलेल्या नियमांचें कांटेकोरपणाने पालन करणारे गृहस्थाश्रमी जर आपल्या भोजनांतील कांही भाग साधुबैराग्यांसाठी बाजूला काढून ठेवतील, तर संन्याशांनी उपर्युक्त दोन ध्येयें गाठण्यासाठी भिक्षावृत्ति वाळगून भ्रमण करणें हें पुष्कळ

उपयुक्त ठरेल. पण आजकाल परिस्थिति खूपच पालटलेली आहे. विशेषत: बंगालमधे माधुकरीची पद्धत आता दिसून येत नाही. माधुकरी मागून जगण्याचा जर येथे बंगालमधे प्रयत्न केला तर त्यापासून कांही निष्पत्ति तर होणार नाहीच, परंतु श्रम मात्र वाया जातील. शास्त्रकारांनी घालून दिलेला हा भिक्षेचा नियम म्हणजे वरील दोन ध्येयें गाठण्याचें एक साधन होय. अर्थात् तें साधन आज निरुपयोगी झालें आहे. अशा परिस्थितींत एखाद्या संन्याशाने जर जीवनाच्या अत्यावश्यक गरजांची तरतूद करून ठेवली व मग ज्या ध्येयासाठी त्याने संन्यास घेतला आहे त्याच्या प्राप्तीसाठी आपली सारी शक्ति वेचली तर तें संन्यासतत्त्वाच्या विरुद्ध मुळीच ठरत नाही. अज्ञानामुळे साधनांना अत्यधिक महत्त्व देण्याने गोंधळ मात्र निर्माण होतो. साध्यावरील आपलें लक्ष कधीहि विचलित होतां कामा नये.

## ११

# अधिकारवादांतील दोष

एकदा प्रश्नोत्तरवर्गांत बोलण्याच्या ओघांत अधिकारवादाचा मुद्दा उपस्थित झाला. अधिकारवाद म्हणजे विशेष अधिकारांचा सिद्धान्त. ह्या सिद्धान्तापासून उत्पन्न झालेल्या दोषांबद्दल अतिशय आवेशाने बोलतांना स्वामीजींनी पुढील आशयाचें भाषण केलें :

प्राक्कालीन ऋषींबद्दल माझ्या मनांत अत्यादर आहे. तथापि लोकांना उपदेश करण्यासाठी त्यांनी वापरलेल्या पद्धतीला दोष दिल्याशिवाय मला राहवत नाही. लोकांनी हें करावें, तें करावें असें ते लोकांना नेहमी बजावून सांगत असत, परंतु लोकांनी तसें आचरण कां करावें ह्याचें त्यांनी मुद्दाम स्पष्टीकरण केलें नाही. ही पद्धति मुळांतच घातक होती; आणि लोकांना आपापलीं ध्येयें गाठण्यास समर्थ करण्याऐवजी ह्या पद्धतीने त्यांच्या माथीं अर्थ-शून्य गोष्टींचें ओझें मात्र ठेवलें. लोकांच्या डोळ्यांसमोर ध्येय स्पष्टपणें न ठेवण्यामागे ऋषींचा युक्तिवाद असा होता की, जरी त्यांनी लोकांना तें ध्येय विशद करून सांगितलें असतें तरी लोकांना त्याचा खरा अर्थ कधीच कळला नसता, कारण ऋषींच्या मतें लोक तो अर्थ समजण्यास योग्य अधिकारी नव्हते. अधिकारवाद म्हणजे शुद्ध स्वार्थीपणाचें फळ होय. ह्या आपल्या खास विषयाचें जर आपण लोकांना अधिक ज्ञान दिलें, तो विषय जर आपण अधिक स्पष्ट केला तर लोकांचे उपदेशक म्हणून जें श्रेष्ठ स्थान आज आपल्याला लाभलेलें आहे तें आपण गमावून बसूं हें त्यांनी पक्केपणीं ओळखलें होतें. म्हणून अधिकारवादाला उचलून धरण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ह्या विषयाचें आकलन करण्याच्या दृष्टीने एखाद्या माणसाची बुद्धि मंद आहे असें जर आपल्याला आढळलें तर आपण

त्याला अधिकाधिक शिकविण्याचा प्रयत्न केला पाहिजे; त्याला कमी शिकविण्याचें धोरण सोडून देऊन त्याला अधिकाधिक शिक्षण द्यावयास हवें. असें केल्यास त्याच्या बुद्धीला शिक्षण-वळण लाभून अधिक सूक्ष्म प्रश्नांचें आकलन करण्यास ती समर्थ बनेल. मानवी आत्म्याचें सामर्थ्य अनंत असतें ह्या महान् सत्याकडे अधिकार-वादाच्या ह्या पुरस्कर्त्यांनी पूर्णपणें दुर्लक्ष केलें. मनुष्याला समजेल अशा भाषेंतून जर त्याला ज्ञान दिलें तर तो तें निश्चितच आत्मसात् करूं शकतो. एखाद्या शिक्षकाला आपला विषय लोकांना शिकवितां व पटवितां आला नाही तर लोकांना शिव्याशाप देण्याऐवजी, अज्ञानांत व भोळसट समजुतींत त्यांना घोरत पडूं देण्याऐवजी, उच्च ज्ञान त्यांच्यासाठी नाहीच अशी कांहीतरी सबब सांगण्याऐवजी, आपल्याला त्यांना समजेल अशा भाषेंत विषय नीटपणें शिकवितां येत नाही ह्या जाणिवेने त्याला दुःख झालें पाहिजे. जें कांही सत्य असेल तें न डगमगतां सांगा, त्या सत्यामुळे दुबळ्यांच्या मनाचा गोंधळ होईल असें भय मुळीच बाळगूं नका. माणसें अतिशय स्वार्थपरायण असतात. आपल्याइतकें ज्ञान दुसऱ्यांना मिळूं नये अशी त्यांची इच्छा असते, कारण इतर लोकहि आपल्याइतके जाणकार झाले तर आपल्याला लाभलेली प्रतिष्ठा व प्राप्त झालेले विशेषाधिकार गमावून बसण्याची पाळी आपल्यावर येईल अशी त्यांना भीति वाटत असते. सर्वोच्च अशा आध्यात्मिक सत्यांच्या ज्ञानामुळे दुबळ्या अंतःकरणाच्या लोकांच्या मनाचा गोंधळ उडेल अशी त्यांची कल्पना असते आणि म्हणूनच पुढील श्लोकांत म्हटलें आहे—

"न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।
योजयेत्सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् ॥"

अर्थात् "कर्माच्या ठायीं आसक्त झालेल्या अडाणी लोकांची बुद्धि (त्यांना ज्ञान देऊन) गोंधळून टाकूं नये; ज्ञानी पुरुषाने स्वत: योगबुद्धीने सर्व कर्मे करून तीं अडाण्यांना करावयास लावावीत." (गीता, ३, २६)

'प्रकाशामुळे अधिक अंधकार पसरतो' ह्या स्वविरोधी विधानावर माझा मुळीच विश्वास नाही. असें म्हणणें म्हणजे सच्चिदानंदरूप महासागरांत, अमरत्वाच्या महासागरांत मरण पावण्यासारखें आहे. किती हास्यास्पद आहे हें ! अज्ञानापासून होणाऱ्या चुकांपासून मुक्तता म्हणजे ज्ञान. म्हणे ज्ञान चुकांचा मार्ग मोकळा करून देतें ! म्हणें ज्ञानामुळे गोंधळ वाढतो ! हें कधीतरी शक्य आहे काय ? लोकांचा आदर आपण गमावून बसूं ह्या भीतीने माणसे विशाल स्वरूपाचीं सत्यें बोलावयास कचरतात. खऱ्याखुऱ्या व चिरंतन सत्यांची लोकांच्या खुळचट पूर्वग्रहांशीं तडजोड करण्याचा ते प्रयत्न करतात व अशा प्रकारें लोकाचार (लोकांमधे प्रचलित असलेल्या रूढि) व देशाचार (त्या त्या प्रदेशांत प्रचलित असलेल्या रूढि) हे पाळलेच पाहिजेत असा सिद्धान्त प्रतिपादितात. तडजोड मुळीच नको ! रंगसफेती नको ! फुलांखालीं प्रेतें झाकूं नका ! "तथापि लोकाचार:"—"तरीहि लोकांत प्रचलित असलेल्या रूढि पाळल्याच पाहिजेत" असले आदेश दूर भिरकावून द्या. काय हा मूर्खपणा ! ह्या तडजोडीचा परिणाम असा होतो की, भव्योदात्त सत्यें लवकरच निकृष्ट कल्पनांखाली गाडलीं जातात आणि ह्या निकृष्ट कल्पनांनाच लोक आग्रहपूर्वक यथार्थ सत्यें मानूं लागतात. श्रीकृष्णाने आपल्या गीतेंत अत्यंत निर्भयपणें प्रतिपादिलेलीं उदात्त सत्यें नंतरच्या काळांतील शिष्यांच्या हातीं पडतांच त्यांना तडजोडीचा रंग चढवण्यांत आला आणि त्यामुळे परिणाम असा

झाला की, जगांतील अत्यंत थोर अशा ह्या ग्रंथांतून आज अनेक अर्थ, अनेक गोष्टी काढून दाखविल्या जात असून त्यांमुळे लोक मात्र खऱ्या मार्गापासून दूर जात आहेत.

तडजोडीचा हा प्रयत्न शुद्ध भित्रेपणांतून निर्माण होतो. धीट व्हा ! निर्भय व्हा ! मुख्य गोष्ट ही की माझीं मुलें शूर झालीं पाहिजेत; कोणत्याहि कारणाखातर तडजोड करूं नका. उच्चतम सत्यें जगाला मोठ्याने ओरडून शिकवा. तुमच्याबद्दलचा इतरांचा आदर नष्ट होईल किंवा तापदायक संघर्ष निर्माण होईल अशी भीति मुळीच बाळगू नका. तुम्हीं सत्य टाकून द्यावें ह्यासाठी तुमच्यापुढे ठेवण्यांत आलेलीं प्रलोभनें लाथाडून जर तुम्हीं सत्याचीच उपासना केली, तर खात्री बाळगा की तुम्हांला दिव्य सामर्थ्य प्राप्त होईल. आणि मग ज्या गोष्टी खऱ्या नसल्याचें तुम्हांला खात्रीपूर्वक वाटतें अशा गोष्टींचा तुमच्यापुढे उच्चार करायचा धीरहि लोकांना व्हावयाचा नाही. तुम्हीं जर सतत चौदा वर्षें अखंडपणें सत्याची उपासना केली व सत्यापासून मुळीच ढळलां नाही, तर, त्यानंतर तुम्ही जें कांही म्हणाल त्यावर लोक विश्वास ठेवूं लागतील. अशा प्रकारें तुम्ही लोकांवर पुष्कळ उपकार कराल, त्यांचीं बंधनें दूर कराल आणि सबंध देशाचा उद्धार कराल.

---

# १२

## भक्तियोग

हातांत एखादी छडी घेऊन तुम्हांला शासन करावयास तयार असलेला ईश्वर मानल्याशिवाय तुम्हीं नीतिमान होऊं शकणार नाही असें द्वैतवाद्याला वाटतें. हें कसें काय ? कल्पना करा की गाडीला जुंपतात तसल्या घोड्यांपैकी एक मरतुकडा घोडा आहे. चाबकाचे फटके खायची त्याला सवयच झालेली आहे. किंबहुना फटका बसल्याशिवाय पुढे हलायचेंच नाही असा त्याचा स्वभाव बनलेला आहे. अशा एका घोड्याला 'नीतिमत्ता' या विषयावर माणसां-समोर व्याख्यान द्यावयाचें आहे. तो मनुष्यप्राण्यांविषयी बोलावयास सुरुवात करतो व म्हणतो--"मनुष्यप्राणी हे अत्यंत अनीतिमान असले पाहिजेत. कां म्हणून विचाराल तर त्याला माझें उत्तर असें की त्यांना नियमितपणें कोणी चाबकाने बडवून काढीत नाही." पण वस्तुत: चाबकाच्या भयामुळे मनुष्य अधिक अनीतिमान मात्र होतो.

तुम्ही सर्वच असें म्हणतां की ईश्वर आहे आणि तो सर्वव्यापक आहे. अमळ डोळे बंद करा व तो कसा आहे याचा थोडासा विचार करा. तुम्हांला काय आढळतें ? सर्वव्यापकत्वाची कल्पना मनापुढे आणण्यासाठी तुम्ही एकतर सागराची कल्पना करतां, किंवा निळ्या आकाशाची कल्पना करतां, किंवा हिरव्यागार गवताने आच्छा-दिलेल्या विस्तीर्ण मैदानाची कल्पना करतां, किंवा तुम्हीं आयुष्यांत पाहिलेल्या असल्याच कोणत्यातरी गोष्टीची कल्पना करतां. हें जर खरें असेल तर ईश्वर 'सर्वव्यापक आहे या तुमच्या शब्दांना कांहीहि अर्थ नाही. 'सर्वव्यापक ईश्वर' ह्या कल्पनेला तुमच्या दृष्टीने कांहीहि अर्थ नाही. हाच न्याय ईश्वराच्या इतर सर्व गुणांना लागू आहे. ईश्वराचें सर्वशक्तिमत्त्व व सर्वज्ञत्व ह्याविषयींची तरी आपली

कल्पना काय असते ?—कांहीच नाही. धर्म हा अनुभूतीचा विषय आहे. ईश्वराच्या स्वरूपाची जेव्हा अनुभूति घेऊं शकाल तेव्हाच मी तुम्हांला ईश्वराचा उपासक म्हणेन.त्यापूर्वी तुम्ही ईश्वर ह्या शब्दांतील फक्त अक्षरें जाणतां, इतकेंच. ह्या अनुभूतीच्या सामर्थ्यामुळेच धर्मलाभ होतो. तुम्ही शेकडो तत्त्वज्ञानें, अगणित सिद्धान्त, असंख्य नीतिशास्त्रग्रंथ हीं जरी डोक्यांत कोंबलींत तरी त्यांचा विशेष उपयोग होणार नाही. तुम्ही कसे आहांत व तुम्हांला कशाचा प्रत्यक्ष अनुभव आला आहे हीच महत्त्वाची गोष्ट आहे.

सगुण ईश्वर म्हणजे मायेच्या आवरणांतून घडलेलें त्या निर्गुण निरपेक्ष ब्रह्माचें दर्शन होय. जेव्हा आपण त्या निर्गुण ब्रह्माला पंचेंद्रियांच्या द्वारें आकळण्याचा प्रयत्न करतों तेव्हा त्याला आपण सगुण ईश्वराच्या रूपांतच अनुभवूं शकतों. तात्पर्य हें की आत्मा हा कधीच 'विषय' होऊं शकत नाही. ज्ञाता स्वतःच स्वतःला कसा जाणणार ? त्याचें फक्त जणु प्रतिबिंब पडूं शकतें व याला फार तर त्याचें विषयीभूत होणें म्हणतां येईल. या प्रतिबिंबांचें सर्वश्रेष्ठ रूप किंवा ज्ञात्याचा 'विषय' बनण्याचा सर्वश्रेष्ठ प्रयत्न म्हणजेच सगुण ईश्वर होय. आत्मा हा नित्यज्ञाता आहे, आणि आपण त्याला'विषय' बनविण्याचा सतत प्रयत्न करीत असतों.आणि त्या प्रयत्नांतून हें सारें दृश्य विश्व, सारें जडद्रव्य इत्यादि इत्यादि निर्माण झालें आहे. परंतु हे सगळे प्रयत्न निकृष्ट प्रकारचे आहेत. आत्म्याला विषयीभूत करण्याचा आपल्याला शक्य असलेला सर्वश्रेष्ठ प्रकार म्हणजे सगुण ईश्वर होय. आत्म्याला हें असें 'विषय' बनविणें म्हणजे आपल्या खऱ्या स्वरूपाचा आविष्कार करण्याचाच प्रयत्न होय. सांख्यांच्या मतें प्रकृति हे सारे अनुभव आत्म्याला प्रतीत करून देत असते व जेव्हा त्याला खरा अनुभव प्राप्त होतो तेव्हा त्याला निज-

स्वरूपाचें ज्ञान होतें. अद्वैत वेदान्ताच्या मतें आत्मा स्वतःला अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. दीर्घकाल प्रयत्न केल्यानंतर आत्म्याला कळून येतें की ज्ञाता हा नेहमी ज्ञाताच राहील, नंतर आत्मा अनासक्त होऊन मुक्त होतो.

मनुष्याला जेव्हा ती पूर्णावस्था प्राप्त होते तेव्हा तो सगुण ईश्वरासारखाच होऊन जातो. "मी व माझा पिता एकच आहोंत", त्या ब्रह्माशीं, परमात्म्याशीं आपण एकरूप आहोंत असें त्याला ज्ञान होतें व तो सगुण ईश्वराप्रमाणे स्वतःला विभिन्न रूपांत अभिव्यक्त करूं लागतो. एखाद्या अतिप्रतापशाली राजाने एखाद्या वेळीं बाहुल्यांशीं खेळावें त्याप्रमाणे तो क्रीडा करतो.

कांही कल्पना ह्या इतर कल्पनांमुळे उत्पन्न झालेलीं बंधनें तोडून टाकण्यास आपल्याला साहाय्य करतात. हें सारें विश्व ही देखील एक कल्पनाच आहे. परंतु एका प्रकारच्या कल्पना दुसऱ्या प्रकारच्या कल्पनांमुळे उत्पन्न होणारे दोष दूर करतात. ज्या कल्पना आपल्याला सांगतात की हें जग पाप, दुःख आणि मृत्यु यांनी भरलेलें आहे त्या कल्पना भयंकर होत. परंतु 'तूं पवित्र आहेस', 'ईश्वर आहे','दुःख मुळीच नाही'असें सांगणाऱ्या ज्या कल्पना आहेत त्या चांगल्या असून त्यांच्या साहाय्याने इतर कल्पनांचें बंधन आपल्याला तोडतां येतें. सर्व बंधनें तोडून टाकणारी सर्वश्रेष्ठ कल्पना म्हणजे सगुण ईश्वराची कल्पना होय.

ईश्वराच्या चरणाशीं बसून, "ईश्वरा, ह्या वस्तूला जप; ती वस्तु मला दे; ईश्वरा, मी तुझ्या चरणीं ही छोटीशी प्रार्थना अर्पितों आणि तू मला ही नित्याच्या गरजेची वस्तु दे; ईश्वरा, माझी डोकें-दुखी बरी कर, माझ्यासाठी हें कर, माझ्यासाठी तें कर" अशा विनवण्या करणें म्हणजे भक्ति करणें नव्हे. अशा विनवण्या

म्हणजे धर्माची सर्वांत निकृष्ट अवस्था होय. तें सर्वांत निकृष्ट प्रकारचें कर्म होय. मनुष्यानें आपलें सारें मानसिक सामर्थ्य शरीराचे चोचले पुरविण्यांत व शरीराच्या गरजा भागविण्यांतच वेचलें तर मग मनुष्यांत व जनावरांत फरक तो काय राहिला ? भक्ति ही याहून उच्च अशी गोष्ट आहे; स्वर्गाच्या इच्छेहूनहि ती उच्च अशी गोष्ट आहे. जेथें अत्यंत उत्कट सुखोपभोगांची प्राप्ति होते असें स्थान म्हणजे स्वर्ग होय. स्वर्गाबद्दलची हीच कल्पना आहे. मग स्वर्गप्राप्ति ही ईश्वरप्राप्ति कशी असू शकेल ?

फक्त मूर्ख लोकच इंद्रियभोगांच्या मागे धावत असतात. इंद्रियभोगांत जीवन व्यतीत करणें हें सोपें असतें. खाणें, पिणें आणि मजा करणें ह्या जुन्या चाकोरींतून धावत राहणें अधिक सोपें असतें; परंतु ह्या आधुनिक तत्त्वज्ञांचें तुम्हांला असें सांगणें आहे की ह्याच इंद्रियभोगाच्या कल्पना घ्या व त्यांच्यावर फक्त धर्माचें शिक्कामोर्तब करा की झालें ! असला सिद्धान्त मोठा घातक असतो. इंद्रियभोगांतच मरण आहे. आत्म्याच्या उच्च पातळीवर जगणें हेंच खरेंखुरें जीवन होय; दुसऱ्या कोणत्याहि पातळीवरील जीवन म्हणजे निव्वळ मरण होय. ह्या साऱ्या जीवनाचें वर्णन करावयाचें झालें तर जीवन हें एखाद्या व्यायामशाळेसारखें आहें असें म्हणावें लागेल. आपल्याला खऱ्याखुऱ्या जीवनाचा अनुभव घ्यावयाचा असेल तर आपण ह्या जीवनाच्या पलीकडे गेलें पाहिजे.

'मला शिवू नका' ही वृत्ति हाच जोंपर्यंत तुमचा धर्म आहे आणि स्वयंपाकाचें भांडें हेंच जोंपर्यंत तुमचें दैवत आहे तोंपर्यंत तुमची आध्यात्मिक उन्नति होणें शक्य नाही. धर्माधर्मांतील क्षुल्लक मत-भेद हे निव्वळ शाब्दिक मतभेद आहेत, त्यांच्यांत कांहीच अर्थ नाही. 'ही माझी स्वतंत्र, मौलिक कल्पना आहे' असें प्रत्येकालाच

वाटत असतें व सगळ्या गोष्टी आपल्या मतानुसार घडून याव्यात अशी त्याची इच्छा असते. अशा प्रकारें संघर्ष उत्पन्न होतात.

आपण जेव्हा दुसऱ्यावर टीका करतों तेव्हा आपल्या जीवनांतील एखादा उज्ज्वल अंश घेऊन व त्यालाच आपलें सारें जीवन समजून आपण त्याची दुसऱ्याच्या जीवनांतील वाईट अंशांशीं नेहमी तुलना करण्याचा मूर्खपणा करतों. याप्रमाणे आपण व्यक्तींचें मूल्य ठरविण्यांत चुका करीत असतों.

धर्मवेडेपणा व हटवाद ह्यांच्या साहाय्याने एखाद्या धर्माचा फार झपाट्याने प्रचार करणें शक्य आहे यांत शंका नाही. परंतु, ज्या धर्मांत प्रत्येकाला आपापलें मत व्यक्त करण्याचें स्वातंत्र्य आहे व त्यामुळे प्रत्येकाला आत्मोन्नति साधण्यास अवसर मिळतो अशा धर्माचा प्रचार भक्कम पायावर आधारलेला असतो; अर्थात् धर्मप्रचाराची ही रीत मंद गतीची आहे हें खरें.

प्रथम उभ्या देशांत (भारतांत) आध्यात्मिक विचारांचा पूर वाहवून द्या म्हणजे मग त्यांच्या मागोमाग इतर सारे विचार आपोआपच प्रसृत होतील. आध्यात्मिकता व आध्यात्मिक ज्ञान यांचें दान सर्वश्रेष्ठ होय, कारण तें मनुष्याला जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून वांचवितें; यानंतरचें दान आहे लौकिक ज्ञानाचें दान; कारण या ज्ञानाच्या योगाने मनुष्याची दृष्टि आध्यात्मिक ज्ञानाकडे वळते. प्राणदान हें तिसरें दान होय आणि अन्नदान हें चवथें दान होय.

साधना करतां करतां जरी देहपतन झालें तरी तें होऊं द्या, त्यांत भिण्याचें काय कारण? साधूंच्या सहवासांत सतत राहिल्याने कालान्तराने आत्मज्ञान जरूर होईल. अशी एक वेळ येते की जेव्हा एखाद्या माणसाला चिलीम तयार करून देऊन त्याची सेवा करणें हें लक्ष लक्ष ध्यानांपेक्षा देखील श्रेष्ठ होय असें साधकाला कळून

येतें. ज्याला उत्तम प्रकारें चिलीम भरतां येते त्याला योग्य प्रकारें ध्यानहि करतां येतें.

देवदेवता म्हणजे दुसरेंतिसरें कांही नसून उच्च अवस्था प्राप्त झालेल्या दिवंगत व्यक्तिच होत. त्यांच्यापासून आपल्याला मदत मिळवितां येते.

उठल्यासुटल्या प्रत्येकालाच कांही आचार्य वा गुरु बनतां येत नाही; परंतु मुक्त मात्र पुष्कळांना होतां येतें. मुक्त पुरुषाला सर्व जगत् स्वप्नवत् भासतें, परंतु आचार्याला ह्या दोन अवस्थांच्या मधली भूमिका स्वीकारावी लागते. जगत् खरें आहे हें ज्ञान त्याला असावें लागतें, नाहीतर त्याने शिकविण्याचें कार्य करण्याची आवश्यकताच कोठे उरली ? तसेंच जगत् स्वप्नवत् आहे हें जर त्याला प्रतीत झालेलें नसेल तर एखाद्या सामान्य माणसाहून त्याची पात्रता अधिक ठरत नाही आणि मग तो काय शिकवूं शकणार ? गुरूला शिष्याच्या पापांचा भार वाहावा लागतो, आणि म्हणूनच शक्तिशाली आचार्यांच्या शरीरांतहि रोग व इतर आजार दिसून येतात. जर गुरु पूर्णावस्थेला पोहोचलेले नसतील तर हे रोग गुरूच्या मनावरहि आक्रमण करतात व त्याचें मग पतन होतें; म्हणून आचार्य होणें ही कठीण गोष्ट आहे.

आचार्य होण्यापेक्षा जीवन्मुक्त होणें हें अधिक सोपें आहे, कारण जीवन्मुक्ताला जगत् हें स्वप्नवत् आहे हें कळलेलें असल्यामुळे त्याला जगाशीं कांहीच कर्तव्य नसतें; परंतु आचार्याला हें जग स्वप्नवत् आहे हें माहीत असूनहि या जगांत वावरावें लागतें व कार्य करावें लागतें. म्हणूनच आचार्य होणें हें प्रत्येकाला शक्य नसतें. ज्याच्या द्वारें ईश्वराची शक्ति कार्य करते तो खऱ्या अर्थानें आचार्य होय. आचार्याचें शरीर हें इतर कोणत्याहि माणसाच्या

शरीरापेक्षा सर्वस्वी भिन्न असतें. तें शरीर पूर्णपणें निर्दोष राखण्याचें एक विशिष्ट शास्त्र आहे. आचार्याचें सगळें शरीर मोठें नाजूक, अत्यंत संवेदनक्षम आणि अत्युत्कट दुःख व अत्युत्कट सुख यांचा अनुभव घेण्यास समर्थ असें असतें. आचार्य हा असामान्य असतो.

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत आपल्याला असें आढळून येतें की, व्यक्तीचें व्यक्तिमत्त्वच यशस्वी होत असतें, आणि हें व्यक्तिमत्त्व हेंच मान्या यशाचें रहस्य होय.

नवद्वीप येथील भगवान श्रीचैतन्य महाप्रभु यांच्याठायीं भावनांचा जेवढा अत्युदात्त आविष्कार आढळून येतो तेवढा दुसऱ्या कोणाच्याहि ठायीं आढळत नाही.

श्रीरामकृष्ण ही एक शक्ति आहे. त्यांचें मत अमुक आहे किंवा तमुक आहे असें तुम्ही समजूं नका. परंतु ते म्हणजे एक शक्ति असून ती शक्ति त्यांच्या शिष्यपरिवारांत अद्यापि विद्यमान असून जगांत कार्य करीत आहे.

# १३

## ईश्वर आणि ब्रह्म

स्वामी विवेकानंद युरोपांत असतांना त्यांना 'वेदान्त तत्त्वज्ञानांत ईश्वराचें नेमकें स्थान कोणतें ?' असा प्रश्न विचारला गेला असतां त्यांनी खालील आशयाचें उत्तर दिलें :–

व्यक्तींची समष्टि म्हणजे ईश्वर; तरीहि तो स्वत: व्यक्तिरूप आहे. जसें सबंध मानवी शरीर एक आहे, पण तदंतर्गत प्रत्येक जीवपेशी म्हणजे एक स्वतंत्र व्यक्ति आहे, तसेच हें आहे. समष्टि म्हणजे ईश्वर आणि व्यष्टि म्हणजे जीव. ज्याप्रमाणे शरीराचें अस्तित्व जीवपेशींवर व उलट जीवपेशींचें अस्तित्व शरीरावर अवलंबून असतें तद्वत् ईश्वराचें अस्तित्व जीवांच्या अस्तित्वावर अवलंबून असतें आणि जीवांचें अस्तित्व ईश्वरावर अवलंबून असतें. अशाप्रकारें जीव आणि ईश्वर हे बरोबरच अस्तित्वांत असतात; म्हणजे असें की जेव्हा एक अस्तित्वांत असतो तेव्हा दुसराहि अस्तित्वांत असलाच पाहिजे. ईश्वर हा समष्टिस्वरूप असल्यामुळे सर्वशक्तिमत्त्व व सर्वज्ञत्व हे त्याचे गुण स्पष्ट आहेत. ते सिद्ध करण्यासाठी निराळ्या युक्तिवादाची गरज नाही. ब्रह्म हें ह्या दोहोंच्या अतीत असून तें निरुपाधिक आहे. ब्रह्म हें अखंड एकरस असून त्यांत वेगवेगळे अंश नाहीत. जीवपेशीपासून तों ईश्वरापर्यंत सर्वांत व्याप्त असलेलें तें तत्त्व आहे. त्याच्या अभावीं कशाचेंच अस्तित्व संभवणार नाही. जें कांही सत्य आहे तें ब्रह्मच आहे. 'मी ब्रह्म आहें' असा जेव्हा मी विचार करतों तेव्हा केवळ मीच विद्यमान असतों; हाच न्याय सर्वांना लागू आहे. म्हणून प्रत्येकजण तेंच पूर्ण ब्रह्म आहे.

# ज्ञानयोग

सगळेच जीवात्मे क्रीडा करीत असतात. कांही जाणीवपूर्वक तर कांही अजाणतां. धर्म म्हणजे जाणीवपूर्ण क्रीडा करण्यास शिकणें.

जो नियम आपल्या ऐहिक जीवनास लागू पडतो तोच आपल्या धर्मजीवनास व विश्वाच्या जीवनासहि लागू पडतो. तो नियम एकच असून तो संपूर्ण विश्वाला लागू आहे. धर्माला एक विशिष्ट नियम लागू आहे व जगाल कांही वेगळाच नियम लागू आहे असें मुळीच नाही. मानव आणि सैतान हीं दोन्ही ईश्वराचींच रूपें आहेत; त्यांच्यांत आणि स्वतः ईश्वरांत फरक फक्त अभिव्यक्तीच्या प्रमाणाचा आहे.

मृत्यूनंतरहि मनुष्य जगतो ह्याचा पुरावा शोधून काढण्यासाठी पश्चिमेंतील धर्मज्ञ, तत्त्वज्ञ, आणि शास्त्रज्ञ सर्वप्रकारें प्रयत्न करीत आहेत. हें चहाच्या पेल्यांतील वादळच म्हणावयाचें ! विचार करण्यासाठी ह्याहून अधिक उच्च अशा गोष्टी आहेत. आपण मरतों हीच मुळी एक कमालीची खुळी समजूत आहे ! आपण मरणार नाहीं हें सांगायला कांही धर्मोपदेशक, भुतें, पिशाच्चें यांची आवश्यकता नसते. तें तर सर्वांत अधिक स्वयंसिद्ध सत्य आहे. आपल्या स्वतःच्या संपूर्ण नाशाची कोणत्याहि माणसाला कल्पना करतां येणार नाही; अमरत्वाची कल्पना ही मनुष्याच्या ठायीं स्वभावतःच विद्यमान असते.

जीवन आलें की त्याच्याबरोबर मरण हें ओघानेच आलें. जीवन ही मृत्यूची सावली होय व मृत्यु ही जीवनाची सावली होय. ह्या दोहोंतील सीमारेषा इतकी सूक्ष्म आहे की ती निश्चितपणें समजण्यासारखी नाही, तिची धारणा करतां येणें अत्यंत कठीण आहे.

आपली सतत एका सरळरेषेंत अखंडितपणें प्रगति होत आहे, आपला सतत विकास होत आहे ह्या कल्पनेवर माझा मुळीच विश्वास नाही. ती कमालीची मूर्खपणाची कल्पना असल्यामुळे तिच्यावर कसा विश्वास बसणार? गति ही कधीच सरळ रेषेंत नसते. सरळ रेषा जर अनंतापर्यंत वाढविली तर सरतेशेवटीं तिचें वर्तुळ बनतें. बाहेर पाठविलेली कोणतीहि शक्ति वर्तुळ पूर्ण करून शेवटीं प्रारंभबिंदूकडेच परत येते.

प्रगति ही कधीच सरळ रेषेंत नसते. प्रत्येक जीवात्मा जणु-कांही वर्तुळाकार फिरत असतो व त्याला तें वर्तुळ पूर्ण करावेंच लागतें. कोणताहि जीवात्मा कितीहि खाली गेला तरी केव्हा ना केव्हा तो वर येईलच. तो कदाचित् सरळ खालच्या दिशेने वाटचाल करूं लागेल, परंतु वरच्या बाजूला वळून वर्तुळ पूर्ण करणें त्याला भाग पडेल. आपण सर्वजण 'ईश्वर' ह्या एकाच केंद्रापासून दूर फेकले गेले आहोंत आणि वर्तुळ पूर्ण करून, ज्या केंद्रापासून आपण निघालों त्याच केंद्राप्रत शेवटीं परत येऊन पोहोचणार आहोंत.

प्रत्येक जीवात्मा म्हणजे एक वर्तुळ होय. ज्या जागीं शरीर असतें त्या जागीं त्याचें केंद्र असतें आणि तेथेच त्याचें कार्य दृग्गोचर होतें. आपण एकाच बिंदूत केंद्रीभूत झालों आहोंत अशी जरी तुम्हांला जाणीव होत असली तरीहि तुम्ही सर्वव्यापक आहांत. त्या केंद्राने जडद्रव्याचे कण गोळा केलेले असतात व स्वतःच्या आविष्कारासाठी त्यांच्यापासून एक यंत्र तयार केलेलें असतें. आविष्करणाच्या ह्या यंत्राला 'शरीर' म्हणतात. तुम्ही सर्वत्र विद्यमान आहांत. जेव्हा एखादें शरीर वा यंत्र तुमचें कार्य नीट करीत नाही तेव्हा तो केंद्रबिंदु पुढे सरकतो, पूर्वीपेक्षा अधिक सूक्ष्म किंवा अधिक स्थूल असे जड-द्रव्याचे कण तो गोळा करतो आणि त्यांच्या द्वारें कार्य करूं लागतो.

अशा प्रकारें जीवात्मा एक शरीर सोडून दुसरें धारण करतो. ही झाली मनुष्याची गोष्ट. आणि ईश्वर म्हणजे काय? ईश्वर म्हणजे असें एक वर्तुळ आहे की त्याचा परिघ कुठेच नाही, परंतु त्याचा केंद्रबिंदु मात्र सर्वत्र आहे. त्या वर्तुळांतील प्रत्येक बिंदु सजीव, चेतन आणि सारखाच क्रियाशील आहे. आपल्या जीवात्म्यांच्या बाबतींत फक्त एकच बिंदु चेतन असून तोच मागेपुढे फिरत असतो.

आत्मा हा एक वर्तुळ असून त्याचा परिघ कुठेच नसतो (तो अमर्याद असतो), पण त्याचें केंद्र मात्र कुठल्यातरी शरीरांत असतें. मृत्यु म्हणजे केवळ केंद्राचें स्थानान्तर होय. ईश्वर म्हणजे एक वर्तुळ असून त्याचा परिघ कोठेच नसतो, परंतु त्याचें केंद्र मात्र सर्वत्र असतें. जेव्हा आपण शरीराच्या सीमित केंद्राच्या बाहेर पडू शकू तेव्हा आपल्याला ईश्वराचा म्हणजेच आपल्या खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार होईल.

एक प्रचंड प्रवाह महासागराच्या रोखाने वाहत आहे व त्याच्याबरोबर कागदाचे लहानलहान तुकडे, गवताच्या काड्या हें सारें वाहून जात आहे. कागदाच्या तुकड्यांनी आणि गवताच्या काड्यांनी मागे परतण्याची खूप धडपड केली तरी सरतेशेवटी सागराला जाऊन मिळणें त्यांना भाग आहे. याचप्रमाणे ही सारी प्रकृति, तुम्ही, मी त्या जोरदार प्रवाहाबरोबर वाहत जाणाऱ्या गवताच्या काड्यांप्रमाणे आहोंत आणि आपण सर्वजण त्या जीवनाच्या व पूर्णत्वाच्या महासागराकडे––ईश्वराकडे––वाहत जात आहोंत. परत फिरण्याची वा प्रवाहाच्या विरुद्ध वाहत जाण्याची आपण खूप धडपड करूं, वाटेल तो प्रयत्न करूं, परंतु सरतेशेवटीं जीवनाच्या व आनंदाच्या ह्या प्रचंड महासागराला आपल्याला जाऊन मिळावेंच लागेल.

ज्ञान म्हणजे 'पंथनिरपेक्षपणा'; परंतु ह्याचा अर्थ असा मुळीच नव्हे की ज्ञान हें पंथाची हेटाळणी करतें. ह्याचा अर्थ फक्त इतकाच

की ज्ञान ही पंथांच्या पलीकडची अवस्था आहे. ज्ञानी (खरा तत्त्वज्ञ) कशाचाच विध्वंस करीत नसतो, तो सर्वांनाच मदत करतो.सगळ्या नद्या आपापलें पाणी सागराप्रत वाहून नेतात व शेवटीं सागराशीं एकरूप होतात. त्याचप्रमाणे सगळ्या पंथांनी ज्ञानाप्रत पोहोचून शेवटीं एक झालें पाहिजे. ज्ञान असें शिकवितें की जगाचा त्याग करावयास हवा, परंतु त्यासाठी जग सोडून जायचें असा त्याचा अर्थ होत नाही. जगांतच राहावयाचें, पण जगाचें व्हावयाचें नाही हीच त्यागाची खरी कसोटी होय.

सुरवातीपासूनच सगळें ज्ञान आपल्याठायीं विद्यमान असतें, ह्याहून कांही वेगळें कसें असू शकतें तेंच मला कळत नाही. जर तुम्ही व मी म्हणजे महासागरांतल्या छोटया छोटया लाटा असूं तर तो महासागर आपल्या पाठीशीं विद्यमान असलाच पाहिजे.

जडद्रव्य, मन व आत्मा ह्यांत खरोखर कांहीहि भेद नाही. त्या एकमेवाद्वितीय सत्याच्या अनुभवाच्या ह्या केवळ भिन्न भिन्न अवस्था होत. तें एकच जग पंचेंद्रियांच्या द्वारें जडद्रव्य म्हणून प्रतीत होतें. दुष्टांना तेंच नरकाच्या रूपांत दिसतें, सुष्टांना तें स्वर्गाच्या रूपांत दिसतें आणि पूर्णत्वाप्रत पोहोचलेल्या व्यक्तींना तें ईश्वर म्हणून प्रत्ययास येतें.

ब्रह्म हेंच एकमेव सत्य होय ही गोष्ट इंद्रियगम्य प्रयोगांनी सिद्ध करण्यासारखी नाही, परंतु हाच एकमेव निष्कर्ष निघू शकतो एवढें मात्र आपल्याला दाखवून देतां येईल. उदाहरणार्थ, सगळ्याच गोष्टींत हें एकत्व अवश्य झालें पाहिजे, अगदी सर्वसामान्य गोष्टींत-सुद्धा हें एकत्व असलें पाहिजे. उदाहरणार्थ, सर्व मानवांमध्ये मनुष्यत्वाच्या रूपाने हें एकत्व विद्यमान आहे. सारी विविधता नामरूपांमुळे निर्माण झालेली असते असें आपण म्हणतों; तरीहि

जेव्हा ती विविधता आपण पकडूं जातों व वेगळी करूं पाहतों तेव्हा मात्र ती कोठेंच आढळत नाही. नाम म्हणा, रूप म्हणा किंवा कारणें म्हणा, त्यांचें स्वतंत्र अस्तित्व असल्याचें आपल्याला कधीच दिसत नाही. या नामरूपात्मक विकाराला 'माया' म्हणतात. या मायेचें अस्तित्व निर्विकार सत्तेवर अवलंबून असतें आणि तिच्याहून स्वतंत्र असें अस्तित्व मायेला नसतें. महासागरांतील लाटेचें उदाहरण घ्या. जोंपर्यंत लाटेइतकें पाणी लाटेच्या रूपांत अस्तित्वांत असतें तोंपर्यंतच लाट अस्तित्वांत असते; परंतु तें पाणी खाली जाऊन एकदा सागराशीं एकरूप झालें की लाटेचें अस्तित्वहि संपुष्टांत येतें. परंतु अथांग पसरलेलें पाणी कांही लाटेच्या रूपावर तसें अवलंबून नसतें. लाटेचें रूप जरी शून्यवत् झालें तरी महासागर हा कायमच राहतो.

सत्य एकच आहे, मनामुळे तें अनेकविध भासतें, इतकेंच. विविधता दृष्टोत्पत्तीस येतांच एकता नष्ट होते; आणि एकतेचा अनुभव येतांच विविधता नाश पावते. जसें दैनंदिन जीवनांत जेव्हा तुम्ही एकता अवलोकितां तेव्हा तुम्ही विविधता अवलोकीत नाही, तसेंच हें आहे. सुरुवातीस तुम्हांला एकताच दिसत असते. एका अमेरिकन मनुष्याचा दुसऱ्या अमेरिकनाहून वेगळेपणा कोणता तें एखाद्या चिनी माणसाला कांही सांगतां येणार नाही; किंवा वेगवेगळ्या चिनी माणसांतील फरक तुम्हांला सांगतां येणार नाही. ह्या गोष्टी अमळ विचित्र असल्या तरी खऱ्या आहेत.

मनामुळेच वस्तु ज्ञेय होतात हें दाखवून देतां येऊं शकतें. ज्या वस्तूंच्या ठायीं विशिष्ट गुण असतात त्याच 'ज्ञात' व 'ज्ञेय' होऊं शकतात. जें निर्गुण असतें तें अज्ञेय असतें. उदाहरणार्थ, बाह्य जगत् हें अज्ञात व अज्ञेय आहे; समजा की तें 'क्ष' आहे. मी जेव्हा त्याच्याकडे पाहतों तेव्हा तें 'क्ष' + मन असें असतें. जग जाणून

घेण्याची जेव्हा मला इच्छा होते तेव्हा माझ्या ज्ञानाचा तीन-चतुर्थांश भाग मनानेच पुरविलेला असतो. अंतर्जगत् म्हणजे 'य'+ मन असतें व बाह्य जगत् म्हणजे 'क्ष'+ मन असतें. बाह्य जगतांतील व अंतर्जगतांतील सारे भेद मनामुळे निर्माण झालेले असतात, आणि जें खरोखर विद्यमान असतें तें अज्ञात व अज्ञेय असतें. तें ज्ञानाच्या सीमेच्या पलीकडे असतें व जें अशा प्रकारें ज्ञानाच्या सीमेच्या पलीकडे असतें त्यांत कोणताहि भेद असू शकत नाही. म्हणूनच बाहेरचा हा 'क्ष' आणि आंतला 'य' हे एकच होत, म्हणून सत्य हें एकच आहे.

ईश्वर युक्तिवाद करीत बसत नाही तुम्हांला ज्ञान झालें असल्यास युक्तिवादाची काय आवश्यकता आहे ? कांही मूठभर सत्यें गोळा करण्यासाठी आपल्याला किड्यांप्रमाणे हळूहळू सरपटत पुढे जावें लागतें, खूप परिश्रम करावे लागतात. हें आपल्या दुबळे-पणाचें स्पष्ट चिन्ह होय. आणि इतकें करूनहि गोळा केलेलीं तीं सत्यें पुन: कोलमडून पडतात तीं पडतातच. आत्म्याचें प्रतिबिंब मनांत व प्रत्येक वस्तूंत पडतें, आत्म्याच्या प्रकाशामुळेच मन सचेतन बनतें. सगळेंकांही आत्म्याचेंच व्यक्त रूप आहे; मनें म्हणजे जणु अगणित आरसे होत. तुम्ही ज्याला प्रेम, भीति, द्वेष, सद्गुण, दुर्गुण म्हणतां तीं सारीं आत्म्याचीच प्रतिबिंबें होत. आरसा जर निकृष्ट असेल तर प्रतिबिंबहि वाईट उमटतें.

खरी सत्ता (ब्रह्म) ही अव्यक्त आहे. आपल्याला तिची कल्पना करतां येत नाही, कारण आपल्याला सगळ्या कल्पना ह्या मनाच्या साहाय्यानेच कराव्या लागतात व खुद्द मन ही एक अभिव्यक्त वस्तु आहे. ती सत्ता अतर्क्य, अकल्पनीय आहे हाच तिचा महिमा आहे. आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे की प्रत्यक्ष

जीवनात प्रकाशाची अत्यंत तीव्र व अत्यंत मंद अशीं दोन्ही प्रकारचीं स्पंदनें आपण पाहूं शकत नाहीं. परंतु ह्या परस्परविरुद्ध टोकाच्या गोष्टी होत. अशा कांही गोष्टी आहेत की ज्यांचें आज आपल्याला ज्ञान नाही; परंतु त्यांचें ज्ञान आपल्याला होऊं शकतें. आपल्या अज्ञानामुळे आपल्याला त्या गोष्टी ठाऊक नाहीत इतकेंच. पण अशाहि कांही गोष्टी आहेत की ज्या आपण कधीच जाणूं शकणार नाही, कारण त्या आपल्या सर्वोच्च ज्ञानाच्या सीमेच्या पलीकडे आहेत. परंतु जरी आपण तें शाश्वत सत्य जाणूं शकत नाहीं तरी आपण सदैव तें शाश्वत सत्यच असतों. तेथे ज्ञान होणें अशक्य नसतें. कल्पनेचा समर्यादपणा हाच त्याच्या अस्तित्वाचा आधार आहे. उदाहरणार्थ, माझ्या आत्म्याव्यतिरिक्त दुसरें कांहीहि माझ्या ठायीं निश्चितपणें अस्तित्वांत नाही आणि तरीहि त्या आत्म्याची मी शरीर वा मन, सुखी वा दुःखी, स्त्री वा पुरुष अशा रूपांतच कल्पना करूं शकतों. आत्मा जसा आहे त्याच स्वरूपांत त्याची कल्पना करण्याचा मी प्रयत्न करतों, पण त्याला खालच्या पातळीवर ओढून आणल्याशिवाय मला त्याची कल्पनाच करतां येत नाही असें आढळून येतें. तरीहि आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल माझी खात्री असते. "प्रिये, पतीकरिता म्हणून कोणतीहि पत्नी पतीवर प्रेम करीत नाही, तर तो आत्मा पतींत असतो म्हणूनच प्रेम संभवतें. आत्म्याच्या द्वारें आणि आत्म्यासाठीच पत्नी ही पतीवर प्रेम करीत असते. प्रिये, कोणताहि पति हा पत्नीवर केवळ पत्नी म्हणून प्रेम करीत नाही, तर आत्म्याच्या द्वारें व आत्म्यासाठीच तो पत्नीवर प्रेम करीत असतो." तें शाश्वत सत्य वा आत्माच अशी एकमेव गोष्ट आहे की जी आपण जाणतो, कारण तिच्याच द्वारें आपल्याला सर्व वस्तूंचें ज्ञान होतें. आणि इतकें असूनहि त्या आत्म्याची आपण

कल्पनाहि करूं शकत नाहीं. ज्ञात्याला आपण कसे जाणू शकणार ? जर आपण त्याला जाणलें तर तो मुळी ज्ञाताच राहणार नाही, तो ज्ञेय बनून जाईल, त्याचें विषयीकरण होऊन जाईल.

ज्या मनुष्याला सर्वोच्च अनुभूति झालेली असते तो उद्गारतो, "मी राजांचा राजा आहें; माझ्याहून श्रेष्ठ असा कोणीहि राजा नाही. मी देवांचा देव आहे; माझ्याहून श्रेष्ठ असा कोणताहि देव नाही ! केवळ मीच विद्यमान आहें, मी एकमेवाद्वितीय आहें". वेदान्ताची ही अद्वैतकल्पना कित्येकांना महाभयंकर वाटते हें खरें, पण त्यांच्या खुळचट समजुतींमुळेच त्यांना तसें वाटत असतें.

आपण आत्मा आहोंत, सर्वदा शांत व निष्क्रिय आहोंत आपण रडतां कामा नये. आत्म्याला शोक कशाचा ? आपल्याला आपल्या कल्पनेनुसार असें वाटत असतें की, ईश्वर आपल्या सिंहासनावर बसून सहानुभूतीमुळे अश्रु ढाळीत आहे. असल्या ईश्वराच्या प्राप्तीसाठी धडपडण्यांत कांहीच मतलब नाही. ईश्वराला रडण्याचें मुळी कारणच काय ? रडणें हें दौर्बल्याचें, बंधनाचें चिन्ह आहे.

त्या सर्वोच्च आत्म्याचा शोध करा, सर्वदा त्याचाच शोध करा, कारण त्या सर्वोच्च आत्म्यांतच शाश्वत आनंद आहे. मला शिकारच करायची झाली तर मी सिंहाची शिकार करीन. दरोडाच घालायचा झाला तर मी राज्याच्या खजिन्यावरच घालीन. म्हणून त्या सर्वोच्च आत्म्याचाच शोध करा.

अहा, तो आत्मा बंधनातीत आहे, अवर्णनीय आहे ! आपल्या हृदयाच्या हृदयांत त्याचा अनुभव घेतां येतो ! तो तुलनेच्या पलीकडे आहे, तो सर्व मर्यादांच्या पलीकडे आहे, तो निळ्या आकाशाप्रमाणे अपरिवर्तनीय आहे ! हे साधो, त्या सर्वस्वरूप आत्म्यालाच जाण; दुसरें कांहीहि शोधू नकोस.

प्रकृतींतील परिवर्तनें त्याला स्पर्श करूं शकत नाहीत, तो विचारांच्या अतीत आहे,तो अपरिवर्तनीय,अविचल आहे. सर्व शास्त्रें त्याचें वर्णन करतात, सारे ऋषि-महर्षि त्याची उपासना करतात; हे साधो,त्या आत्म्याव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचाहि शोध करूं नकोस !

तो अखंड एकरस आहे, अनंत आहे, तुलनातीत आहे. त्याच्याशीं कुणाचीच तुलना होऊं शकत नाही. वर पाणी खाली पाणी, उजवीकडे पाणी, डावीकडे पाणी, त्या पाण्यावर लाट नाही की तरंग नाही, सगळें शांत, सगळा शाश्वत आनंद--अशी तुझ्या हृदयांत अनुभूति होईल दुसऱ्या कशाचाहि शोध करूं नकोस.

बंधो,तूं कशाला रडतोस ? तुला मृत्यु नाही किंवा व्याधि नाही. मग हे बंधो, कशाला रडतोस ? तुला दुःखहि नाही वा दुर्भाग्यहि नाही. बंधो, कशाला रडतोस ? तुझ्यांत परिवर्तन होईल किंवा तुझा मृत्यु होईल असें कधी कुणीं सांगितलें नाही ! तूं सत्यस्वरूप आहेस !

ब्रह्म म्हणजे काय तें मला ठाऊक आहे,पण त्याचें मी तुमच्या-समोर वर्णन करूं शकत नाही. ब्रह्म म्हणजे काय तें मी जाणत नाहीं, मग मी त्याचें वर्णन कसें करूं शकणार ? परंतु हे बंधो, तूं म्हणजे तेंच आहेस हें तुला दिसत नाही काय ? तूं तेंच आहेस हें तुला दिसत नाही काय ? ब्रह्माचा शोध करण्यासाठी इकडे-तिकडे कशाला व्यर्थ हिंडतोस ? शोधणें बंद कर, आणि तेंच ब्रह्म होय. स्वतःच्या स्वरूपांत प्रतिष्ठित हो.

तूंच आमचा पिता, तूंच आमची माता, तूंच आमचा परम-मित्र आहेस. तूंच जगाचा भार वाहतोस, आमच्या जीवनाचा भार वाहण्यास आम्हांला मदत कर. तूंच आमचा मित्र, तूंच आमचा प्रियकर, तूंच आमचा पति आहेस, तूंच आमचें स्वरूप आहेस !

## १५

## मायेचें कारण काय ?

मायेचें कारण काय हा प्रश्न गेलीं तीन हजार वर्षें विचारला जात आहे; आणि याला उत्तर हेंच की, यासंबंधी तर्कशुद्ध प्रश्न मांडणें जेव्हा जगाला शक्य होईल तेव्हा वरील प्रश्नाचें आम्ही उत्तर देऊं. हा प्रश्नच मुळी स्वविरोधी आहे. तें निरपेक्ष ब्रह्म केवळ वरकरणी सापेक्ष झालें आहे, तें निरुपाधिक ब्रह्म मायेंतच सोपाधिक झाल्यासारखें भासतें अशी आमची भूमिका आहे. तें ब्रह्म निरुपाधिक आहे असें मानल्यानेच त्यावर कशाचाहि परिणाम होऊं शकत नाही असें आपल्याला मानावें लागतें. ब्रह्म हें कारणरहित आहे, म्हणून त्यावर इतर कशाचाहि परिणाम होऊं शकत नाही. आता प्रथमत: जर तें निरुपाधिक असेल तर त्याच्यावर दुसऱ्या कशाचाहि परिणाम झालेला असणें शक्य नाही. निरुपाधिक ब्रह्मांत देश, काल व कार्यकारणसंबंध कांहीच असूं शकत नाही. हें मान्य केलें असतां तुमच्या प्रश्नाचें स्वरूप पुढीलप्रमाणे होईल---"ज्याला कोणतेंहि कारण असूं शकत नाही तें या रूपांत परिवर्तित होण्यास कारण काय ?" सोपाधिक वस्तूंच्या बाबतींतच तुमचा प्रश्न संभवतो. परंतु तुम्ही तो सोपाधिकाच्या क्षेत्राच्या बाहेर काढून निरुपाधिकाच्या बाबतींत विचारतां. निरुपाधिक ब्रह्म सोपाधिक झाल्यावर आणि देश, काल व कार्यकारणभाव यांचें कार्य होऊं लागल्यावरच हा प्रश्न विचारला जाऊं शकतो. आपण फक्त इतकेंच म्हणूं शकतों की अज्ञानामुळे मायेची उत्पत्ति होते. असला प्रश्न अशक्यच होय. निरपेक्ष ब्रह्मावर कशाचाच परिणाम होऊं शकत नाही. त्याला कांहीच कारण नाही. आपल्याला त्याचें ज्ञान नाही असें नव्हे अथवा आपण अज्ञ आहोंत असेंहि नव्हे; तर तें ब्रह्म ज्ञानातीत

आहे, त्याला ज्ञानाच्या खालच्या पातळीवर आणतां येणें शक्य नाही. "मी जाणत नाहीं" हे शब्द आपल्याला दोन अर्थांनी वापरतां येतात. एक अर्थ असा की आपण ज्ञानापेक्षा खालच्या पातळीवर आहोंत व दुसरा अर्थ असा की ती वस्तुच ज्ञानातीत आहे. क्ष-किरणें हीं आता ज्ञात झालीं आहेत. त्यांचीं कारणें अद्यापि निश्चितपणें ठाऊक नाहीत, परंतु पुढेमागे तीं जाणलीं जातील याबद्दल आपल्याला खात्री वाटते. येथे आपण म्हणूं शकतों की, क्ष-किरणांविषयी आपल्याला ज्ञान नाही. परंतु ब्रह्माविषयी आपण जाणूं शकत नाही. क्ष-किरणांच्या बाबतींत आपल्याला ज्ञान नाही, पण तीं ज्ञानाच्या कक्षेंत आहेत; फक्त अद्यापि आपल्याला त्यांचें ज्ञान झालेलें नाही इतकेंच. परंतु ब्रह्माच्या बाबतींत सत्य असें आहे की, तें ज्ञानाच्या इतकें अतीत आहे की तें ज्ञेय होऊंच शकत नाही. "कोणत्या साधनाच्या साहाय्याने ज्ञात्याचें ज्ञान होऊं शकेल ?" तुम्ही नेहमी तुम्हीच असतां, तुम्ही स्वतःला विषयीभूत करूं शकत नाहीं. अमरत्व सिद्ध करण्यासाठी आमच्याकडील तत्त्वज्ञान्यांनी जे युक्तिवाद मांडले होते त्यांत हा एक युक्तिवाद होता. मी मरून पडलों आहें असा विचार करण्याचा जर मीं प्रयत्न केला तर मला कोणती कल्पना करावी लागेल ? अशीच कल्पना करावी लागेल की मी उभा असून मी माझ्याकडेच—मेलेल्या शरीराकडे पाहत आहें. यावरून दिसून येतें की मी स्वतःला विषयीभूत करूं शकत नाहीं.

# १६

## क्रमविकास*

आकाश आणि प्राण यांचें व्यक्त रूपांत प्रक्षेपण आणि त्यांचा पुन: सूक्ष्म रूपांत लय ह्या विषयांच्या बाबतींत भारतीयांचे विचार आणि आधुनिक शास्त्रीय विचार यांच्यांत बरेंच साम्य आहे. आधुनिकांचा क्रमविकासाचा सिद्धान्त आहे आणि योग्यांचाहि क्रमविकासाचा सिद्धान्त आहे. पण मला असें वाटतें की क्रमविकासाचें योग्यांनी दिलेलें स्पष्टीकरण अधिक चांगलें आहे. "जात्यन्तरपरिणाम: प्रकृत्यापूरात् ।"--अर्थात् "एका जातीचें दुसऱ्या जातींत परिवर्तन हें प्रकृतीच्या पूर्तिक्रियेमुळे होत असतें". मूळ कल्पना अशी आहे की आपण एका जातींतून बदलून दुसऱ्या जातींत जातों व ह्या जातींपैकी मनुष्यजात ही सर्वश्रेष्ठ होय. पतंजलींनी ह्या 'प्रकृतीच्या पूर्तिक्रिये'चें स्पष्टीकरण शेताला पाणी देणाऱ्या शेतकऱ्याची उपमा देऊन केलें आहे. आपलें शिक्षण व आपली प्रगति म्हणजे केवळ मार्गातील अडथळे दूर करणें होय. हे अडथळे दूर होतांच मूळचें ब्रह्मस्वरूप आपोआप प्रकट होईल. जिवंत राहण्याठी चालणाऱ्या साऱ्या संघर्षांची ह्यामुळे आवश्यकता उरत नाही. जीवनांतील दु:खांचे अनुभव म्हणजे केवळ मार्गांत आढळणाऱ्या गोष्टी होत आणि त्या पूर्णपणें दूर करतां येऊं शकतात. क्रमविकासासाठी त्यांची आवश्यकता नसते. या गोष्टी

---

* २२ मार्च व २४ मार्च १८९६ ह्या दोन दिवशीं दुपारीं हार्वर्ड विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांशीं बोलतांना स्वामीजींनी प्रश्नांचीं जीं उत्तरें दिलीं त्यांतून कांही विषय ह्यापूर्वीच्या व ह्यानंतरच्या कांही टिपणांत उद्‌धृत केले आहेत. अप्रकाशित व्याख्यानें आणि प्रवचनें ह्यांतून घेतलेलीं टिपणें व उतारे हीं देखील जोडण्यांत आलीं आहेत.

नसल्या तरी आपली प्रगति चालूंच राहील. स्वत:चा आविष्कार करणें हा वस्तूचा स्वभावच आहे. ह्यासाठी आवश्यक असलेली शक्ति बाहेरून येत नसते, तर ती आंतूनच निर्माण होत असते. प्रत्येक आत्मा म्हणजे त्याच्या ठायीं जमा झालेल्या सर्वांना समान असलेल्या अनुभवांची गोळाबेरीज होय; आणि ह्या सर्व अनुभवांपैकी ज्यांना अनुकूल परिस्थिति लाभते तेवढेच प्रकट होतात.

म्हणून बाह्य वस्तु आपल्या भोवतालची परिस्थिति निर्माण करण्यापुरत्याच साहाय्यभूत ठरतात. ह्या सगळ्या स्पर्धा, झगडे, वाईट गोष्टी इत्यादि सारें क्रमविकासाचा परिणामहि नाही व कारणहि नाही, परंतु त्या केवळ मार्गांत घडणाऱ्या घटना होत. ह्या घटना घडल्या नसत्या तरीहि मनुष्य विकसित होत होत अंतीं ब्रह्मस्वरूप झाला असता, कारण बाहेर प्रकट होणें हा तर ब्रह्माचा स्वभावच होय. स्पर्धेच्या त्या महाभयंकर कल्पनेऐवजी ही कल्पना पुष्कळच आशादायक आहे असें मला वाटतें. मी इतिहासाचा जों जों अधिकाधिक अभ्यास करतों तों तों ती स्पर्धेची कल्पना सदोष असल्याचें मला जाणवतें. कांहींचें असें म्हणणें आहे की माणसांनी आपापसांत झगडा केला नाही तर त्यांची प्रगतिच होणार नाही. पूर्वी मलाहि असेंच वाटत असे; परंतु, आता मात्र मला असें दिसून येतें की आतापावेतों जितकीं युद्धें झालीं त्यांपैकी प्रत्येक युद्धानें मानवजातीची प्रगति पुढे नेण्याऐवजी ती पन्नास वर्षें मागेच ढकलली आहे. असा एक दिवस उजाडेल की ज्या दिवशीं मनुष्यप्राणी इतिहासाचा एका वेगळ्याच दृष्टिकोनांतून अभ्यास करूं लागेल व मग त्याला असें जरूर कळून येईल की स्पर्धा ही क्रमविकासाचें कारणहि नाही वा कार्यहि नाही; ती केवळ मार्गांत घडणारी एक घटना आहे. क्रमविकासासाठी तिची मुळीच आवश्यकता नाही.

मला वाटतें की पतंजलिप्रणीत सिद्धान्त हा एकच सिद्धान्त कोणत्याहि बुद्धिवादी मनुष्याला पटण्यासारखा आहे. आधुनिक विचारपद्धतीमुळे किती वाईट गोष्टी घडून येतात ! तिच्यामुळे प्रत्येक दुष्ट मनुष्याला दुष्ट होण्याची जणु सनदच मिळाली आहे. येथे (अमेरिकेंत) मीं कांही असे भौतिक शास्त्रज्ञ बघितले आहेत की जे म्हणतात की, सर्व गुन्हेगारांचा समूळ नाश केला पाहिजे व समाजांतून गुन्हेगारीवृत्तीची संपूर्ण हकालपट्टी करण्याचा हाच एकमेव मार्ग होय. अशा परिस्थितीमुळे प्रगतींत व्यत्यय येतो हें खरें; अशी परिस्थिति प्रगति होण्यासाठी आवश्यक आहे असें मुळीच नाही. ह्या स्पर्धेसंबंधी सर्वांत भयंकर गोष्ट ही आहे की, एखादा मनुष्य परिस्थितीवर मात करतो, परंतु त्याच्या त्या विजयामुळे इतर हजारो लोकांचा नाश होतो. म्हणून स्पर्धा ही वाईटच आहे. जी गोष्ट समाजांतल्या फक्त एखाद्या माणसाला साहाय्य करते व इतर बहुसंख्य लोकांची प्रगति थोपवून धरते ती गोष्ट कधीच चांगली असू शकत नाही. पतंजलींचें म्हणणें असें की हे सगळे संघर्ष आपल्या अज्ञानामुळेच होत असतात, ते मानवी विकासाचे घटक आहेत अथवा विकासास ते आवश्यक आहेत असें मुळीच नाही. आपल्या उतावळेपणामुळेच ते निर्माण होत असतात. आपला मार्ग शोधून काढण्याइतका आपल्याला धीर नसतो. उदाहरणार्थ, एखाद्या नाटकगृहाला आग लागली तर त्या आगींतून फारच थोडीं माणसें बचावतात. बाकीचीं सगळीं माणसें बाहेर पडण्याच्या धांदलीमुळे एकमेकांच्या पायांखाली चिरडलीं जातात. नाटकगृहाच्या, किंवा जे कोणी दोघेतिघे बचावले त्यांच्या रक्षणासाठी इतकीं माणसें चिरडलीं जाणें आवश्यक नव्हतें. जर सगळेच हळूहळू बाहेर पडले असते तर एकालाहि इजा झाली नसती. जीवनांतहि असेंच घडत

असतें.आपल्यासाठी दरवाजे उघडे असतात व त्यांमधून आपल्यापैकी सर्वांना स्पर्धा न करतां, धक्काबुक्की न करतां बाहेर पडणें शक्य असतें; आणि तरीहि आपण धक्काबुक्की करतोंच. आपणच आपल्या अज्ञानामुळे, उतावळेपणामुळे झगडे निर्माण करीत असतों, कारण आपल्याला फारच घाई झालेली असते. स्वत: शांत राहून स्वत:च्या पायावर उभे राहणें हाच सामर्थ्याचा सर्वोच्च आविष्कार होय.

## १७

# बौद्ध धर्म आणि वेदान्त

बौद्ध धर्म आणि भारतांतील इतर सर्व धर्ममतें ह्यांचा वेदान्त हाच आधार होय; परंतु ज्याला आपण आधुनिक अद्वैतदर्शन म्हणतों त्यांत बौद्धांचे बरेच निष्कर्ष अंतर्भूत आहेत. अर्थात्, हिंदूंना हें मान्य होणार नाही, विशेषेंकरून सनातनी हिंदूंना हें मुळीच मान्य होणार नाही; कारण त्यांच्या मतें बौद्ध म्हणजे नास्तिक होत. परंतु ज्यांत नास्तिकांचाहि समावेश होईल असें व्यापक रूप वेदान्ताला देण्याचा बुद्धिपूर्वक प्रयत्न चालू आहे.

खरें म्हणजे वेदान्ताचें बौद्धधर्माशीं कांहीच भांडण नाही. सर्वांचा समन्वय करणें हें वेदान्ताचें उद्दिष्ट आहे. उत्तरेकडील बौद्धांशीं आमचा कांहीच झगडा नाही. परंतु ब्रह्मदेशांतील, सयामांतील व दक्षिणेंतील बौद्धांचें असें म्हणणें आहे की दृश्यमान विश्वच अस्तित्वांत आहे, आणि या दृश्यमान विश्वाच्या मागे अपरिवर्तनीय सत्ता आहे, असें मानण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे? ह्याला वेदान्ताचें उत्तर असें की हें विधानच खोटें आहे.एक दृश्यमान विश्व आहे व दुसरी एक अपरिवर्तनीय सत्ता आहे असें वेदान्त कधीच म्हणत नाही. एकच वस्तु अस्तित्वांत आहे.इंद्रियांच्याद्वारें पाहिल्यास ती वस्तु दृश्यमान विश्वाच्या रूपांत दिसते, परंतु खरें पाहतां ती सर्वदा अपरिवर्तनीयच असते.ज्या मनुष्याला दोरी दिसते त्याला साप दिसत नाही,तो एक साप तरी असेल किंवा दोरी तरी असेल, एकाचवेळीं दोन्हीं कधीच असूं शकणार नाहीत. म्हणून आम्हीं दोन सत्ता मानतों असें बौद्धांचें आमच्याविषयी जें विधान आहे तें सपशेल खोटें आहे. हें दृश्यमान विश्वच अस्तित्वांत आहे असें वाटल्यास त्यांनी म्हणावें, परंतु ती अपरिवर्तनीय सत्ताच अस्तित्वांत आहे असें म्हण-

ण्याचा इतरांना हक्क नाही असें प्रतिपादन करण्याचा मात्र त्यांना अधिकार नाही.

दृश्यमान विश्वाव्यतिरिक्त बौद्धधर्माला दुसरें कांहीहि मानावयाचें नाही. ह्या दृश्यमान विश्वांतच वासना असते. ही वासनाच हें सारेंकांही निर्माण करीत आहे. आधुनिक वेदान्ती हें सगळें मान्य करीत नाहीत. आम्ही असें म्हणतों की असें कांहीतरी आहे की जें इच्छाशक्ति बनलें आहे. इच्छाशक्ति हें एक कार्य आहे. ती एक मिश्र वस्तु आहे, ती अमिश्र असें मूलतत्त्व नाही. बाह्य वस्तूच्या अस्तित्वाशिवाय इच्छाशक्ति असूंच शकत नाही. इच्छाशक्तीने हें विश्व निर्मिलें हा सिद्धान्तच संभवत नाही. इच्छाशक्ति ही विश्वनिर्मिति कशी करणार ? बाह्य प्रेरणा असल्याशिवाय इच्छाशक्ति अस्तित्वांत असू शकते काय ? प्रेरणेशिवाय वासना उद्भवूंच शकत नाही, किंवा तत्त्वज्ञानाच्या आधुनिक परिभाषेंत सांगावयाचें म्हणजे स्नायविक उत्तेजनेशिवाय वासना उद्भवूं शकत नाही. इच्छाशक्ति ही मेंदूची एक प्रतिक्रिया असून तिलाच सांख्य तत्त्वज्ञानांत 'बुद्धि' असें म्हटलें आहे. ह्या प्रतिक्रियेपूर्वी कोणती तरी क्रिया होणें आवश्यक असते व अशी क्रिया बाह्य विश्वाचें अस्तित्व गृहीत धरते. बाह्य विश्व नसेल तर साहजिकच इच्छाशक्ति असणार नाही; आणि तरीहि तुमच्या सिद्धान्तानुसार इच्छाशक्तीनेच विश्व निर्माण केलें आहे. इच्छाशक्ति कोण निर्मितो? इच्छाशक्ति व विश्व हीं दोन्ही एकाच वेळीं अस्तित्वांत असतात. ज्या एका प्रेरणेने हें विश्व निर्माण केलें त्याच प्रेरणेने इच्छाशक्ति देखील निर्माण केली. परंतु, एवढाच विचार करून तत्त्वज्ञानाने थांबतां कामा नये. इच्छाशक्ति ही संपूर्णपणें व्यक्तिनिष्ठ असते, त्यामुळे आम्ही शोपेनहॉरशीं मुळीच सहमत होऊं शकत नाहीं.

इच्छाशक्ति ही एक मिश्र वस्तु आहे, ती आंतर व बाह्य यांचें मिश्रण आहे. कल्पना करा की एखादा मनुष्य इंद्रियरहित अवस्थेंत जन्माला आलेला आहे; मग त्याला इच्छाशक्ति मुळीच असणार नाही. इच्छाशक्तीसाठी कोणती तरी बाह्य वस्तु आवश्यक असते व मेंदू तिला आंतून शक्ति पुरवितो; म्हणूनच इच्छाशक्ति ही एक मिश्र वस्तु आहे. एखादी भिंत किंवा दुसरा एखादा पदार्थ जसा मिश्र स्वरूपाचा असतो तशीच इच्छाशक्ति ही एक मिश्र वस्तु आहे.ह्या जर्मन तत्त्वज्ञांच्या इच्छाशक्तिविषयक सिद्धान्ताशीं आम्ही मुळीच सहमत नाहीं. इच्छाशक्ति स्वतःच विश्वांतील एक वस्तु आहे; ती सर्वातीत सत्ता असू शकत नाही, इच्छाशक्ति ही अनेक प्रक्षेपित वस्तूंपैकी एक वस्तु आहे. असें कांहीतरी विद्यमान असतें की जें इच्छाशक्ति नसतें, परंतु जें इच्छाशक्तीच्या रूपांत स्वतःला अभिव्यक्त करीत असतें हें मी समजू शकतों.परंतु, इच्छाशक्ति स्वतःला इतर सर्व वस्तूंच्या रूपांत अभिव्यक्त करीत आहे हें मात्र मला समजू शकत नाही; कारण इच्छाशक्ति ही विश्वाहून वेगळी आहे अशी कल्पना आपण करूं शकत नाहीं. ती नित्यमुक्त सद्वस्तु जेव्हा इच्छाशक्ति बनते तेव्हा देश, काल व कार्यकारणभाव यांचें कार्य सुरू होतें. कांटने केलेल्या विश्लेषणाचा विचार करा. इच्छाशक्ति ही देश, काल व कार्यकारणभाव यांच्या सीमेंत असते. मग ती सर्वातीत सत्ता कशी असूं शकेल ? कुणीं इच्छा केली तर ती कालाच्या मर्यादेंतच होईल.

जर आपल्याला सर्व विचारांचा उपशम करतां आला तर आपल्याला कळून येईल की आपण विचारांच्या पलीकडे आहोंत. 'नेति नेति' मार्गाने आपण या अनुभवाप्रत येऊन पोहोचतों. जेव्हा सर्व दृश्यमान वस्तूंचा निषेध होतो तेव्हा जें कांही उरतें तेंच ब्रह्म

होय. त्याचें वर्णन करतां येत नाही, तें प्रकट करतां येत नाही, कारण प्रकटीकरण म्हणजे इच्छाशक्तिच होय.

## वेदान्त तत्त्वज्ञान

वेदान्त्यांचें असें म्हणणें आहे की, मनुष्य जन्मालाहि येत नाही, मरतहि नाही, किंवा स्वर्गालाहि जात नाही; आणि आत्म्याच्या बाबतींत पुनर्जन्म ही एक केवळ भ्रामक कल्पना होय. ह्या संदर्भात एखाद्या पुस्तकाचीं पानें उलटण्याचें उदाहरण दिलें जातें. पानें उलटल्याने पुस्तकांत परिवर्तन होतें, पानें उलटणाऱ्या मनुष्यांत नव्हे. प्रत्येक आत्मा सर्वव्यापक आहे; म्हणून तो येणार कोठे अथवा जाणारहि कोठे ? जन्म व मृत्यु हे प्रकृतींतील बदल आहेत व त्यांना आपण चुकीने आपल्यांतील बदल समजतों.

पुनर्जन्म म्हणजे प्रकृतीचा क्रमविकास व अंत:स्थ परमात्म्याची क्रमाभिव्यक्ति होय.

प्रत्येक जन्म हा गतजन्मावर आधारित असून जेव्हा आपल्याला आपल्या संपूर्ण भूतकाळावर दृष्टि वळवितां येते तेव्हा आपण मुक्त होतों असें वेदान्ताचें म्हणणें आहे. मुक्तीची इच्छा बाळपणापासूनच धार्मिक प्रवृत्तीचें रूप धारण करते.कांही थोडया वर्षांनंतर जणुकांही सगळें सत्य त्या व्यक्तीला स्पष्ट होईल. हा जन्म सोडल्यानंतर व दुसऱ्या जन्माची वाट पाहत असतांना मनुष्य दृश्यमान विश्वांतच असतो.

आपण आत्म्याचें पुढील शब्दांत वर्णन करूं : ह्या आत्म्याला तरवार कापूं शकत नाही, भाला छेदूं शकत नाही, अग्नि जाळूं शकत नाही, पाणी विरघळवूं शकत नाही; अविनाशी व सर्वव्यापक असा हा आत्मा आहे. म्हणून त्याच्यासाठी शोक करूं नका.

जीव जर अत्यंत वाईट स्थितींत असेल तर कालान्तराने तो चांगला होईल असा आमचा विश्वास आहे. प्रत्येकाचा शाश्वत

मुक्तीवर अधिकार आहे हें मूलभूत तत्त्व आहे. प्रत्येकाला ती मुक्ति प्राप्त होईलच. मुक्तीची इच्छा ही आपल्याला प्रयत्न करण्यास भाग पाडते. मुक्त होण्याच्या इच्छेव्यतिरिक्त इतर सर्व इच्छा भ्रामक होत. वेदान्ती म्हणतो की, प्रत्येक सत्कृत्य हें मुक्तीचाच आविष्कार होय.

'असा एक काळ येईल की जेव्हा जगांतील सारें वाईट नाश पावेल' ह्या कल्पनेवर माझा मुळीच विश्वास नाही. तसें घडणें कसें शक्य आहे ? हा प्रवाह तर सतत चालूच आहे, पाण्याचे लोंढेच्या लोंढे एकाच बाजूने बाहेर पडत आहेत, परंतु दुसऱ्या बाजूने पाण्याचे लोंढे आंतहि येत आहेत.

वेदान्ताचें असें म्हणणें आहे की, तुम्ही विशुद्ध व पूर्णस्वरूप आहांत. चांगल्यावाइटाच्या पलीकडे असलेली एक अवस्था आहे व तेंच तुमचें खरें स्वरूप आहे. ती अवस्था चांगल्याहूनहि श्रेष्ठ आहे. चांगल्यांतहि भेदबुद्धि असते, पण ती वाइटांतील भेदबुद्धीहून कमी असते एवढेंच.

आमच्या तत्त्वज्ञानांत पापाचा सिद्धान्त नाही. आम्ही पापाला 'अज्ञान' म्हणतों.

नीट विचार केल्यास आढळून येईल की, इतरांशीं होणारे सर्व व्यवहार, सर्व नीति हीं दृश्यमान जगांतील असतात. ईश्वराविषयी अगदी संपूर्ण सत्य विधान करावयाचें म्हणजे, अज्ञानादि गोष्टी ईश्वराला लागू करण्याचा विचारहि आपण करूं शकत नाहीं. त्याच्यासंबंधी बोलतांना तो सत्-चित्-आनंदस्वरूप आहे असें आपण म्हणतों. निरपेक्ष सत्याला विचार आणि वाणी यांच्या द्वारें व्यक्त करण्याचा प्रत्येक प्रयत्न त्याला सापेक्ष करून टाकील आणि त्याचें मूळचें स्वरूप नाहीसें करून टाकील.

एक गोष्ट ध्यानांत ठेवावयास हवी : जोंपर्यंत आपण इंद्रियग्राह्य जगतांत बद्ध आहोंत तोंपर्यंत 'मी ब्रह्म आहें' असें आपल्याला म्हणतां येणार नाही. या इंद्रियग्राह्य जगतांत बद्ध असतांना 'मी ब्रह्म आहें' असें तुम्ही म्हणूं लागलां तर तुम्हांला दुष्कृत्यें करण्यापासून कोण परावृत्त करूं शकेल ? म्हणून 'मी ब्रह्म आहें' असें म्हणणें इंद्रियातीत राज्यांतच शक्य आहे. मी जर ब्रह्म असेन तर मी इंद्रियवृत्तींच्या अतीत असेन व मी वाईट कृत्य करणार नाहीं. नैतिकता हें कांही मनुष्याचें ध्येय नव्हे; मुक्ति प्राप्त करण्याचें तें केवळ साधन आहे. वेदान्ताचें म्हणणें असें आहे की स्वतःच्या ब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार करून घेण्याचा योग हा एक मार्ग आहे. आपल्या स्वभावसिद्ध मुक्तस्वरूपाच्या अनुभूतीने हें साधतें व या अनुभूतीसमोर इतर कांहीहि टिकाव धरूं शकत नाही असें वेदान्ताचें मत आहे. ही अनुभूति झाली म्हणजे नीतिमत्ता व सदाचार यांचें स्थान कोणतें आहे हें आपल्याला कळून येतें, ती त्या तऱ्हेने आपोआपच आपल्या जीवनांत प्रकट होतील.

अद्वैत तत्त्वज्ञानावर झालेल्या समग्र टीकेचा सारांश असा आहे की, अद्वैत तत्त्वज्ञान हें इंद्रियांच्या सुखोपभोगाला अनुकूल नाही, अद्वैतावरील ही टीका आम्ही आनंदाने मान्य करतों.

वेदान्तदर्शनास आत्यंतिक निराशावादाने प्रारंभ होतो व त्याची परिसमाप्ति खऱ्या आशावादांत होते. आम्ही इंद्रियांवर आधारलेला आशावाद नाकारतों हें खरें; तथापि, इंद्रियातीत अनुभवांवर आधारलेला खराखुरा आशावाद आम्ही प्रतिपादतों. यथार्थ सुख इंद्रियांत नसून इंद्रियांच्या पलीकडे आहे; आणि ते प्रत्येक मनुष्याच्या ठायीं विद्यमान आहे. आज आपल्याला जगांत आढळणारा आशावाद हा असा आहे की तो आपल्याला इंद्रियांच्या

योगें विनाशाप्रत खेचून नेईल.

आमच्या तत्त्वज्ञानांत निषेधात्मक पद्धतीला सर्वाधिक महत्त्व आहे. निषेधांत--'नेति नेति' मधे--यथार्थ आत्म्याच्या अस्तित्वाचा आग्रह अंतर्भूत असतो. वेदान्त तत्त्वज्ञान हें इंद्रियगम्य विश्वाचा निषेध करतें या अर्थानें तें निराशावादी आहे खरें, परंतु तें इंद्रियातीत खऱ्या सत्तेचें आग्रहपूर्वक प्रतिपादन करतें आणि या अर्थानें तें आशावादीच आहे.

मनुष्याची तर्कबुद्धि वेदान्तमताला पुष्कळ प्रमाणांत मान्य आहे, तथापि, बुद्धीच्या पलीकडे उच्चतर असें कांहीतरी आहे असें वेदान्ताचें सांगणें आहे; पण त्याच्याप्रत पोहोचण्याचा मार्ग बुद्धीमधूनच आहे हें वेदान्ताला मान्य आहे.

जुन्या खुळचट समजुतींचें उच्चाटन करण्यासाठी आपल्याला तर्कबुद्धीची आवश्यकता आहे, आणि मग जें कांही शिल्लक उरतें तें वेदान्तमत होय. संस्कृतांत एक सुंदर काव्य आहे. त्यांत कवि स्वत:ला म्हणतो : "हे मित्रा रडतोस कां ? कां शोक करतोस ? तुला भय नाही, मृत्यु नाही. मग रडतोस कां ? तुला दु:ख नाही, कारण तुझें स्वरूप अनंत निळ्या आकाशाप्रमाणें अपरिवर्तनीय आहे. विविधरंगी ढग त्या निळ्या आकाशासमोर येतात, क्षणभर क्रीडा करतात व निघून जातात; पण तें निळें आकाश तसेंच कायम राहतें. ह्या ढगांना दूर सारणें एवढेंच फक्त तुझें कार्य आहे."

आपल्याला दरवाजे खोलून मार्ग मोकळा करावयाचा असतो. पाणी तेथे मुळांत असतेंच, तें आपोआप आंत घुसून ओतप्रोत भरून जाईल.

मनुष्याच्या ठिकाणीं जाणिवेचा बराच अंश असतो, त्याच्याठायीं नेणिवेचा थोडा अंशहि असतो आणि जाणिवेच्या पलीकडे

जाणेंहि त्याला शक्य असतें. जेव्हा आपण खऱ्या अर्थाने माणसें होऊं तेव्हाच आपण तर्कबुद्धीच्या पलीकडे जाऊं शकूं. 'उच्च' व 'नीच' हे शब्द फक्त या दृश्यमान जगांतच वापरतां येतात. त्या सर्वातीत सत्तेच्या बाबतींत हे शब्द वापरणें पूर्णपणें विसंगत आहे, कारण तेथे कोणत्याच प्रकारचा भेद नाही. या दृश्यमान विश्वांत मनुष्यरूप हें सर्वश्रेष्ठ रूप आहे. मनुष्य हा देवांहूनहि श्रेष्ठ आहे असें वेदान्ती म्हणतो. सर्व देवांना मरावें लागेल आणि पुनः मनुष्यरूप धारण करावें लागेल व मनुष्यदेहांतच त्यांना पूर्णत्व प्राप्त करतां येईल.

आम्ही एक तत्त्वज्ञान बनवितों हें खरें, परंतु तें निर्दोष नाही हे आम्हांला मान्य करावें लागतें, कारण सत्य हें सगळ्या तत्त्वज्ञानांच्या अतीत असतें. आम्ही आमच्या तत्त्वज्ञानाची इतर तत्त्वज्ञानांशीं तुलना करण्यास तयार आहोंत आणि हेंच एकमेव तर्कशुद्ध तत्त्वज्ञान आहे असें दाखवून द्यावयासहि तयार आहोंत; परंतु हें तत्त्वज्ञान निर्दोष नाही, कारण तर्कबुद्धि हीच मुळांत निर्दोष नसते. परंतु मनुष्याचें मन ज्याची कल्पना करूं शकतें असें हें एकमेव तर्काधिष्ठित तत्त्वज्ञान आहे.

बलिष्ठ होण्यासाठी तत्त्वज्ञानाने स्वतःचा प्रचार केला पाहिजे हें कांही अंशीं खरें आहे. वेदान्त तत्त्वज्ञानाचा जेवढा प्रचार झालेला आहे तेवढा दुसऱ्या कोणत्याच तत्त्वज्ञानाचा झालेला नाही. केवळ वैयक्तिक संपर्कानेच अजूनहि ज्ञानदानाचें कार्य होत आहे. खूप वाचल्याने मनुष्य हा खरा माणूस बनत नाही, जीं खरीं माणसें होऊन गेलीं तीं वैयक्तिक संपर्कामुळेच निर्माण झालीं. आता हीं खरीं माणसें फारच थोडीं आहेत हें खरें, परंतु त्यांची संख्या वाढेल. तथापि 'एक दिवस असा उजाडेल की ज्या दिवशीं आपण सगळेच तत्त्वज्ञ होऊं' असा कांही विश्वास बाळगतां येत नाही. 'सर्वत्र केवळ सुखच

राहील व दुःख संपूर्णपणें नाश पावेल' असा काळ येईल यावर आमचा विश्वास नाही.

आपल्या जीवनांत अधेमधे असा क्षण येतो की जेव्हा आपल्याला परमानंदाचा ओझरता अनुभव येतो; त्या वेळीं आपण कांही मागत नाहीं, कांही देत नाहीं; त्या वेळीं आपण परमानंदाव्यतिरिक्त दुसरें कांहीच जाणत नाहीं. परंतु असा क्षण चटकन् निघून जातो आणि मग विश्वाचा हा सारा पसारा आपल्याला पुन्हा दिसूं लागतो व आपल्याला असें जाणवूं लागतें की ईश्वर ही सर्व वस्तूंची पार्श्व-भूमि असून तिच्यावर हें सारें विविधरंगी नक्षीकाम केलेलें आहे.

वेदान्ताची अशी शिकवण आहे की, निर्वाणाप्रत पोहोचण्या-साठी आपल्याला मृत्यूची प्रतीक्षा करण्याचें कारण नाही, तर निर्वाण हें येथेच व याच जीवनांत प्राप्त होऊं शकतें. निर्वाण म्हणजे आत्मसाक्षात्कार, आणि हा साक्षात्कार एकदा, अगदी एका क्षणा-पुरता जरी झाला तरी मग व्यक्तित्वाच्या मृगजळामुळे मनुष्य कधीहि फसणें शक्य नाही. डोळे असल्यामुळे, जें दृश्यमान आहे तें आपल्याला दिसलेच, परंतु तें काय आहे हें आपल्याला ठाऊक झालेलें असतें, त्याचें खरें स्वरूप आपल्याला कळलेलें असतें. अविकारी आत्मा जणुकांही पडद्याने झाकलेला आहे. पडदा बाजूला जातो व त्याच्यामागे तो आत्मा आपल्याला दिसूं लागतो. सगळा बदल त्या पडद्यांत होत असतो. संतांच्या बाबतींत हा पडदा अगदी झिरझिरीत असतो व सत्याचा प्रकाश त्यांतून स्पष्ट दिसूं शकतो. पाप्यांच्या बाबतींत हा पडदा अगदी जाड असतो आणि त्यामुळे संतांच्या ठायीं जो आत्मा आहे तोच पाप्यांच्याहि ठायीं आहे हें सत्य आपल्या दृष्टोत्पत्तीस येत नाही. जेव्हा तो पडदा पूर्णपणें दूर सारला जातो तेव्हा तो खरोखरी कधी अस्तित्वांतच नव्हता

असें आपल्याला जाणवूं लागतें, आणि मग आपण सदैव आत्माच होतों, दुसरें कांहीहि नव्हतों अशी जाणीव होऊन त्या पडद्याचा आपल्याला विसर पडतो.

ह्या अपूर्व अवस्थेचे दोन पैलू आहेत. पहिला पैलू हा की ज्या मनुष्याला आत्मज्ञान झालें आहे त्याच्यावर दुसऱ्या कशाचाहि परिणाम होणार नाही. दुसरा पैलू हा की फक्त तोच मनुष्य जगाचें हित करूं शकतो. दुसऱ्यांचें भलें करण्यामागील खरें उद्दिष्ट त्या माणसालाच कळलेलें असतें, कारण असें उद्दिष्ट एकच असतें. या उद्दिष्टाला अहंकार म्हणतां यावयाचें नाही, कारण अहंकारांत भेद विद्यमान आहे. हाच यथार्थ निःस्वार्थपणा होय. त्यांत व्यक्तिविशिष्टाचा बोध नसतो, तर त्यांत सर्वव्यापक आत्म्याचें ज्ञान असतें. प्रेमाचें व सहानुभूतीचें प्रत्येक कार्य ह्या सर्वव्यापक आत्म्याच्या अस्तित्वाचेंच दृढ समर्थन करतें. "मी नव्हे, तूंच सर्वकांही आहेस." हेंच तत्त्वज्ञानाच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे असें म्हणावयास हवें की, तुम्ही दुसऱ्याला मदत करा, कारण तुम्ही त्याच्याठायीं आहांत व तो तुमच्याठायीं आहे. फक्त खरा वेदान्तीच आपल्या बांधवाकरता कां कूं न करतां प्राणार्पण करील, कारण मी मरणार नाहीं हें त्याला ठाऊक असतें. जगांत जोंपर्यंत एखादा देखील किडा जिवंत असतो तोंपर्यंत तो जिवंत असतो; जोंपर्यंत एखादें मुख खात असतें तोंपर्यंत तो खात असतो. अशाप्रकारें जो इतरांचें हित करीत राहतो आणि त्याच्या ह्या कार्यांत, 'शरीराची काळजी घ्या' असल्या आधुनिक कल्पनांमुळे कधीच व्यत्यय येत नाही. जेव्हा मनुष्याला त्यागाची एवढी उच्च अवस्था प्राप्त होते तेव्हा तो नैतिक संघर्षाच्या पलीकडे जातो, तो सर्वातीत होतो. त्याला

विद्वान् ब्राह्मणांत विद्वान् ब्राह्मण दिसत नाही, गायींत गाय दिसत नाही, कुत्र्यांत कुत्रा दिसत नाही आणि अत्यंत वाईट ठिकाणीं वाईट दिसत नाही, तर त्याला ह्या सर्वांच्या रूपांत ईश्वरच प्रकट झालेला दिसतो. असाच मनुष्य खरा सुखी असतो; आणि ज्या माणसाने ही समबुद्धि प्राप्त करून घेतली आहे त्याने ह्याच जीवनांत संसारावर विजय मिळविला आहे असें समजावें. ब्रह्म विशुद्ध आहे; म्हणून असा मनुष्य ब्रह्मांत अवस्थित आहे असें म्हटलें जातें. येशू ख्रिस्त म्हणतात, "मी अब्राहामच्या पूर्वीपासून आहें." ह्याचा अर्थ असा होतो की येशू ख्रिस्त व त्यांच्यासारख्या विभूति ह्या मुक्तात्मे होत; आणि पूर्वजन्मांतील कर्मांमुळे येशू ख्रिस्तांना मनुष्यशरीर धारण करावें लागलें नाही, तर मानव-जातीचें हित करण्याच्या उदात्त हेतूने त्यांनी मनुष्यशरीर धारण केलें. मनुष्य मुक्त झाल्यावर कर्मशून्य होऊन एखाद्या निर्जीव गोळ्याप्रमाणे पडून राहील असें मुळीच नाही; उलट तो इतर सर्वांपेक्षा अधिक कर्मशील होईल, कारण इतर सर्व प्राणी जबर-दस्तीमुळे कर्म करीत असतात, तर मुक्त मनुष्य स्वाधीनपणें कर्म करीत असतो.

आपण ईश्वराशीं अभिन्न असू तर आपल्याला स्वतंत्र व्यक्तित्व नाही काय ? होय, जरूर आहे; तें व्यक्तित्व म्हणजेच ईश्वर. ईश्वर हेंच आपलें व्यक्तित्व होय. तुमचें सध्याचें व्यक्तित्व हें तुमचें खरें व्यक्तित्व नव्हे; तुम्ही आपल्या खऱ्या व्यक्तित्वा-कडे वाटचाल करीत आहांत. व्यक्तित्वाचा अर्थ हाच की, तें अखंड असतें. सध्याच्या तुमच्या व्यक्तित्वाला तुम्ही व्यक्तित्व कसें म्हणूं शकतां ? कारण असें पाहा की, घटकाभर तुम्ही एका प्रकारें विचार करतां, लगेच पुढच्या घटकेस तुमचा विचार

बदलतो व तुम्ही दुसऱ्या प्रकारें विचार करूं लागतां व आणखी दोन घटकांनी आणखी तिसऱ्या प्रकारें विचार करूं लागतां. जें बदलत नाही तें व्यक्तित्व; तें सर्व वस्तूंच्या अतीत असतें, तें अविकारी असतें. हीच सध्याची स्थिति चिरंतन काळपावेतों तशीच राहिली तर तें महाभयंकर होईल, कारण तसें घडलें तर मग चोर हा नेहमी चोरच राहील आणि लुच्चा नेहमी लुच्चाच राहील. एखादें मूल मेल्यास त्याला मूलच बनून राहावें लागेल. खरें व्यक्तित्व तें की जें कधीहि बदलत नाही व कधीहि बदलणार नाही; आणि तें व्यक्तित्व म्हणजे आपल्या ठायीं असलेला ईश्वर होय.

वेदान्त तत्त्वज्ञान हा एक अथांग असा महासागर आहे. आणि महासागराच्या पृष्ठभागावर एखादी विशाल युद्धनौका आणि एखादें लहानसें होडकें हीं दोन्हीं जशीं शेजारीं शेजारीं राहूं शकतात तसेंच वेदान्तांत खरा योगी एखाद्या मूर्तिपूजकाच्या किंवा एखाद्या नास्तिकाच्याहि शेजारीं वावरूं शकतो. एवढेंच नव्हे, तर ह्या वेदान्तसागरांत हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी सगळे एक आहेत, सगळींच त्या सर्वशक्तिमान ईश्वराचीं लेकरें आहेत !

# नियम आणि मुक्ति

जो मनुष्य मुक्त असतो त्याच्या दृष्टीने संघर्षाला कांहीच अर्थ नसतो. परंतु, आपल्या दृष्टीने मात्र त्याला अर्थ आहे, कारण नामरूपांमुळे जग निर्माण होत असतें.

वेदान्त तत्त्वज्ञानांत संघर्षाला वा प्रयत्नाला स्थान अवश्य आहे, परंतु भयाला मात्र स्थान नाही. जेव्हा तुम्ही आपल्या खऱ्या स्वरूपावर भर द्याल तेव्हा सारी भीति नाहीशी होईल. आपण बद्ध आहोंत असा जर तुम्हीं विचार केला तर तुम्ही बद्धच राहाल. आपण मुक्त आहोंत असा जर तुम्हीं विचार केला तर तुम्ही मुक्त व्हाल.

ह्या दृश्यमान जगांत आपल्याला ज्या स्वातंत्र्याचा अनुभव येतो तें स्वातंत्र्य म्हणजे त्या खऱ्या मुक्तीचा ओझरता अनुभव होय. ती कांही खरी मुक्ति नव्हे.

'प्रकृतीच्या नियमांचें पालन करणें म्हणजे स्वातंत्र्य होय' या कल्पनेशीं मी सहमत नाहीं. तिचा अर्थ काय हेंच मला कळत नाही. मानवी प्रगतीचा इतिहास पाहिल्यास आपल्याला दिसून येतें की प्रकृतीचे नियम झुगारून दिल्यामुळेच ती सारी मानवी प्रगति साध्य झालेली आहे. असें म्हणतां येईल की, निकृष्ट स्वरूपाच्या नियमांवर उच्च स्वरूपाच्या नियमांच्या साहाय्याने मात करतां आली. पण तेथेंहि जिंकणारें मन हें केवळ मुक्त होण्याची धडपड करीत होतें व ज्या क्षणीं त्याला असें आढळलें की ती धडपडहि नियमांच्या अंतर्गतच आहे त्या क्षणीं त्या नियमांना जिंकण्याचीहि त्याला इच्छा झाली. अशाप्रकारें सर्व प्रयत्नांचें मुक्ति हेंच ध्येय होतें. वृक्ष हे नियमांचें कधीच उल्लंघन

करीत नाहीत, एखादी गाय चोरी करते आहे असें मीं कधींहि पाहिलेलें नाही, शिंपल्यांतील किडा कधीहि खोटें बोलत नाही, तरीहि हीं सारीं मनुष्यांहून कांही श्रेष्ठ नव्हत. हें जीवन म्हणजे मुक्तीची एक जबरदस्त घोषणा होय. सामाजिक, राजनैतिक व धार्मिक क्षेत्रांत जर आपण नियमांचे गुलाम बनून गेलों तर आपण जडवत् होऊन जाऊं. नियमांचा अतिरेक हें मृत्यूचें निश्चित गमक होय. जेव्हा एखाद्या समाजांत नियमांची संख्या फार वाढते तेव्हा तो समाज लवकरच नाश पावेल असें समजावें. भारताचीं वैशिष्टयें जर तुम्हीं अभ्यासिलीत तर तुम्हांला असें आढळेल की, हिंदुसमाजांत जेवढे नियम प्रचलित आहेत तेवढे दुसऱ्या कोणत्याहि समाजांत नाहीत व याचा परिणाम हिंदुसमाजाच्या मृत्यूंत झालेला आहे. परंतु, हिंदुलोकांत एक विशिष्ट कल्पना प्रचलित होती व ती म्हणजे त्यांनी धर्माच्या बाबतींत लोकांवर कोणतीहि विशिष्ट मतें वा सिद्धान्त लादले नाहीत. त्यामुळे त्यांच्या धर्माचा खूपच विकास झाला. शाश्वत नियम म्हणजे स्वातंत्र्य कधीच असूं शकत नाही, कारण शाश्वत हें नियमान्तर्गत आहे असें म्हणणें म्हणजे शाश्वताला मर्यादित करणें होय.

ईश्वराच्या दृष्टीसमोर कोणताहि हेतु नाहीं, कारण त्याच्यासमोर जर कांही हेतु असता तर ईश्वर हा एखाद्या सामान्य माणसाहून श्रेष्ठ ठरला नसता. आणि त्याला हेतु बाळगण्याचें कारण तरी काय ? जर कांही हेतु असता तर ईश्वर त्यामुळे बद्ध झाला असता. आणि मग आपल्याला ईश्वराहून वेगळी व अधिक श्रेष्ठ अशी एखादी वस्तु मानावी लागली असती. उदाहरणार्थ, गालिचा विणणारा विणकर एखादा गालिचा तयार करतो. गालिचा तयार करणें ही कल्पना त्या विणकराहून निराळी होती व

त्याच्याहून श्रेष्ठ होती. आता ज्या कल्पनेशीं ईश्वर जुळवून घेईल अशी कल्पना कुठे आहे ? ज्याप्रमाणे मोठे सम्राट कधीकधी बाहुल्यांशीं खेळतात त्याप्रमाणे तो ईश्वर प्रकृतीशीं क्रीडा करीत आहे; आणि ज्याला आपण 'नियम' म्हणतों तो नियम म्हणजे ही क्रीडा होय. तिला आपण 'नियम' म्हणतों, कारण सुरळीतपणें कार्यरत असणारे तिचे लहानलहान घटकच आपल्याला दिसत असतात. त्या लहान घटकांतच आपल्या नियमविषयक सर्व कल्पना समाविष्ट असतात. नियम अनंत आहे असें म्हणणें, दगड नेहमी खालीच पडतील असं म्हणणं मूर्खपणाचें आहे. जर सगळे युक्तिवाद अनुभवावर आधारलेले असतील तर पन्नास लाख वर्षांपूर्वी दगड खालीच पडत असत हें पाहण्यास त्या वेळीं कोण होतें ? म्हणून नियम हा मनुष्याचें स्वाभाविक अंग नाही. मनुष्य जेथून सुरवात करतो तेथेच त्याची समाप्ति होते हा शास्त्राचा एक सिद्धान्त आहे. खरें पाहतां आपण हळूहळू नियमाच्या कक्षेच्या बाहेर जात असतों व शेवटीं आपण नियमांतून पूर्णपणें मुक्त होतों अर्थात्, असें करतांना आपल्याला संपूर्ण जीवनाचा अनुभव लाभलेला असतो. आपण ईश्वर व मुक्ति ह्या टोकापासून प्रारंभ केला व अंतीं त्याच टोकाला जाऊन आपण मिळणार. हे जे सगळे नियम आहेत ते मधल्या अवस्थेंत असतात व या नियमांमधून आपल्याला जावें, लागतें. वेदान्त हा सदासर्वदा मुक्तीची घोषणा करतो. नियमाच्या निव्वळ कल्पनेनेहि वेदान्ती घाबरून जाईल; शाश्वत नियम ही त्याच्या दृष्टीने महाभयंकर गोष्ट होय. कारण मग त्या नियमांतून सुटकाच होणार नाही. त्याला सदासर्वकाळ बद्ध करून टाकणारा असा जर शाश्वत नियम असेल तर मग त्याच्यांत आणि एखाद्या गवताच्या पात्यांत फरक तो काय उरला ? नियमाच्या त्या अमूर्त

कल्पनेवर आमचा मुळीच विश्वास नाही.

आम्ही असें म्हणतों की आपल्याला त्या मुक्तीचा शोध घ्यावयाचा आहे व ती मुक्ति म्हणजे ईश्वर होय. इतर वस्तूंत जें सुख आहे तेंच ह्या मुक्तींतहि आहे. परंतु मनुष्य जेव्हा एखाद्या सान्त गोष्टींत तें सुख शोधतो तेव्हा त्या सुखाचा एखादा कणच त्याच्या पदरीं पडतो. मनुष्याला जें सुख ईश्वरप्राप्तींत लाभतें तेंच सुख एखाद्या चोराला चौर्यकर्मांतहि लाभतें; परंतु चोराला सुखाचा एखादा कणच लाभतो व त्याबरोबर त्याला पुष्कळ दुःखहि भोगावें लागतें. खरें सुख म्हणजे ईश्वर होय. प्रेम म्हणजे ईश्वर, मुक्ति म्हणजे ईश्वर, आणि जें जें बंधन आहे तें तें ईश्वर नव्हे.

मनुष्य मूलतः मुक्तच आहे, पण त्याला या सत्याचें ज्ञान प्राप्त करून घ्यावें लागेल. तो मुक्तच असतो, परंतु--प्रतिक्षणीं याचा त्याला विसर पडतो. जाणतां किंवा अजाणतां या मुक्तीचा शोध घेणें म्हणजेच प्रत्येक मनुष्याचें संपूर्ण जीवन होय. पण ज्ञानी व अज्ञानी मनुष्य ह्या दोहोंतील फरक असा की, ज्ञानी मनुष्य जाणीवपूर्वक मुक्तीचा शोध करतो, तर अज्ञानी मनुष्य अजाणतां हा शोध करतो. एखाद्या अणूपासून तों ताऱ्यांपर्यंत प्रत्येकाची मुक्त होण्यासाठीं धडपड चालू असते. अज्ञानी मनुष्याला तहानभुकेच्या बंधनांतून मुक्तता लाभली, कांही एक विशिष्ट मर्यादेपर्यंत त्याला स्वतंत्रता लाभली की तो संतुष्ट होतो. परंतु त्याहूनहि बळकट अशीं बंधनें असून, तीं झुगारून देतां आलीं पाहिजेत, त्यांतून मुक्त होतां आलें पाहिजे असें ज्ञानी मनुष्याला वाटत असतें. 'रेड इंडियन' लोकांना मिळणारें स्वातंत्र्य हें तो स्वातंत्र्य म्हणून कधींच मानणार नाही.

आमच्या तत्त्वज्ञांच्या मतें मुक्ति हेंच अंतिम ध्येय होय. ज्ञान हें अंतिम ध्येय कधीच होऊं शकणार नाही, कारण ज्ञान ही एक मिश्र

वस्तु आहे शक्ति व स्वातंत्र्य यांचें तें मिश्रण आहे, आणि स्वातंत्र्य हेंच केवळ स्पृहणीय असतें. त्यासाठीच माणसाची सारी धडपड चालू असते, केवळ सामर्थ्यसंपादन म्हणजे ज्ञान नव्हे. उदाहरणार्थ, एखाद्या शास्त्रज्ञाला विजेचा धक्का कांही मैलांपावेतों धाडतां येतो; पण निसर्गाला असा धक्का अगणित मैलांपावेतों धाडतां येत असतो मग आपण निसर्गाचा गौरव करण्यासाठी त्याचे पुतळे कां उभारीत नाहीं? आपल्याला नियम नको असतात, आपल्याला नियम मोडण्याचें सामर्थ्य हवें असतें. नियमातीत होण्याची आपली इच्छा असते. तुम्ही जर नियमांनी बद्ध झालांत तर तुम्ही नुसता मातीचा गोळा बनून जाल. तुम्ही नियमातीत आहांत की नाही हा प्रश्न नाही; परंतु आपण नियमातीत आहोंत हा विचारच साऱ्या मानवी इतिहासाचा आधार आहे. उदाहरणार्थ, एखादा मनुष्य जंगलांत राहतो व त्याला कधीहि शिक्षण मिळालेलें नसतें कधीहि ज्ञान-प्राप्ति झालेली नसते. एक दगड खाली पडत आहे ही निसर्गाची साधी घटना तो पाहतो व त्याला वाटतें की ती घटना स्वातंत्र्य-मूलक आहे. त्याला असें वाटतें की त्या दगडाला आत्मा आहे, व त्याची मध्यवर्ती कल्पना ही स्वातंत्र्याची कल्पना असते. परंतु दगडाला खाली पडणें भाग आहे हें ज्ञान त्याला ज्या क्षणीं होतें त्या क्षणीं त्या घटनेला तो निसर्गाची घटना मानूं लागतो व ती एक निर्जीव यांत्रिक क्रिया असल्याचें त्याला कळून येतें. मी पाहिजे तर रस्त्यावर जाईन, नाही तर जाणारहि नाहीं. त्यांतच मनुष्य ह्या नात्याने माझा महिमा आहे. तेथे जाणें मला भाग आहे असें मला निश्चितपणें कळून येतांच माझें स्वातंत्र्य नष्ट होतें व मी यंत्रवत् बनून जातों. अनंत सामर्थ्याने युक्त असलेला निसर्ग म्हणजे केवळ एक यंत्र होय; स्वातंत्र्य हेंच चैतन्ययुक्त जीवनाचें सार आहे.

वेदान्त म्हणतो की जंगलांतील मनुष्याची कल्पना बरोबर आहे. त्याला आलेला अनुभव बरोबर आहे, परतु तद्विषयक त्याचें स्पष्टीकरण चकीचें आहे. निसर्ग स्वतंत्र आहे, तो नियमबद्ध नाही अशी त्याची निसर्गाविषयी कल्पना असते. ह्या सर्व मानवी अनुभवानंतर आपणहि तसाच विचार करूं लागूं, पण तो विचार अधिक तत्त्वज्ञानात्मक असेल उदाहरणार्थ, मला रस्त्यावर जाण्याची इच्छा आहे. माझ्या इच्छाशक्तीची प्रेरणा मला मिळते व मी थांबतो; इच्छा आणि रस्त्यावर जाण्याची प्रत्यक्ष कृति या दरम्यान जो वेळ जातो त्या वेळांत मी एकरूपपणें (uniformly) काम करीत असतों. क्रियेची ही एकरूपता म्हणजच नियम होय. मला आढळतें की, माझ्या कृत्यांची ही एकरूपता फार लहानलहान अवधींमध्ये खंडित झालेली असते; म्हणून माझ्या कृति नियमांकित नाहीत असें मी म्हणतों. मी स्वतंत्रपणें कार्य करता. मी पांच मिनिटें चालतों; माझ्या ह्या कार्यांत एकरूपता असते. परतु ह्या पांच मिनिटांच्या आधी इच्छाशक्तीचें कार्य झालें व तिने मला चालण्याची प्रेरणा दिली, म्हणून 'मी स्वतंत्र आहें' असें मनुष्य म्हणतो, कारण त्याच्या कार्यांचे छोटे छोट कालखंड पाडतां येतात, आणि त्या छोटयाछोटया कालखंडांत जरी एकरूपता असली तरी त्या कालखंडाच्या पलीकडे तीच एकरूपता नसते. एकरूपता नसण्याच्या या अनुभवांतच स्वातंत्र्याची कल्पना निहित आहे. निसर्गामध्ये आपल्याला एकरूपतेचे मोठमोठे कालखंड दिसतात; परंतु त्यांच्या प्रारंभीं आणि अंतीं स्वतंत्र प्रेरणा असल्याच पाहिजेत. स्वतंत्र प्रेरणा प्रारंभीच मिळालेली होती व तिचेंच कार्य सतत पुढे चालू आहे; परंतु या कार्याचा कालखंड आपल्या कालखंडाशीं तुलना करतां अत्यंत प्रदीर्घ असतो. तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून जर आपण विश्लेषण करूं

लागलों तर आपल्याला असें आढळतें की आपण स्वतंत्र नाहीं. परंतु, मी स्वतंत्र असल्याची ही जी जाणीव आहे ती कायमच राहते. ती जाणीव कशी येते याचें आपल्याला स्पष्टीकरण करावें लागेल. पुढील दोन प्रेरणा आपल्याठायीं असल्याचें आपल्याला आढळून येईल. आपली तर्कबुद्धि आपल्याला असें सांगते की आपलीं सगळीं कार्यें हीं कांहीं कारणांमुळे घडून आलेलीं असतात, आणि त्याच वेळीं प्रत्येक प्रेरणेबरोबर आपण आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करीत असतों. वेदान्ताने दिलेलें याचें स्पष्टीकरण असें आहे की, स्वातंत्र्य हें आपल्या आंत असतें, आत्मा हा खरोखरीच मुक्त असतो, परतु त्या आत्म्याचीं कार्यें शरीर व मन ह्यांच्या द्वारें प्रकट होत असतात आणि हीं दोन्हीं स्वतंत्र नाहीत.

ज्या क्षणीं आपण प्रतिक्रिया करतों त्या क्षणीं आपण गुलाम बनतों. एखादा मनुष्य मला दोष देतो, आणि मी तावडतोब क्रोधाच्या रूपाने प्रतिक्रिया करतों. त्याने माझ्याठायीं जें थोडेसें स्पंदन निर्माण केलें त्याच्यामुळे मी गुलाम बनतों. म्हणून आपल्याला आपलें स्वातंत्र्य दर्शविलें पहिजे. अत्यंत श्रेष्ठ व अतिविद्वान् पुरुषांत, अत्यंत निकृष्ट प्राण्यांत आणि अतिशय अधम वा नीच मनुष्यांत ज्यांना अनुक्रमें श्रेष्ठ पुरुष, प्राणी वा मनुष्य यांची प्रतीति न येतां त्या सर्वांत त्या ईश्वराचीच प्रतीति येते त्यांना खरेखुरे ज्ञानी म्हणावयाचें. ह्याच जन्मांत त्यांनी संसारावर विजय मिळविलेला असतो व ह्या समबुद्धींत ते प्रतिष्ठित झालेले असतात. ईश्वर विशुद्ध आहे व तो सर्वांना समान आहे म्हणून असा ज्ञानी पुरुष म्हणजे प्रत्यक्ष ईश्वरच असतो. आपण सगळेजण ह्याच ध्येयाप्रत जात आहोंत; आणि उपासनेचा प्रत्येक प्रकार, मानवाचें प्रत्येक कार्य म्हणजे हें ध्येय गाठण्याची एकेक पद्धति होय. ज्या

मनुष्याला द्रव्य हवें असतें तोहि मुक्त होण्याचाच प्रयत्न करीत असतो--त्याला दारिद्र्याच्या बंधनांतून मुक्त व्हावयाचें असतें. मनुष्याचें प्रत्येक कार्य ही एकप्रकारें उपासनाच होय. कारण त्या कार्यामागे मुक्तीचें ध्येय गाठण्याची कल्पना असते आणि प्रत्यक्षा-प्रत्यक्षपणें सर्वच कार्यें ह्या ध्येयाकडे घेऊन जातात. फक्त जीं कार्यें ध्येयाच्या मार्गांत अडथळा आणतात तीं टाळावयास हवींत. सबंध विश्व कळत नकळत सतत आराधना करीत आहे; त्याला हें कळत नाही की तें जरी देवाला शिव्याशाप देत असले तरी तें दुसऱ्या रीतीने उपासनाच करीत असतें, कारण जे ईश्वराला शिव्या-शाप देतात तेहि एकप्रकारें मुक्तीसाठीच प्रयत्न करीत असतात. एखाद्या गोष्टीविरुद्ध प्रतिक्रिया केल्यामुळे आपण त्या गोष्टीचे बंदे गुलाम बनून जात आहोंत हा विचारहि त्यांच्या मनांत कधी येत नाही. कांट्याला जोराने लाथ मारणें हें अनिष्टकारकच असतें.

आपण मर्यादित आहोंत या समजुतीपासून जर आपण आपली सुटका करून घेऊं शकलों तर याच क्षणीं सगळ्या गोष्टी करणें आपल्याला शक्य होईल. तो फक्त वेळेचा प्रश्न आहे. हें जर खरें असेल तर शक्ति वाढवा म्हणजे वेळ कमी लागेल. एका प्राध्यापकाने संगमरवरी दगड कसा तयार होतो याचें रहस्य आत्मसात् केलें व त्याने बारा वर्षांत तसला दगड तयार केला. निसर्गाला तेवढ्यासाठी कित्येक शतकें लागलीं म्हणून त्या प्राध्यापकाचें उदाहरण लक्षांत ठेवा.

## आत्मसाक्षात्काराचें ध्येय व तें गाठण्याच्या पद्धति

जर सगळ्या मानवजातीने एकाच धर्माला मान्यता देऊन त्याचा स्वीकार केला, एकच सार्वजनीन उपासनापद्धति स्वीकारली, नीतिमत्तेचा एकच मापदंड प्रमाण मानला तर तें जगाचें फार मोठें दुर्भाग्य ठरेल. ह्यामुळे सगळ्या आध्यात्मिक व धार्मिक प्रगतीस भयंकर तडाखा बसून तिचा मृत्यु ओढवेल. सत्याविषयीचा आपला जो उच्चतम आदर्श आहे त्यालाच तुम्हीहि प्रमाण माना असें इतरांना सांगून बऱ्यावाईट मार्गांनी त्यांचीं मनें वळविण्याऐवजी व तद्द्वारे वरील विनाशाच्या खाईंत जगाला लोटण्याची घाई करण्याऐवजी आपण इतर लोकांना त्यांच्या त्यांच्या उच्चतम ध्येयांनुसार आत्मविकास साधण्यास साहाय्य केलें पाहिजे, ह्या आत्मविकासाच्या आड येणारे सर्व अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व अशा प्रकारें एक विश्वव्यापी धर्म स्थापन करण्याची लोकांची धडपड विफल केली पाहिजे.

समस्त मानवजातीचें अंतिम ध्येय, सर्व धर्मांचें अंतिम उद्दिष्ट एकच आहे व तें म्हणजे ईश्वराशीं पुनर्मीलन किंवा प्रत्येक मनुष्याचें खरें स्वरूप जें ईश्वरत्व त्याची पुन:प्राप्ति हें होय; अर्थात् या दोहोंचा आशय एकच आहे. परंतु ध्येय हें जरी एकच असलें तरी तें गाठण्याची पद्धति निरनिराळ्या व्यक्तींच्या मनोधर्मांनुसार वेगवेगळी असूं शकते.

ध्येय व तें गाठण्यासाठी अवलंबिलेली पद्धति या दोहोंना 'योग' म्हणतात. हा शब्द संस्कृतांतील 'युज्' धातूपासून साधलेला असून इंग्रजींतील 'yoke' म्हणजे 'जोडणें' हा शब्दहि ह्याच अर्थाचा आहे. आपल्या सत्य स्वरूपाशीं, ईश्वराशीं आपल्याला जोडणें म्हणजे 'योग'

होय. ईश्वराशीं जोडण्याच्या पद्धति म्हणजेच योग अनेक आहेत; परंतु कर्मयोग, भक्तियोग, राजयोग व ज्ञानयोग हे त्यांतील प्रमुख आहेत.

प्रत्येक मनुष्याने आपापल्या स्वभावधर्मानुसार स्वतःचा विकास साधला पाहिजे. ज्याप्रमाणे प्रत्येक शास्त्राच्या स्वतःच्या पद्धति असतात त्याचप्रमाणे धर्माच्याहि विशिष्ट पद्धति असतात. धर्माचें ध्येय गाठण्याच्या पद्धतींना आम्ही 'योग' म्हणतों आणि आम्ही जे निरनिराळे योग शिकवितों ते वेगवेगळ्या स्वभावांना व मनोधर्मांना जुळणारे असतात. आम्ही त्यांचें चार शीर्षकांखाली खालीलप्रमाणे वर्गीकरण करतों :

(१) कर्मयोग—या पद्धतीनुसार कर्म व कर्तव्य यांच्या द्वारें मनुष्य आपल्या दिव्य स्वरूपाचा साक्षात्कार करून घेतो.

(२) भक्तियोग—या पद्धतीनुसार सगुण ईश्वरावर प्रेम करून व त्याची भक्ति करून मनुष्य आपल्या दिव्य स्वरूपाचा साक्षात्कार करून घेतो.

(३) राजयोग—या पद्धतीनुसार मनःसंयमाच्या द्वारें मनुष्य आपल्या दिव्य स्वरूपाचा साक्षात्कार करून घेतो.

(४) ज्ञानयोग—या पद्धतीनुसार ज्ञानाच्या द्वारें मनुष्य आपल्या दिव्य स्वरूपाचा साक्षात्कार करून घेतो.

त्या एकमेव केंद्रस्थानाकडे म्हणजेच ईश्वराकडे जाण्याचे हे भिन्नभिन्न मार्ग होत. मतांमधे असलेली विविधता ही खरोखर हिताचीच होय, कारण हीं सर्व धर्ममतें मनुष्याला धार्मिक जीवन जगायला उत्तेजन देतात आणि म्हणून तीं सर्व चांगलींच होत. जितके संप्रदाय अधिक असतील तितक्या प्रमाणांत मनुष्याच्या ठायीं असलेल्या दिव्य प्रेरणांना यशस्वीपणें जागृत करण्याची संधि अधिक प्राप्त होते.

'ओक बीच ख्रिश्चन युनिटी' या संस्थेंत विश्वव्यापी ऐक्या-संबंधी बोलतांना स्वामी विवेकानंद म्हणाले :

सगळेच धर्म मूलत: सारखेच आहेत. त्या रूपककथेंतील 'फॅरिसी'प्रमाणे ख्रिस्ती धर्मपंथ आपण एकटेच तेवढे बरोबर असल्याबद्दल ईश्वराचे आभार मानतो; आणि या धर्मपंथाला असें वाटतें की इतर सगळे धर्म चूक असून त्यांना ख्रिस्ती धर्माच्या ज्ञानाची नितान्त आवश्यकता आहे. असें जरी असलें तरी सर्व धर्म मूलत: सारखेच आहेत हें वरील विधान खरेंच आहे. इतर सर्वांनी उदार भावाने ख्रिस्ती धर्ममताशीं हातमिळवणी करण्यापूर्वी ख्रिस्ती धर्माने सहिष्णु व्हावयास हवें. ईश्वर हा प्रत्येकाच्या हृदयांत साक्षीरूपाने विद्यमान आहे आणि सर्व लोकांनी, विशेषत: येशू ख्रिस्तांच्या अनुयायांनी हें सत्य मान्य केलेंच पाहिजे. खरें म्हणजे, येशू ख्रिस्त प्रत्यक्ष सद्वर्तनी मनुष्याला ईश्वराच्या कुटुंबांत स्थान देण्यास तयार असत.

स्वर्गस्थ पित्याच्या इच्छेनुसार जो मनुष्य वर्तन करतो तोच चांगला होय. केवळ विशिष्ट गोष्टींवर विश्वास ठेवल्याने मनुष्य चांगला बनत नाही. चांगलें असणें व चांगलें करणें ह्या आधारावर सर्व जगाचें ऐक्य साधतां येऊं शकतें.

## २१

# राजयोगाचें अंतिम लक्ष्य

खरें पाहतां, धर्माच्या नैतिक अंगापेक्षा चिंतनाच्या अंगाशीं योगाचा अधिक संबंध असतो अर्थात्, नैतिक अंगाचा थोडासा विचार अनिवार्यपणें करावा लागतो. स्त्रीपुरुषांना तथाकथित अप्त-वाक्यांपेक्षा अधिक कांहीतरी हवेसें वाटू लागलें आहे. त्यांना सर्व सत्यांचें प्रत्यक्ष ज्ञान हवें आहे. प्रत्यक्ष अनुभूति झाली तरच धर्मात सत्य आहे असें म्हणतां येईल. आध्यात्मिक सत्यें हीं बहुतांशीं मनाच्या ज्ञानातीत अवस्थेंतूनच गोळा करावयाचीं असतात. आपल्याला कांही विशेष अनुभूति आल्या असा दावा करणाऱ्यांनी स्वत:चें मन ज्या विशिष्ट अवस्थेंत नेलें होतें अशाच अवस्थेंतआपणहि आपलें मन नेऊं या; आणि मग जर आपल्यालाहि तशा अनुभूति आल्या तर आपल्या पक्षीं त्या अनुभूति सत्यें ठरतील. दुसऱ्यानें जें पाहिलें तें सारें आपणहि पाहूं शकतों; जी गोष्ट एकदा घडली तीच पुन: घडूं शकते, नव्हे तशाच परिस्थितींत ती पुन: घडून आलीच पाहिजे. ज्ञानातीत अवस्थेंत कसें पोहोचावें हें आपल्याला राजयोग शिकवितो. सगळेच धर्म कोणत्या ना कोणत्या रूपांत ही अवस्था मान्य करतात, परंतु भारतांत धर्माच्या ह्या अंगाकडे खास लक्ष दिलें जातें. प्रारंभीं यांत्रिक पद्धतीने केलेल्या कांही साधनांचा त्या अवस्थेप्रत जाण्यास आपल्याला उपयोग होतो; परंतु निव्वळ यांत्रिक पद्धतीने केलेल्या साधना फारसा लाभ करून देऊं शकत नाहीत. कांही विशिष्ट आसनें, प्राणायामाचे कांही विशिष्ट प्रकार ह्यांचा मनाची एकाग्रता व त्याचें संतुलन साधण्यास पुष्कळच उपयोग होतो हें खरें; परंतु ह्यांच्या जोडीला पवित्र व ईश्वर-प्राप्तीची वा आत्मसाक्षात्काराची दुर्दम्य इच्छा हवी, एका ठिकाणीं

बसून एखाद्या कल्पनेवर मन खिळवून ठेवण्याचा प्रयत्न करतांना पुष्कळांना असा अनुभव येईल की, मनाची ही एकाग्रता यशस्वीरीत्या साधण्यासाठी आणखी कांही मदतीची आवश्यकता आहे. मनावर हळूहळू व पद्धतशीरपणें ताबा मिळवावयाचा असतो. हळूहळू, सातत्याने आणि चिकाटीने प्रयत्न करून इच्छाशक्ति बलिष्ठ करावी लागते. हा कांही पोरखेळ नव्हे किंवा आज सुरू करून उद्या सोडून दिलें असलें हें खूळ नव्हे. सबंध जीवनभर त्यासाठी प्रयत्न करावे लागतात; आणि त्या ध्येयाप्रत पोहोचण्यासाठी आपल्याला जितके परिश्रम घ्यावे लागतात तितक्या मोलाचें तें ध्येय जरूर असतें. कारण तें ध्येय म्हणजे ईश्वराशीं असलेल्या आपल्या पूर्ण ऐक्याचा साक्षात्कार हेंच होय. हें ध्येय डोळयांसमोर असतांना आणि तें गाठण्यांत आपण निश्चितपणें यशस्वी होऊं शकूं हें ठाऊक असतांना या ध्येयासाठी कितीहि किंमत द्यावी लागली तरी ती थोडीच होय.

स्वामी विवेकानंद शतवार्षिक जयंती ग्रंथ

# स्वामी विवेकानंद ग्रंथावली

( दुसरी आवृत्ति )

एकूण १० खंड : एकूण पृष्ठसंख्या सुमारें ६००० : डेमी १/८ आकार
प्रत्येक खंडांत स्वामी विवेकानंदांचें आर्टपेपरवरील वेगवेगळ्या प्रकारचें
सुंदर चित्र. आर्टपेपरवरील आकर्षक बहुरंगी आवरण,
मजबूत बांधणी, उत्तम कागद आणि सुबक छपाई.

स्वामी विवेकानंदांच्या आजपर्यंत उपलब्ध झालेल्या सर्व व्याख्यानांचा, प्रवचनांचा, ग्रंथांचा, लेखांचा, पत्रांचा, संवाद-संभाषणांचा, मुलाखतींचा, प्रश्नोत्तरांचा, कवितांचा व इतर सर्वप्रकारच्या साहित्याचा मूळ इंग्रजींतून आणि बंगालींतून केलेला अनुवाद प्रस्तुत 'ग्रंथावली'च्या एकूण दहा खंडांमध्ये समाविष्ट करण्यांत आला आहे. स्वामी विवेकानंदांच्या समस्त इंग्रजी व बंगाली साहित्याचा संपूर्णपणें प्रथमच प्रसिद्ध झालेला हा अधिकृत मराठी अनुवाद होय.

**प्रत्येक खंडास १४ रुपये.**

**संपूर्ण संच एकदम घेणाऱ्यांस १३० रुपये.**

पाठविण्याचा खर्च वेगळा पडेल.

**संपूर्ण संच व्ही. पी. ने पाठविण्याची पद्धत नाही.**

# आमची इतर प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| | | रु. पै. |
| श्रीरामकृष्णलीलाप्रसंग—स्वामी सारदानंदकृत | | |
| प्रथम भाग १०.००; | द्वितीय भाग | १६.०० |
| श्रीरामकृष्ण-चरित्र--न. रा. परांजपेकृत--- | | |
| प्रथम भाग १०.००; | द्वितीय भाग | ११.०० |
| श्रीरामकृष्ण-वचनामृत--श्री. 'म' संकलित; | प्रथम भाग | ९.०० |
| द्वितीय भाग ८.००; | तृतीय भाग | ९.०० |
| भगवान श्रीरामकृष्णांच्या लीलासहधर्मिणी श्रीसारदादेवी | | ६.२५ |
| स्वामी विवेकानंद यांचें चरित्र | | १४.०० |
| साधु नागमहाशय (भगवान श्रीरामकृष्णांचे एक शिष्य) | | २.०० |
| श्रीरामकृष्ण-वाक्सुधा--स्वामी ब्रह्मानंद द्वारा संकलित | | १.५० |
| परमार्थाची वाटचाल —स्वामी विरजानंदकृत | | ६ ५० |
| स्वामी विवेकानंदांच्या आठवणी | | २.५० |
| स्वामी शिवानंद ('महापुरुषजी') | | २.७५ |
| स्वामी सारदानंद | | ४.५० |
| स्वामी अखंडानंद | | ९ ०० |
| अघोरमणि व 'गौरी मा' | | २.०० |

## स्वामी विवेकानंदकृत पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| हिंदुधर्म | २.८० | पूर्व आणि पश्चिम | १.७५ |
| विविध | २.०० | आधुनिक भारत | १.८० |
| कविता | १.५० | ज्ञानमार्गावरील प्रवचनें | १.५० |
| युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी | २.२० | उच्च जीवनाची साधना | ३.५० |
| भारतीय नारी | २.५० | धर्माचें स्वरूप आणि साधन | २.०० |
| माझे गुरुदेव | १.२५ | वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव | २.२५ |
| हिंदुधर्माचें पुनरुत्थान | ०.९० | शिक्षण | १.२५ |
| वेदान्त आणि जीवन | ३ ०० | पवहारी बाबा | ०.९० |

| | |
|---|---|
| स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत .. .. | ९.०० |
| दैवी वाणी (उच्च आध्यात्मिक उपदेश) .. | ५.२५ |
| आत्मसाक्षात्कार : साधना व सिद्धि .. .. | ४.०० |
| सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना .. .. | १.५० |
| बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें .. | ३.६० |

| | | |
|---|---|---|
| धर्माचें विज्ञान आणि तत्त्वज्ञान | .. | ३.८० |
| स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | .. | २.२५ |
| स्वामी विवेकानंद यांच्या मुलाखती व प्रश्नोत्तरें | .. | ४.०० |
| धर्मभूमि भारत आणि इतर लिखाण | .. | २.०० |
| महापुरुषांच्या जीवनकथा | .. | ३.९० |
| ईशदूत येशू ख्रिस्त | .. .. | ०.६० |
| भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्गीता | .. .. | ३.०० |
| 'हिंदुधर्म आणि श्रीरामकृष्ण' व इतर लेख | .. .. | १.६० |
| भारताची आध्यात्मिक विचारधारा | .. .. | १.५० |
| शिकागो व्याख्यानें | .. .. | १.०० |
| पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व | .. .. | १.०० |
| भारताचा भावी काळ | ... .. | ०.५० |

# स्वामी विवेकानंदांचीं पत्रें

## (वाढविलेली आवृत्ति)

**मोठ्या आकाराचीं ९२४ पृष्ठें; सुंदर चित्र व आवरण यांसह**


**मूल्य केवळ रु. २०.५०; पोस्ट खर्च निराळा.**

भगवान श्रीरामकृष्णांचे प्रमुख लीलासहचर पूज्यपाद स्वामी विवेकानंद यांनी आपल्या समकालीनांना, गुरुबंधूंना, शिष्यांना, सहकाऱ्यांना व हितचिंतकांना लिहिलेल्या या सर्व पत्रांमधून स्वामी विवेकानंदांचें अंतरंग वाचकांसमोर हळुवारपणे उलगडलें जातें. परमार्थ सत्याच्या प्रत्यक्षानुभूतीने ओतप्रोत असलेलें त्यांचें व्यक्तिमत्त्व आपल्या सर्व पैलूंनिशी या पत्रांमध्ये प्रकट झालेलें दिसून येतें.

वाचकांच्याहि वैयक्तिक व सामाजिक जीवनांतील सर्व पैलू उजळून उच्च परिवर्तन घडवून आणण्यास या पत्रांतील चैतन्य व ओज कारणीभूत ठरतील याच विश्वासाने ही वाढविलेली आवृत्ति प्रकाशित करतांना विशेष आनंद होत आहे.

"स्वामी विवेकानंद ग्रंथावली" च्या दहा खंडांत विखुरलेलीं हीं पत्रें प्रथमच एकत्र प्रसिद्ध होत आहेत.

**श्रीरामकृष्ण आश्रम (प्रकाशन विभाग), धंतोली, नागपूर ४४० ०१२**



तन्नो हंसः प्रचोदयात्

आवरण-बिवर्स पॅकेजिंग प्रॉडक्टस, कानपुर-८.